मी दिपक तू सविता

आश्रम परिवाराच्या समस्त बंधू–भगिनी आणि आश्रमाशी श्रद्धा प्रेमाने जुळलेल्या साधक–सज्जनांना सद्‌गुरु सेवेनिमित्त सप्रेम भेट

– सौ. अर्चना / श्री. अर्जुन अरविंद चिंदरकर

हरपेल तिमिर सर्व - प्रकटले प्रकाश पर्व

प्रकाशपर्व
प्रकाशन

प्रकाशक :
स्वामी श्री सवितानंद अमृतमहोत्सव सेवा समिती
प्रकाशपर्व प्रकाशन
तरसाडा (जिल्हा - सूरत, गुजरात)
फोन : ८८५०८१३८३८

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रथम आवृत्ती :
आषाढ शुद्ध १५, विक्रम संवत् २०७९ (गुरुपोर्णिमा)
बुधवार, दिनांक १३ जुलै २०२२

मुखपृष्ठ : श्री. सागर मोहिते, सांगली

अक्षरजुळणी : सौ. शोभा कुबल, सांगली

मुद्रक : श्री भुवनेश्वरी प्रिन्टीग प्रेस, सांगली

मूल्य : वाचन, चिंतन, मनन व आचरण

म्हणोनी जाणोनी गुरु भजीजे

पू. स्वामीजींच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या **'सविता अर्घ्य'** या स्मरणिकेच्या प्रकाशनानंतर सर्व साधकांकडून जो कौतुकाचा वर्षाव संपादक मंडळावर झाला त्याचा विनयपूर्वक व कृतज्ञापूर्वक स्वीकार. खरे पहाता माँ भगवती व प. पू. बाबांचे आशिर्वाद व स्वामीजींच्या मोजक्या परंतू मार्मीक सूचना यांनाच हे श्रेय जाते. या स्मरणिकेच्या संपादन प्रसंगी हेतूतः दैवी अनुभव जे मनबुद्धीच्या कक्षेच्या पलिकडे आहेत यांचा समावेश टाळला होता. संपादन करताना मोठ्या कष्टाने व जड अंतःकरणाने अनेक विषय व लेख प्रकाशित लेखांच्या तोडीस तोड असून देखील समाविष्ट होऊ शकले नव्हते. अशा विषय व लेखांचे संकलन म्हणून जशी एखाद्या मोठ्या पूजेनंतर छोटी उत्तर पूजा असते तद्वत हा स्मरणिकेचा उत्तरार्ध. ही सेवा माँ भगवती व बाबांच्या चरणी रूजू करीत आहोत.

वेदवाणीदेखील 'नेति नेति' म्हणते अशा व मनबुद्धीच्या कक्षेच्या पलीकडील आध्यात्मिक साधन प्रवासात अलौकिक, दिव्य अनुभूती तर येणारच. आपल्या 'महाभारत एक सुडाचा प्रावास' या तर्कबुद्धीने महाभारताची उकल करणाऱ्या ग्रंथात प्रतिथयश लेखक श्री. दाजी पणशीकर म्हणतात, सूड हा केंद्रबिंदू ठेवून तर्काच्या आधारावर महाभारताची संगती बसवता येते परंतू हे करताना या बुद्धीच्या कक्षेत न बसणारे अद्भूताचे प्रसंग स्वीकारावेच लागतात. अद्भूताशिवाय महाभारत हे खरे महाभारत रहातच नाही. तद्वत स्वामीजींचे दृश्य, बाह्य व्यक्त असे पैलू प्रथम स्मरणिकेच्या रूपाने व्यक्त झाले (परंतु काहीसे अल्पप्रकाशित किंवा अप्रकाशित असे अलौकिक व बुद्धीच्या कक्षेत न येणारे (बुद्धीगम्य नव्हे, श्रद्धागम्य) पैलू या स्मरणिकेत मांडण्याचा मानस आहे. न्याय वैद्यक शास्त्रात किंबहूना सर्वच क्षेत्रात म्हणाना, विधी व निषेध असे दोन भाग असतात. Do's आणि Don'ts). त्यातील **'सविता अर्घ्य'** Do's चे वर्णन करीत असेल तर हि दुसरी स्मरणिका Don't's ला समर्पित आहे. स्वामीजींचा आध्यात्मिक अधिकार, त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अल्प प्रकाशित, अप्रकाशित गुढ पैलू जाणून घेऊन आपल्या वर्तन व्यवहारात याचे स्मरण ठेऊन मर्यादा पालन करीत केलेली गुरुभक्ती किंवा सत्पुरुषांची सेवा हेच साधकाच्या प्रगतीचे मर्म असते, याचे भान व्हावे व स्वामीजींशी बोलताना-वागताना हा विवेक जागृत रहावा हीच या लेखन प्रपंचाची मूळ पीठीका.

विज्ञाननिष्ठ, स्वतः वैज्ञानिक, विज्ञान शाखेचे उच्च पदवीधर आणि भारतीय संस्कृतीतील रहस्य उलगडणाऱ्या स्वामी श्री सवितानंदांच्या स्मरणिकेच्या या उत्तरार्धामध्ये चमत्कारांचा समावेश विज्ञानाच्या आधारे कसा बरे पटवून देता येईल असा प्रश्न मी माझ्याच मनास विचारत होतो. बरेच चिंतन-मंथन करुनही याचे उत्तर न सापडल्यावर सरते शेवटी स्वामीजींनाच शरण जाण्याचे ठरविले. एके दिवशी हळूच गप्पांच्या ओघात वेळकाळ पाहून स्वामीजींना हा प्रश्न विचारला. त्यावर स्वामीजींनी चमत्कारांसंबंधीची केलेली मीमांसा त्यांच्याच शब्दात.

'चमत्काराची मिमांसा तीन प्रकारे करता येईल. **अ)** एकाचे ज्ञान आणि दुसऱ्याचे अज्ञान–जसे की काही विशिष्ट रसायनांचे एकत्रिकरण केले असता तिसऱ्या रंगाची उत्पत्ती होते हे जो जाणतो त्याच्याकरीता हे ज्ञान आहे आणि जो जाणत नाही त्याच्याकरीता चमत्कार आहे. हातचलाखीच्या गोष्टींचा देखिल यामध्ये समावेश होऊ शकतो. **ब)** आता दुसरे एक उदाहरण, सूर्य प्रकाशामध्ये बहिर्गोल भिंगाच्या (कॉनवेक्स लेन्स) खाली धरला तर कागद जळतो याला जर आपण चमत्कार म्हणालो तर यामध्ये तीन गोष्टींची आवश्यकता आहे. १) सूर्य प्रकाश, २) बहिर्गोल भिंग, ३) कागद. जर बहिर्गोल भिंग व सूर्य प्रकाश अस्तित्वात आहेत पण कागदाच्या जागी दगड, धातू असेल तर ही प्रक्रिया पूर्ण होणार नाही. सूर्य प्रकाश आणि कागद दोन्हीही असतील परंतू बहिर्गोल भिंग नसेल तर ही प्रक्रिया पूर्ण होणार नाही तसेच बहिर्गोल भिंग व कागद असेल पण सूर्य प्रकाश नसेल तरी ही प्रक्रिया पूर्ण होणार नाही. या तीनही गोष्टी आवश्यक आहेत तरच ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकेल तद्‌वतच सूर्य प्रकाश म्हंणजेच परमात्मा किंवा परमसत्तेची इच्छा, बहिर्गोल भिंग म्हणजे एखाद्या अधिकारी पुरुषाचे / संताचे / सत्पुरुषाचे ज्याप्रमाणे संताचे माध्यम म्हणून वापरले जाणारे कारण शरीर आणि कागद म्हणजे श्रद्धा–भक्तीयुक्त अंतःकरण असणारा साधक या तीनही गोष्टी जोपर्यंत एकत्रित येत नाहीत तोपर्यंत चमत्कार घडत नाही. अशा पद्धतीने चमत्कार कसा आणि का घडतो याच काही अल्पांशाने वर्णन येईल. **क)** अधिक खोलात जाऊन जर विचार करायचा झाला तर एकाच वेळेला अनेक जागी एखादे संत ज्यावेळेला दर्शन देतात किंवा अल्पावधीमध्ये एक हजार किलोमीटर अंतरावरील दोन वेगवेगळ्या ठिकाणी उपस्थित होतात. या मागचे रहस्य योग साधनेतून स्थूल देह, सूक्ष्म देह आणि कारण देह यांच्यामध्ये असणाऱ्या ब्रह्मग्रंथी, रुद्रग्रंथी आणि विष्णुग्रंथीचा भेद होऊन ती वेगवेगळी झालेली असतात. त्याच्यामुळे त्या संतांचे कारण शरीर हे त्यांच्या अधीन रहात नसून ते परमसत्तेच्या अधीन रहाते. अशा अधिकारी पुरुषाचे सूक्ष्म शरीर हे स्थूल शरीराच्या बंधनातून मोकळे होते आणि ते बऱ्याच दूर पर्यंत जाऊ शकते.

सामान्य माणसाचे कारण शरीर हे किंचीत काळसर, जड असे असते तर सतपुरुषांचे कारण शरीर निळसर आभायुक्त, अत्यंत हलके व दैदिप्यमान असते. हेच रहस्य आहे की सत्पुरुष एकाहून अधिक जागेवरती एकाच वेळी व्यक्त आणि प्रगट होऊ शकतात. परंतू पुन्हा मूळ अन्य दोन घटक विसरता कामा नये. परमसत्तेची इच्छा आणि श्रद्धा–भक्तीयुक्त अंतःकरणाने संपूर्ण शरणागती पत्करलेला साधक असा योग यायला हवा. ज्यावेळेला अशा साधकावर कृपा करण्याची परमसत्तेची इच्छा असते तेव्हा एखाद्या संतांच्या कारण शरीराला माध्यम बनवून हे कार्य करुन घेतले जाते. याचाच एक दाखला काहिसा मजेशीर पण तितकाच गूढ आणि गहन आम्ही तुम्हाला सांगू. टिटवाळ्याजवळ मुरबाडला उच्चस्थितीतले साधक मुकुंद वल्लभ राहतात. त्यांनी संन्यास घेतला आहे. त्यापूर्वी ते एक यशस्वी दिग्दर्शक होते. झी टी.व्ही. व अन्य मराठी वाहिन्यांवर उत्तम पद्धतीने त्यांचा व्यवसाय सुरु होता. जीवनात आलेल्या परीवर्तनाने ते अध्यात्माकडे वळले. त्यांना श्री स्वामी समर्थांनी आदेश दिला की, 'तू मुरबाड तालुक्यात जा. तेथे तुला माझा एक भक्त भेटेल आणि तो तुला जमीन देईल. तेथे तू कुटी बांधुन साधना कर'. आगाशी ते नेरळ या मार्गावर आठ किलोमीटर परीसरात कोठेही लोक वस्ती नव्हती अशी एक जागा श्री स्वामी समर्थांच्या एका भक्ताने भेट दिली. तेथे ते कुटी बांधून राहू लागले परंतु सुरुवातीला रात्रीच्या

वेळी जंगली पशूंचा आवाज, डरकाळ्यांनी आणि साधनेतही चित्त लागत नसल्याने रात्री घाबरुन कुटीच्या बाहेर यायचे. त्याच वेळी त्यांच्या समोर श्वेत वस्त्रातील एक यती प्रगट होऊन त्यांना म्हणायचे, ''तू घाबरु नकोस. तू एकटा नाहीस आम्ही कायम तुझ्या सोबत आहोत'' असा धीर मिळाल्यावर मुकुंद वल्लभ कुटीत परत जायचे. असे बरेच दिवस झाल्यावर मुकुंद वल्लभांना धीर आला. तसेच या अज्ञात यतीकडून साधनेतील मार्गदर्शन मिळू लागले आणि त्यांची खात्री पटली की कोणीतरी मला सांभाळत आहे. त्यांची जिज्ञासा चौदा वर्षानंतर पूर्ण झाली ज्यावेळी त्यांची व आमची भेट झाली.'

हा प्रसंग सांगीतल्यावर मी विचार करु लागलो अनेक वर्षे ज्यांनी आपल्याला वारंवार दर्शन देऊन धीर दिला त्या स्वामीजींचे प्रत्यक्ष दर्शन होऊन मुकुंद वल्लभांना किती आनंद झाला असेल. परंतु स्वामीजी या प्रसंगापासून संपूर्ण अनभिज्ञ. स्वामीजींचे कारण शरीर हे परमसत्तेच्या इच्छेने मुकुंद वल्लभांच्या कल्याणाकरीता वापरले गेले याची सुतराम कल्पना स्वामीजींना नव्हती. ही घटना घडून गेल्यानंतर पंधरा वर्षांनंतर त्या दोघांचा उभयता प्रत्यक्ष स्थूल देहाचा परीचय झाला परंतू स्वामीजींच्या कारण शरीराचे दर्शन श्री. मुकुंद वल्लभांनी यापूर्वीच अनेकदा घेतले होते.

आता जाता जाता अजून एक प्रसंग सांगायचा म्हणजे नाशिकचे वैद्य जयंत गांगुर्डे हे श्रद्धा-प्रेमाने आश्रमाशी जोडलेले. सामान्यतः आम्ही आश्रमाचे साधक एक नियम पाळतो कि स्वामीजी ज्या खोलीत मुक्कामाला असतात त्या खोलीत दुसऱ्या कोणाला झोपू दिले जात नाही. पूर्वी साधन काळात जेव्हा स्वामीजींची ऊर्जा खूप जास्त होती तेव्हा त्यांच्या जवळ रहाणाऱ्या माणसाला आजारपण येत असे. जर कोणी स्वामीजी ज्या खोलीत मुक्काम करतात तिथे मुक्काम करेल तर त्याला ताप भरत असे. कारण स्वामीजींच्या शरीराची उर्जा इतर सामान्य माणसांच्या शरीराला सहन होत नसे. असो. तर एकदा जयंत गांगुर्डेंनी पाहिले कि स्वामीजी एकाच वेळी पलंगावर झोपलेलेही आहेत आणि पलंगा शेजारी उभे पण आहेत. त्यांना कळेना की स्वामीजी खरे कोणते आणि भास कोणता. दोन्हीही स्वामीजी खरेच होते. एक त्यांचे कारण शरीर व दुसरे त्यांचे स्थूल शरीर.

चमत्कारांविषयी काही अंधश्रद्धा पसरविण्याचा उद्देश नसून प्रस्तुतच्या दुसऱ्या भागात साधक आणि परिचितांच्या लेखांबरोबरच स्वामीजींच्या अनुभव कथनाचे काहीसे अपरिचित व अध्यात्माच्या गुढ भाषेतील पण वास्तव असे पैलू दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. साधक-वाचकांच्या पसंतीस तो उतरेल अशी आशा आहे. इति लेखन सिमा.

आपला स्नेहांकित

श्री. अविनाश काळे

संपादक मंडळाच्या वतीने

स्वामी श्री सवितानंद अमृतमहोत्सव सेवा समिती

आभार

माँ–बाबांचे आशिर्वाद आणि स्वामीजींचे निरंतर मार्गदर्शन व आशिर्वाद यामुळेच स्मरणिकेचा दुसरा भाग प्रकाशित करणे सहज शक्य झाले. लेख देणाऱ्या सर्व मान्यवरांचे, त्याचे बिनचुक टायपिंग करणाऱ्या सौ. शोभा कुबल, आकर्षक छपाई–उत्कृष्ठ बायडींग याचा दर्जा स्वतःच प्रस्थापित करणारे आणि टिकवणारे श्री. अमोल मुकुंद कुलकर्णी, श्री भुवनेश्वरी प्रिंटींग प्रेस, सांगली व संपादक मंडळाचे सर्व सदस्य, आश्रम परीवारातील श्री. अर्जुन चिंदरकर व सौ. अर्चना चिंदरकर यांचे अर्थसहाय्याकरीता आणि श्री. राजेंद्र घाडगे, श्री. महेश वसगडेकर यांचे त्यांच्या चिकाटीकरीता विशेष आभार.

सद्‌गुरुचरणरज

श्री. नंदकिशोर बाविस्कर

अध्यक्ष

स्वामी श्री सवितानंद अमृतमहोत्सव सेवा समिती

१) **मी** आणि माझेपण विसरले जयाचे अंत:करण

२) **दिपक** तू माझ्या अंधारी पथाचा

३) **तूं** दिवादांडी भवसागराची

४) **सविता**

अनुक्रमणिका

१) मी आणि माझेपण विसरले जयाचे अंतःकरण

१) यज्ञानाम् जप यज्ञोस्मि श्री. उदय फडके, बडोदा १

२) गुरुसेवा रत जे जीव गुरूमाऊलीची सरू १४

३) जल कमलवत् गुरूमाऊलीची सरू २२

४) हिरा न सांगे आपुले मोल गुरूमाऊलीची सरू २६

५) सहस्त्ररश्मी दिवाकराची कशी गाऊ महता – सौ. प्रतिभा कुलकर्णी, रावेर ३१

२) दिपक तू माझ्या अंधारी पथाचा

१) हे तो स्वर्गीचे देणे – प्रा. भालचंद्र पाठक, बेटावद ५३

२) आत्मनिवेदन – श्रीमती परिमल भारतीय, पुणे ६०

३) अपरिचित स्वामीजी – डॉ. कपिल दिलीप चांद्रायण, नागपूर ६९

३) तूं दिवादांडी भवसागराची

१) मज निरंतर जागविती – श्रीमती परिमल भारतीय, पुणे ७३

२) कवडसा,''सविता अर्घ्य''चा! – वैद्य ओंकार कोर्टीकर, संगमनेर ८१

३) 'सविता अर्घ्य' सिंहावलोकन – आप्पाराव कुलकर्णी, लातूर ८५

४) स्तोत्रमंत्राचे विज्ञान व सन्तु निरामया: रसग्रहण –वैद्य. लक्ष्मीकांत कोर्टीकर, अ.नगर ९०

५) वैद्य भेटता सुखदाता – ज्ञानेश्वर विठ्ठल राजकुंटवार, पुणे९६

४) सविता

१) नक्षत्राचे देणे – एक ज्योतिष अभ्यासक ९७

२) Biofield - Prof. Avishkar Katti, Pune १०२

३) प्रभामंडल – नंदकिशोर बाविस्कर, नाशिक १०९

४) देव देहात देहात, का हो जाता देवळात – श्री. श्रीपाद प्र. काणेकर, मुंबई १११

५) तुलसी संगत साधू की हरे कोटि अपराध – प. पू. योगीराज डॉ. सर्वेश्वर सोनी, नाशिक ११३

६) चंदनाच्या वासें तरु चंदन जाले स्पर्शे – सौ. विशाखा भिडे, रत्नागिरी ११५

१) मी आणि माझेपण विसरले जयाचे अंतःकरण

१. यज्ञानाम् जप यज्ञोस्मि

स्मृतीकथन : श्री. उदय फडके, बडोदा
शब्दांकन : गुरूमाऊलीची सरू

हे माझे सद्‌भाग्य की स्वामीजींबरोबर मला राजस्थानची यात्रा करता आली. त्या यात्रेत एक अतिशय महत्वाचे ठिकाण म्हणजे भारतातील एकमेव तीर्थस्थान पुष्कर. मी, माझी पत्नी सौ. संगिता, सरू, बनेडा संस्थानचे राजकुमार श्री. गोपालचरण सिसोदिया (महाराणाप्रतापांचे पंधराव्या पिढीचे वंशज) व त्यांचे शालक विभुजी स्वामीजीं सोबत होतो. आम्ही दर्शनार्थ श्री ब्रह्माजी मंदिरात पोहचलो. तेथे मंदिरातील पुजाऱ्याने स्वामीजींना गर्भगृहामध्ये बोलवलं आणि थेट ब्रह्मदेवाच्या मुर्तीजवळ नेले. तेथे पुजाऱ्याने स्वामीजींना कांही सांगितले, त्यावर त्यांच्याकडे वेधक नजरेने कटाक्ष टाकत हलकेसे हसत स्वामीजींनी उत्तर दिले. दर्शन करुन बाहेर आल्यावर मी जिज्ञासेने या संदर्भात स्वामीजींना विचारले, ते म्हणाले आत गेल्यावर पुजाऱ्याने (तो ही संन्यासीच होता) त्यांना सांगितले की, ''आपके मन में कोई इच्छा हो तो ब्रह्माजीके चरणों में निवेदन करे, ब्रह्माजी अवश्य पूर्ण करेंगे।'' मी न राहवून म्हणालो त्यांना तुम्ही काय उत्तर दिले? ब्रह्माजींना कांही प्रार्थना केली का? स्वामीजी हसुन उत्तरले, आम्ही त्यांना म्हणालो, ***''जो संन्यासी है उसके मनमे कोई इच्छा नही होती और जिसके मनमे कोई इच्छा हो वह संन्यासी नही होता।''*** सहज आणि तरीही खूप अर्थगर्भित उत्तर, स्वामीजी त्यानंतर मला म्हणाले, उदय आम्ही मराठीत लिहिलेला एक शेर तुला ऐकवतो, ***''श्वास संपणे इच्छा बाकी याचे नांव मृत्यु असे। इच्छा संपणे श्वास बाकी याचे नांव मोक्ष असे।''*** मी तर स्तीमीतच झालो. साध्या सोप्या भाषेत, कमीत कमी शब्दात मृत्यु व मोक्षाची व्याख्या. वा ! आणि मग माझे मन त्याच विचारात गुंतले... खरोखर असे पूर्ण निरिच्छ कसे होता येईल यावर मी विचार करीत होतो.

आम्ही सगळे गाडीत बसलो, तेथून अजमेरच्या परतीच्या रस्त्यावर पंचकुंड ज्याला कांहीजण पांडवकुंड ही म्हणतात तेथे स्वामीजींनी गाडी थांबवली. स्वामीजी म्हणाले, सुमारे चाळीस वर्षापूर्वी हे कुंड आणि पुष्कर यातील एक कि.मी. जागा पूर्णपणे मोकळी, उजाड होती. हिंदीत ज्याला बिहड म्हणतात गांवाबाहेर अगदी निर्मनुष्य अशी ही जागा होती. तेथील आश्रमात वरच्या मजल्याच्या एकांत खोलीत स्वामीजी कांही काळ साधनेकरिता राहिले होते. अन्नछत्रातून भिक्षा आणायची आणि बाकी सर्व वेळ वरच्या खोलीत एकांतात. खाली उतरल्यावर स्वामीजींनी हसत विचारले आम्ही कांही काळ राहून साधना केली अशी एक जागा पहायची आहे? आम्ही सर्वजण उत्सुकतेने म्हणालो, 'हो' तेथून मग स्वामीजींनी पायवाटेने जंगलात नेले. पंचकुंडापासून निदान एक कि.मी. तरी दूर अगदी जंगलात. पायवाट पण दगड-धोंड्याची, काट्याकुट्यांची, उबडखाबड. आमच्या सर्वांच्या पायात पादत्राणे होती, स्वामीजी तर अनवाणी पण तरी आमच्यापेक्षा सहजतेने चालत होते. सुमारे एक कि.मी. पेक्षा अधिक अंतर कापून आम्ही एका छोट्या मंदीराजवळ आलो. छोटेसे गर्भगृह असणारे माँ चे मंदीर व त्यालाच लागून एक छोटी खोली. एक माणूस झोपू शकेल एवढीच लांब रूंद.

स्वामीजी त्या खोलीकडे बोट दाखवत म्हणाले, माँ च्या चरणी या खोलीत आम्ही राहिलो आहोत. आम्ही सगळेजण आश्चर्याने त्यांच्याकडे पाहात राहिलो. कारण वातावरणावरून लक्षात येत होते की तेथे कोणाचाही वावर नव्हता. अगदी प्रसन्न शांत वातावरण. पुष्करला येणाऱ्या शंभर दर्शनार्थी पैकी एक तरी येथे येत असेल का? दिवसभरातून दहा पण नाही आणि येणाऱ्यापैकी कोणीतरी एखादे फळ आणत असेल तर, आम्ही सर्वजण गृहस्थ स्वाभाविकपणे पहिला प्रश्न ''स्वामीजी भोजनाचे काय?'' सहज हसत स्वामीजी म्हणाले भगवान कृष्णाचे वचन ***योगक्षेमं वहाम्यहम्***। आणि त्यानंतर मग मी त्याच श्लोकाच्या अनुसंधानाने (अन्यान्य आणि पुष्कर मंदिरातील प्रसंगासंदर्भात विचारायला सुरूवात केली. स्वामीजी आपण पूर्णत: निरीच्छ कसे होऊ शकतो? तुम्ही तुमच्या साधनेविषयी, जप ध्यानविषयी कांही सांगा. केंव्हा किती कसे? काही अनुभव? सगळ सगळ सांगा. सरूने पण हट्ट धरला. आम्ही सगळेजण स्वामीजींच्या चरणी बसलो. स्वामीजींनी सांगायला सुरूवात केली. संत एकनाथ म्हणतात, ***स्वत:चे विस्मरण झाल्याखेरीज ईश्वराचे खऱ्या अर्थाने स्मरण होत नाही*** आणि भगवान् कृष्ण गीतेत म्हणतात ***यज्ञानाम् जप यज्ञोऽस्मि।*** आम्ही गुरूमंत्र घेतल्यानंतर कसा जप केला त्याचे तीन अनुभव सांगतो असे म्हणून स्वामीजींनी सुरुवात केली.

गुरूमहाराजांनी आश्रमासाठी नवीन जमीन घेतल्यावर आमच्यावर जबाबदारी टाकली. ''गुरूमहाराजांसाठी कुटी बांधायची''. हा सर्व अनुभव सविस्तर गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु या पुस्तकात दिला आहे. कुटी बांधुन झाल्यावर गुरू महाराज आले. कुटी छपरा शहरापासून सुमारे तीन कि.मी. दूर. गुरूमहाराजांसाठी व स्वत:साठी भोजन म्हणजे खऱ्या अर्थाने स्वयंपाक, स्वत: केलेली पाकसिद्धी. स्वयंपाक करण्यासाठी सरपण कांहीच नव्हते. लाकूड/कोळसा वगैरे कांहीच नाही. तीन दगड ठेऊन त्यावर तवा ठेऊन पोळ्या करायच्या. ते ही उघड्यावर. सरपण म्हणून आसपासच्या झाडांच्या बारीक फांद्या विशेषत: खजूराच्या झाडाच्या फांद्या. आता खजूराच्या फांद्यांची पान बारीक आणि धारदार. अधून मधून बोट कापली जायची. सावधानता ठेवली नाही तर! भरकन जळून जायची. पोळी शेकतांना लाटता येईना.. लाटतांना शेकता येईना.. कारण फांद्या पटकन जळायच्या. पोळी लाटण्यासाठी उकीडवे बसायचो. साहजिकच गुढगे छातीशी. स्वयंपाक करतांना जप सतत चालू असायचा आणि एके दिवशी पोळी लाटता लाटता पायाजवळ असलेल्या नेसत्या धोतीने पेट घेतला पण आम्ही जपात मग्न आम्हाला कसलेच भान नव्हते. धोती हळूहळू पेटत पेटत गुढग्यापर्यंत जळू लागली. पोळी लाटतांना थोडे वाकलो होतो म्हणून दाढीचे बाल जळाले. त्याच्या दुर्गंधाने लक्षात आले की धोती पेटली होती. आम्ही तसेच उभे राहिलो पण धोती काढून टाकायचे भान नव्हते. शांतपणे उभे होतो. केस जळण्याच्या वासाने गुरूमहाराज त्यांच्या कुटीतून बाहेर आले आणि आम्हाला तशाही अवस्थेत शांतपणे उभे असलेले बघितले. एव्हाना धोतीने चांगलाच पेट घेतला होता. आम्हाला त्याच्या ज्वाळा कंबरेपासून छातीपर्यंत आलेल्या दिसत होत्या. पण काय करावे ते ही कळत नव्हतं, सुचत नव्हतं. जणू भावसमाधी लागलेली. गुरूमहाराज धांवत आले त्यांनी आमच्या धोतीची गाठ सोडली व झरकन धोती बाजूला फेकली. आमचा हात धरून तेथे मातीचा मोठा उंचवटा होता त्यावर एक दगड होता त्यावर बसवले. आम्ही फक्त लंगोटीवर शांत बसलो. त्याचवेळी बाबांचा

कोणी शिष्य आला. त्याला बहुदा बाबांनी खिचडी वगैरे टाकायला सांगितली असावी. त्यानंतर अंदाजे अर्ध्या पाऊण तासांनी आम्ही पूर्ण भानावर आलो. स्वत:कडे बघून गोंधळलो. कारण आम्ही फक्त लंगोटीवरच होतो, धोती कुठे गेली? तेवढ्यात गुरूमहाराज कुटीतून बाहेर आले आणि वर वर रागावत (आणि आतुन आनंदाने प्रसन्नतेने) म्हणाले, ''ये कोई तरिका है जप करनेका? कुछ भी भान नही, पता नही, वह देख तुम्हारी धोती लगभग पंच्चाहत्तर (७५%) प्रतिशत जल गई है। आम्ही तिकडे पाहिले फक्त हातभर तुकडा साबुत दिसत होता आणि आतापर्यंत जे एवढं सांगितलं ते सगळ आम्हाला भान आल्यावर लक्षांत आले तसे सांगितले. प्रत्यक्ष हे सर्व घडलं त्यावेळी आम्हाला खरेच कांही कळाले नव्हते आणि माँ भगवतीची व गुरूमहाराजांची कृपा बघा. कमरेपासून खांद्यापर्यंत चारही बाजूने अग्नी ज्वाळा भडभडत असूनही आम्हाला कोठेही भाजले नव्हते. फक्त त्यावेळी गुढघ्याची आग आग होत आहे हे लक्षात आल्यावर खाली वाकून बघितले तर दोन्ही गुढघ्यांवर लहान-मोठे असे दोन तीन फोडं झालेले होते. आग आग करत होते. तेवढाच भाग फक्त भाजला होता. आधीच सांगितलं आश्रम छपरा शहरापासून तीन की.मी. पेक्षा अधिक दूर. गोष्ट आहे १९७९ च्या काळची! संभवत: फेब्रुवारी महिन्याची. तेंव्हा फोन कोठून असणार? वाहनं पण कोणाजवळ नव्हती. आम्हाला बर्नाल किंवा इतर औषध कोण आणून देणार? आम्ही भगवतीच्या कृपेने व तिच्या प्रेरणेने प्रसंगावधान राखून जवळ असलेल्या गाईच्या तुपात हळद पावडर मिसळून त्याचा एक प्रकारचा मलम तयार केला आणि आम्हाला एक मोठा शोध लागला की, त्याने आग आग तर थांबलीच. जळल्याचे भाजल्याचे डाग राहिले नाहीत. घरगुती साधे सरळ सोपे औषध.

आता दुसरा प्रसंग, गुरूमहाराजांनी १९८५ मध्ये आम्हाला आंबा घाटाला पाठविले. आम्ही तर डिसेंबर १९७६ पासून अनवाणी. केव्हा कधी आमच्या पायाच्या अंगठ्यात (आता नक्की आठवत नाही पण बहुदा डाव्या पायाच्या अंगठ्याला) कांटा टाचला असेल. आत राहून गेला असेल. पण तेथे मराठीत ज्याला आपण कुरूप (भोवरा) म्हणतो, इंग्रजीत Corn झाले. चालताना खूप दुखायचे. सतलासण्याला सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांना दाखवले. त्यांनी अंगठा बधीर करण्याचे इंजेक्शन देऊन चिरा घेऊन काढायचा प्रयत्न केला. तरी ते सगळे निघाले नाही. बरेचसे आत राहून गेले. ते त्यांना काढता येईना. शेवटी त्यांनी अंगठ्यावर टाके घेतले आणि म्हणाले, एखाद्या सर्जनकडून काढावे लागेल. छोटी सर्जरी करावी लागेल. त्या काळात आंबाघाटाच्या त्या आश्रमात आणंदहून एक तरूण यायचा. सोहम त्रिवेदी त्याचे नांव. त्याने आम्हाला आणंदला यायचा आग्रह केला. त्या तरुणाच्या आग्रहाने आम्ही आणंदला गेलो. तेथे त्याचा नडियादचा मित्र भेटला. आमच्या अंगठ्याची ही परिस्थिती त्याच्या लक्षात येताच ते दोघे आग्रह करू लागले की नडियादला मोठा सरकारी दवाखाना आहे. तेथील मुख्य सर्जन एक पारशी गृहस्थ डॉ. मीठावाला. त्याच्याशी त्या दोघांचा चांगला परिचय होता. सर्जन म्हणून आणि सद्‌गृहस्थ म्हणून त्यांचे या भागात खूप नांव आहे. त्यांना दाखवू. त्यांच्या आग्रहाने तेथे गेलो. त्यांनी काळजीपूर्वक तपासले आणि सांगितले ऑपरेशन करावे लागेल, उद्या सकाळी आठ वाजता या, त्याप्रमाणे आम्ही गेलो. त्यांनी लागलीच आम्हाला ऑपरेशन थिएटरमध्ये नेले. आम्हाला वाटले

अंगठ्यापुरताच त्रास आहे तेथेच बधिर करण्याचे इंजेक्शन देतील, पण ते डॉक्टर शांत व मृदू आवाजात म्हणाले, हे अंगठ्याच्या हाडापर्यंत पोहोचले आहे. नुसते अंगठ्यापुरते इंजेक्शन देऊन काढण्याचा प्रयत्न केला तर तुम्हाला जास्त त्रास होईल. त्यापेक्षा पूर्ण बेभान करणे अधिक चांगले. आम्हाला ऑपरेशनच्या टेबलवर झोपवले. गळ्यात असलेली माळ काढायला सांगितली. हातात असलेली स्मरणिका (जपाची छोटी माळ सत्तावीस मण्यांची) खिशांत ठेवायला सांगितली. आम्ही ती नेहमीप्रमाणे बंडीच्या उजव्या बाजूला खिशात ठेवली. अॅनेस्थेशिया देणाऱ्या डॉक्टरांनी आमच्या तोंडावर मास्क ठेवला आणि कांही क्षणातच आम्ही बेहोश झालो. उदय आम्ही आता पुढे जे सांगणार आहोत ते त्या दोन तरूणांनी व स्वत: त्या डॉक्टरांनी जे सांगितले ते तुम्हाला सांगतो. कारण जे घडले ते आमच्या बाबतीत घडले तरी आम्ही पूर्ण बेहोशीत असल्याने आम्हाला माहित असण्याचे, कळण्याचे कारणच नव्हते. ते दोघे तरूण म्हणाले स्वामीजी आम्ही त्यावेळी सुरूवातीला खूप घाबरलो आणि नंतर खूप आश्चर्यात पडलो. कारण त्या सिव्हिल हॉस्पिटलमधला प्रत्येक डॉक्टर ऑपरेशन थिएटरमध्ये जात होता. सर्वात आधी एम्.डी. फिजिशियन गेला. त्यावेळी आम्ही घाबरलो की स्वामीजींना काय झाले असेल? एक दोन मिनिटात ते बाहेर आले आणि त्यानंतर डोळ्यांचा, कानांचा इतकेच नाही आम्ही खूप गोंधळलो, आश्चर्यात त्यावेळी पडलो ज्यावेळी गायनॅक डॉक्टर पण आत गेला. दवाखान्यातील जवळ जवळ सगळेच डॉक्टर व मुख्य मुख्य सिनिअर नर्सेस पण आत गेल्या. एक आत जायचा दुसरा बाहेर यायचा. आम्हाला कोणी कांही सांगेना. आमचा मानसिक गोंधळ उडालेला होता.

तेवढ्यात स्ट्रेचर बाहेर आले. त्यावर स्वामीजी पूर्ण बेहोशीत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या हातात जपमाळ होती. माळ फिरत होती म्हणजे जप चालू होता. डॉक्टर आम्हाला म्हणाले की, इतक्या वर्षांपासून सर्जरी करतो आहोत असा चमत्कार कधी पाहिला नाही. आमच्या सांगण्याप्रमाणे स्वामीजींनी जपमाळ त्यांच्या खिशात ठेवली. आम्ही त्यांना बेभान करून ऑपरेशन चालू केले आणि त्या पूर्ण बेभान स्थितीत पण त्यांचा उजवा हात खिशांत गेला, माळ बाहेर काढली. आश्चर्याची आणि अविश्वसनीय गोष्ट म्हणजे माळ खाली पडली नाही. त्यांनी माळ बोटात धरली आणि बोटांनी हळूहळू मणी पुढे सरकवू लागले. म्हणजे त्यांचा जप चालू झाला. अॅनेस्थेशिया डॉक्टराने तपासले तर हे पूर्ण बेहोश. त्यांनाही कळेना, मलाही कळेना दोघांना आश्चर्य पण वाटायचे हे असे कसे घडले आणि घडते आहे. नर्सने तर आश्चर्यचकित होऊन भक्तीभावाने पायावर डोके ठेवले आणि हा कधीही पाहायला न मिळणारा विलक्षण प्रसंग इतरही डॉक्टरांनी पहावा म्हणून, कारण आमच्या मेडिकल सायन्सच्या दृष्टीने हे शक्यच नव्हते, सर्वांना बोलावून घेतले. सर्वांनी पाहिले. सर्वांनाच आश्चर्य वाटले. असा योगी आम्ही कोणी पाहिला नाही की जो बेशुद्धावस्थेत पण जप करीत आहे. तुम्ही पण नीट बघा. ते अजूनही पूर्ण बेहोशीत आहेत पण हातातील माळ व्यवस्थित फिरत आहे. बाहेरच्या जगाचे कसलेच भान नाही. त्यांना कोणत्याही वॉर्डमध्ये किंवा रूममध्ये नेत नाही येथे असेच राहू द्या म्हणजे आमचा बाकीचा स्टाफ आणि येथे येणारे पेशंट व त्यांचे नातेवाईक पण दर्शन करू शकतील. ते भानावर आल्यावर मला सांगा. तसे कळवा असे म्हणून सर्जन दुसऱ्या ऑपरेशनसाठी निघुन गेले. ते दोन्ही तरूण

आमच्याजवळ थांबले. त्यांच्या सांगण्यानुसार आम्ही स्ट्रेचरवरच होतो. अनेक लोक दर्शन करून जात होते. हात जोडून शिर नमवून वंदन करून जात होते. आम्ही ज्यावेळी डोळे थोडे थोडे उघडले तेव्हा दोन-तीन नर्स आमच्यासमोर हात जोडून उभ्या होत्या आणि त्यांच्याकडे बघून बेहोशीतून बाहेर आल्यावर आमच्या तोंडून पहिले शब्द बाहेर पडले, *''या देवी सर्व भुतेषु मातृरूपेण संस्थिता। नमस्तस्यै। नमस्तस्यै। नमस्तस्यै नमो नम: ।* असे म्हणत आम्हीच त्या नर्सना हात जोडून वंदन केले. कांही वेळाने पूर्ण भानावर आलो. सर्जनला तशी सुचना दिली गेली. ते आल्यावर हात जोडून वंदन करीत म्हणाले, स्वामीजी माझ्या एका विनंतीचा स्वीकार करावा. माझ्या कॅबिनमध्ये चला एक कप कॉफी घ्या, मग जा. आम्ही केबिनमध्ये गेलो. त्यांनी पुन्हा सगळे नीट तपासले. कॉफी पिण्याइतकी तब्येत व्यवस्थित आहे बघितल्यावर मग कॉफी मागवली. कॉफी पिऊन झाल्यावर त्यांनी आमच्या हातावर एक वस्तू ठेवली. म्हणाले, स्वामीजी २-३ दिवस तरी सांभाळावे लागेल. तुम्ही पायांत कांही घालत नाही हे मला या दोघांनी सांगितले. पण जखमेवर बाहेरून धुळ बसू नये, ओली होऊ नये म्हणून फार नाही तर दोन तीन दिवस पायमोजे तरी घाला. मी मागवून ठेवले आहेत. घ्या. त्या सज्जन सर्जनचे मन मोडवेना. आम्ही ते स्वीकारले. त्यांचे डोळे पाणावले.

आता तरसाड्यातील तिसरा प्रसंग सांगतो. आंबाघाटा आश्रम सोडून आम्ही तरसाड्याला आलो. त्यावेळी आश्रमनिर्मित संदर्भात तो राहण्यासारखा होत नाही तोपर्यंत आमचा बाहेरचा प्रवास विशेषत: महाराष्ट्रात खूप वाढला होता. गृहस्थाश्रमाच्या नात्याने आमचे एक आत्येभाऊ होते. रामचंद्र बेटावदकर, ते विरारला राहात होते. त्यांनी महाराष्ट्राच्या थोर समाजसेविका ताराबाई मोडक आणि गुजराथी समाजसेवक गिजूभाई बधेका ज्यांच्या मातृवत्सल स्वभावामुळे लोक त्यांना 'मुछाला बा' (मिशा असलेली आई) म्हणायचे. त्यांच्या बरोबर डहाणूरोड भागात कोसवाड येथे आदिवासींसाठी खूप मोठे समाजकार्य केले. तेथे प्राध्यापक म्हणून शिकवत पण होते. पुढे कांही सांगण्याआधी त्यांच्या संदर्भात एक गंमत सांगतो, गुरूमहाराजांच्या आज्ञेने संन्यासपूर्व भिक्षा घेण्यासाठी आम्ही सर्वच नातेवाईक-इष्टमित्रांकडे गेलो होतो. तसे त्याच्याही घरी गेलो होतो. वयाने ते आमच्यापेक्षा बरेच मोठे म्हणजे निदान पंधरा वर्षांनी तरी मोठे. त्यांची सगळी जीवन कहाणी मोठी प्रेरणादायी आणि विलक्षण आहे. पण विषयांतर होईल म्हणून सांगत नाही. जवळचं नात होतं तरी त्याच्या पत्नी मुलांशी आमची कधी भेट झाली नव्हती. ओळख पण झाली नव्हती. आम्ही भिक्षेसाठी त्यांच्या घरी गेलो त्यावेळी हे बंधू त्यावेळचे एक मोठे नेते व्ही. पी. सिंगच्या रॅलीसाठी दादर शिवाजी पार्कला गेले होते. आम्ही विरारला त्याच्या घरी पोहोचलो. बेल वाजवली, दार उघडले. दारात एका साधूला बघून त्यांची पत्नी थोडीशी घाबरली, गोंधळली. पण आम्ही त्यावेळी विचारले रामभाऊ घरी आहेत? त्यांचे नांव उच्चारल्यावर ती थोडी स्थिरावली, सावरली. म्हणाली, ते घरी नाहीत, आपण कोण? आम्ही म्हणालो, आम्ही आता साधु ब्रह्मचारी आहोत. नांव सवितानंद. पूर्वाश्रमीचे नांव सांगू शकत नाही. एवढेच सांगतो आम्ही बेटावदचेच. त्या बाईने पटकन आमचे पूर्वाश्रमीचे नांव उच्चारून विचारले, तुम्हीच ना ते? आम्ही म्हटले हो! मग तिने खूप आदराने आंत बोलावले. म्हणाली, आमच्या मुलांना ते नेहमीच तुमच्याबद्दल सांगत असतात. मॅट्रीकनंतर घर सोडल्यापासूत ते M.Sc.

पर्यंतचे शिक्षण-नोकरी वगैरे. तुमच्या वागण्याबद्दल, स्वभावाबद्दल खूप आदराने मुलांना सांगत असतात. त्यामुळे तुमच्या पूर्वाश्रमीच्या नांवाने आम्ही सर्वच परिचित आहोत. आत बसल्यावर विचारले काय घेणार? आम्ही उत्तरलो आता फक्त पाणी. रामभाऊ आल्यावर परत येऊ त्यावेळी घेऊ. सुमारे तीन तासानंतर आम्ही परत तेथे गेलो. रामभाऊ घरी आले होते. त्यांनी आम्हाला कॉटवर बसायचा इशारा केला. आम्ही बसल्यावर ते पण आमच्या शेजारी येऊन बसले. अगदी मांडीला मांडी लावून आणि विचारले, काय घेणार? आम्ही उत्तरलो, संन्यास घेण्यापूर्वी भिक्षा मागायला आलो आहोत. चहा, पोहे, दूध जे द्यायचे असेल ते द्या. पण दक्षिणा घेतल्याशिवाय कांही घेणार नाही. कारण आम्ही आता तुमचे बंधु नाही, साधु आहोत. कांहीतरी दक्षिणा द्यायलाच हवी. रामभाऊ उत्तरले, ''मी दक्षिणा वगैरे कांही देणार नाही, भिक्षा पण देणार नाही.'' आम्ही हसत आणि शांतपणे उत्तरलो ठिक आहे. मग आम्ही पण घोटभर पाणी पिऊन निघतो.

तेवढ्यात रामभाऊंनी आमच्याकडे चमकुन पाहिले आणि म्हणाले, ''तुमचा हात दाखवा'' आता ते तू वरून तुमच्यावर आले. आमचें दोन्ही हात शांतपणे निरखून पाहिले (आणि आम्हाला नंतर कळाले ते खूप मोठे हस्तरेखा तज्ञ आणि हस्तरेखावरून अचूक भविष्य सांगणारे उत्तम ज्योतिषी अभ्यासक होते.) आमच्या दोन्ही हातावरच्या रेखा पाहाता पाहाता अचानक त्यांचे डोळे भरून आले. हातावर गरम अश्रूंचे दोन थेंब पडले. त्यांनी आमचे दोन्ही हात अलगद सोडले. खाली उतरुन आमच्या पायाला दोन्ही हातांनी स्पर्श करून, वंदन करुन सतरंजी टाकून खाली बसले. पत्नीला व मुलांना हाक मारली. सगळ्यांनाच सांगितले वंदन करा. भिक्षेच्या झोळीत प्रत्येकाने थोडी थोडी रक्कम टाकली. पत्नीला म्हणाले, पोहे कर, साखर टाकून दुधही गरम कर. मग आमच्याकडे वळून म्हणाले, थोडे पोहे घ्या, दूध घ्या, मी दक्षिणा पण देईन. बोलताना कंठ दाटून येत होता. त्यांची पत्नी पण त्यांच्याकडे विस्मयाने पाहात होती, कसेतरी स्वत:ला सावरत म्हणाले, ''तुम्ही तुमच्या तोंडाने कांही सांगत नसला तरी तुमच्या हातावरच्या रेखा सांगतात तुम्ही कोण आहात. आधी मी तुमची क्षमा मागतो. माझ्याकडून नकळत मर्यादाभंग झाला. पूर्वीसारखेच लहान भाऊ समजत शेजारी मांडीला मांडी लावून बसलो.'' आम्ही म्हंटले, ''काय झाले सांगाल?'' त्यांनी उलट विचारले, ''आज रात्री माझ्याकडे मुक्काम कराल?'' आम्ही म्हणाला. रामभाऊ तुमची ही एकच खोली यातच तुम्ही चारही जण झोपणार. येथेच आम्हाला झोपणे कठीण जाईल''. त्यावर ते उत्तरले, ठिक आहे नंतर पुन्हा या. माझ्या अपार्टमेंटचे बांधकाम चालूं आहे. दोन-चार महिन्यात पूर्ण होईल. आम्ही लवकरच तेथे रहायला जाऊ त्यावेळी या. तेव्हा तुमची झोपण्याची व्यवस्था स्वतंत्र खोलीत करू. पण माझी ही अट आहे. माझ्याकडे रात्री मुक्कामाला आलात तरच सांगेन मी आता काय पाहिले ते.'' आम्ही म्हणालो, ''ठिक आहे येऊ पुन्हा कधीतरी''.

वरील घटनेनंतर दोन तीन वर्षांनी आम्ही प्रा. रामचंद्र बेटावदकरांच्या घरी जाण्याचे आयोजन केले. त्यांचे घर विरार पूर्वेला अगदी रेल्वे लाईनच्या कडेलाच होते. आम्ही विरार स्टेशनवर उतरलो. रूळ ओलांडून पलिकडे पूर्व विरारकडे गेलो. त्यांच्या अपार्टमेंटचे नांव ''मोहक''. लोकलने प्रवास करतांना पण सहज दिसते. जर रस्त्याने (सडक) जायचे ठरवले तर खूप मोठा अर्धवर्तुळाकार चक्कर मारावा लागला असता आणि ते ही

विचारत विचारत जावे लागले असते. म्हणून आम्ही रूळाच्या कडेकडेने चालायला सुरूवात केली. जवळ पण होते आणि कोणाला विचारायची गरज पण नव्हती. कारण लोकल ट्रेनमधूनच आम्ही ते नांव वाचले होते, इमारत पाहिली होती. रूळाच्या कडेला चालायला नीट जागा नव्हती, काटेकुटे, छोटी झुडूपे ती ही काटेरी अधिक, दगडधोंडे तशात थंडीचे दिवस आणि आम्ही तर अनवाणी. थोडावेळ थांबून निरीक्षण केले. लक्षांत आले एका लाईनवर लोकल वा इतर गाड्यांची अजिबात वाहतूक नव्हती. अगदी कधीतरी, केंव्हातरी गरज पडली तर वापरण्यासाठी ती अधिकची (Extra) लाईन होती. तशी खात्री झाल्यावर आम्ही शांतपणे दोन रूळांच्या त्या लाईन मधून चालायला लागलो. त्यात असलेल्या स्लीपरमुळे (लाकडीपट्ट्या) चालणे बरेच सोपे झाले होते. नेहमीप्रमाणे हातात स्मरणिका होती, मानसिक जप चालू होता, शांतपणे जप करीत चालत होतो आणि अचानक कोणाच्या खेकसण्याने, ओरडण्याने आम्ही भानावर आलो आणि बघतो तर काय आमच्या मागे फक्त आणि फक्त दहा-बारा फुटावर लोकल उभी होती. त्या लोकलचा चालक ओरडला, ''भानावर आहात की नाही? किती दूरपासून तीन-चार शिट्या वाजवल्या. गाडी हळू होती म्हणून ठिक. तुम्हाला एवढ्या शिट्या पण ऐकू आल्या नाही? लोकलचा आवाज पण ऐकू आला नाही? बहिरे आहात का? की आंधळे पण आहात? लोकल एवढी दहा फुटावर आली तरी कळाले नाही. आम्ही त्याला कांहीही उत्तर न देता ट्रॅकच्यामधून बाहेर पडून दोन्ही हात जोडून म्हणालो, ''भाऊ क्षमा करा, खरोखरच शिट्या पण ऐकल्या नाही... लोकलचा आवाज पण ऐकला नाही.'' आम्ही हात जोडले त्यावेळी बोटांत अडकून असलेल्या जपमाळेकडे त्याचे लक्ष गेले व आश्चर्याने त्याने विचारले, ''तुम्ही जप करीत होतात?'' आम्ही नुसती मान डोलवली, हलवली. आश्चर्य आहे. जपात तुम्ही एवढे तल्लीन की तुम्हाला लोकलचा आणि शिट्यांचा आवाज पण ऐकू आला नाही आणि मी एक दोन हाका मारल्या त्याही नाही. जोराने ओरडलो तेव्हा भानावर आलात. कमाल आहे असे म्हणत त्याने व त्याच्या सहकाऱ्याने हात जोडून अभिवादन केले. इंजिनच्या जवळ असलेल्या पहिल्या डब्यातील प्रवासी पण दाराशी येऊन हा प्रकार पाहात होते, ऐकत होते. त्यातील दोन तीन जणांनी लोकल थांबली होती म्हणून खाली उतरून धांवत येऊन वंदन केले. बाकीच्यांनी तेथूनच हात जोडून वंदन केले. लोकल हळूहळू सुरू झाली. डब्यातील प्रवाशांचे अभिवादन स्वीकारत आम्ही शांतपणे उभे होतो.

''स्वतःचे विस्मरण झाल्याखेरीज खऱ्या अर्थाने ईश्वराचे स्मरण होत नाही'' ही एकनाथांची उक्ती आचरणात आणणारे तीन अनुभव सांगितल्यावर स्वामीजी आमच्या सर्वांच्या आग्रहाने थोडे ध्यानाबद्दल सांगू लागले.

छपरा आश्रमात बाबांचे आणखीन एक संन्यासी शिष्य होते. ज्याचा उल्लेख **'सविता अर्घ्य'** मध्ये आम्ही खरे नांव न सांगता त्याच्या व्यवहारातल्या आणि मुर्खतापूर्ण वागणुकीने ''वैशाखानंद'' असे केले आहे. या वैशाखानंदाला झोप खूप प्रिय त्यामुळे त्याला अनेकदा बाबा रागवायचे व म्हणायचे, ''सोने के लिये साधु बना है या भजन के लिए।'' बाबा बऱ्याच वेळा दुपारी तर त्याला झोपू द्यायचेच नाहीत, सकाळी पण लवकर उठवायचे. हेच त्याचे दुर्दैव की तो शिष्य असुनही बाबांच्या आधी उठण्याऐवजी बाबांनाच त्याला हाक मारून उठवावे

लागायचे आणि त्यांत त्याला वैषम्य या गोष्टीचे होते की बाबा आम्हाला कधीच कांही बोलायचे नाहीत हे तो नेहमी बघायचा. त्याचे सकाळचे सर्व विधी आटोपून आंघोळ झाली की मग आम्ही उठून आमच्या कुटीतून बाहेर यायचो. आम्ही एवढ्या उशीरा उठूनही बाबा आम्हाला कधीच कांही बोलत नाहीत हा त्याला पडलेला नेहमीचा प्रश्न. पण एके दिवशी तो आमच्याजवळ आला आणि मनापासून क्षमा मागून म्हणाला, 'माझा खूप मोठा गैरसमज दूर झाला''. आम्ही फक्त त्याच्याकडे बघितले आणि खुणेनेच विचारले काय? त्यावर तो म्हणाला, या पंधरवाड्यात मी दोन गोष्टी बघितल्या. या पंधरा दिवसात मला रात्री नीट झोप आली नाही. तीन चार दिवसात माझ्या लक्षात आले की तुम्ही तर पहाटे अडीच वाजताच उठता. बाहेर जाऊन हात पाय धुवून तीन वाजताच ध्यानाला बसता आणि सुमारे साडेपाच वाजता पुन्हा बिछान्यावर आडवे होता. अडीच-तीन तास सिद्धासनांत. शांतपणे प्रगाढ ध्यानांत तुम्ही असतात. मी अधुन मधुन ३/४ वेळा येऊन डोकावून जायचो आणि दुसरी त्याहून मोठी गोष्ट मी ही पण पाहिली की बाबा त्यांच्या खोलीत जागे होऊन दारात येतात न येतात तोच तुम्ही तुमच्या कुटीचे हे फडताळ (बांबुच्या पट्ट्यांचे दार) उघडून दाराशी उभे राहातात, बघतात बाबा काय करीत आहेत. माझी खोली तर बाबांच्या खोलीला लागून. बाबा रात्री, अपरात्री पहाटे कधी ही उठले तरी मला कळायचे नाही, जाग यायची नाही.. बाबांनी हाक मारून उठवले तरच जाग येते. तुमची ही कुटी तर बाबांच्या कुटीपासून शंभर मीटरपेक्षा दूर. तुम्हाला कसे कळते की बाबा जागे झाले? उठले! बाबा दरवाज्यात यायच्या आधी तुम्ही तुमच्या कुटीच्या दरवाज्यात. बाबांच्या खडावांचा आवाज पण होत नाही. त्या आधीच तुम्ही कसे उठता? आम्ही त्याला कांही उत्तर न देता मौन राहून फक्त त्याच्या खांद्यावर थोपटले.

विषय निघालाच आहे तर आमचा ऋषिकेशचा दिनक्रम सांगतो. तेथेही आम्ही पहाटे अडीच वाजता उठायचो. आश्विन नवरात्री नंतरचे ते दिवस. तेथे चांगलीच थंडी पडायची. कांही झाले तरी हिमालयाच्या पायथ्याशीच ना ते! गंगेचे पाणी म्हणजे जणू बर्फाचे पाणी. आम्ही त्या थंडगार पाण्याने नियमाने रात्री अडीच वाजताच डोक्यावरून (रोजच) पाणी घेऊन आंघोळ करायचो (तेव्हा मुंडन केले नव्हते जटा होत्या). बरोबर तीन वाजता सिद्धासनात बसायचो. डोळे उघडायचो त्यावेळी सकाळचे सात वाजलेले असायचे. त्यानंतर चहा. महर्षी महेश योगींच्या शंकराचार्य नगरमध्ये आमचा मुक्काम होता. सकाळचा चहा झाल्यावर त्यांच्या आश्रमाच्या नियमानुसार एका मोठ्या सभागृहात सामुहीक ध्यान नऊ वाजेपर्यंत, नऊ नंतर चहा/दूध/अल्पोहार/फळ ज्याला जे हवे असेल ते. त्यातले कांही घेऊन दहा वाजता गंगा किनारी यायचो. साडेदहाच्या सुमारास गंगेच्या वाहत्या पाण्यात डुबकी मारून स्नान करून कुटीवर यायचो. साडेबारापर्यंत ज्ञानेश्वरी वाचायचो. दुपारी साडेबारा नंतर भोजन, एक नंतर तीन वाजेपर्यंत वामकुक्षी (झोप) तीन ते पाच-साडेपाच पर्यंत गंगाकिनारी असलेल्या वेगवेगळ्या आश्रमात दर्शन-सत्संग. याच मुक्कामात महान संत लक्ष्मणदास अवधूत व मस्ताराम बाबांचे दर्शन झाले. तेथे दर्शनासाठी अधुनमधुन जात असायचो. साडेपाच ते सात पुन्हा सभागृहात सामूहीक ध्यान. त्यानंतर रात्रीचा अल्पाहार. तो घेऊन कुटीवर परत येऊन थोडे-फार कांही वाचन/ चर्चा/ गप्पा. त्यानंतर पुन्हा रात्री दहाला ध्यानाला बसायचो. केव्हा उठायचो ते सांगता येत नाही. ऋषिकेशला ज्या कुटीत राहात होतो त्याच

कुटीचा प्रसंग सांगतो. आम्ही त्या कुटीत रहायला जाण्यापूर्वी त्या कुटीत पूर्वी जे दोन तीन साधु राहून गेले त्यांनी आम्हाला मनाई केली की तुम्ही या कुटीत जाऊ नका त्यात एका पिशाच्चाचा वास आहे म्हणून तर आम्ही ती कुटी सोडली. आम्ही फक्त हसलो. आम्हाला ती कुटी खूप आवडली होती. कारण कुटीला लागूनच बेलाचे झाड होते. त्याची छाया त्या गोलाकार कुटीच्या छतावर पडायची आणि तेथून गंगामैय्याचे खूप छान दर्शन व्हायचे म्हणून आम्ही त्या कुटीत गेलो. पहिल्याच रात्री आमच्या लक्षात आले येथे खरोखरच कोणाचा तरी वास आहे. कोणीतरी कुटीत इकडून तिकडे फिरत, चालत आहे. आम्ही त्याला उद्देशून म्हणालो, ''अरे बाबा तू जो कोणी असशील आम्हाला कांही अडचण नाही. तू खुशाल येथे रहा, आमच्यामुळे तुला कांही त्रास नाही. तसेच तुझ्याकडून आम्हाला कांही त्रास नको.'' पण या कुटीत सांगितल्याप्रमाणे आमचे जस जसे जपध्यान वाढले तसे ते तरंग बदल त्या पिशाच्चाला असह्य झाले. एके रात्री आम्ही ध्यानातून उठून उभे राहिलो (खरे तर तो सगळा प्रसंग खूपच वेगळा आणि विलक्षण आहे पण त्याचा या विषयाशी संबंध नाही म्हणून येथे सांगत नाही.) आम्ही अजून स्वत:चा तोल सांभाळून नीट उभे राहात नाही तोच त्या पिशाच्चाने आम्हाला धक्का मारला. आम्ही स्वत:ला सावरू शकलो नाही. समोरच्या दगडी भिंतीवर डोके आपटले. उभे राहण्याचा प्रयत्न केला, पुन्हा धक्का असे ५/६ वेळा झाले. भिंतीला दगडी गोटे त्यामुळे आम्हाला चांगलाच मार लागला. कपाळावर दोन तीन ठिकाणी, डोळ्याखाली, गालावर, कानाखाली सगळ्याच ठिकाणी ५/६ जखमा झाल्या. (त्यापैकी अजूनही एक खूण आमच्या कपाळावर आहे.) सर्व चेहरा रक्ताळला. त्यावेळी रात्रीचे सुमारे अकरा वाजले होते. एवढ्या रात्री कुठे जाणार? आम्ही रक्ताळलेला चेहेरा धुतला. कोठे कोठे लागले आहे तेही बघितले. त्याकाळी आम्ही हाताने स्वयंपाक करून जेवायचो. (ते ही एक वेळ दुपारी) त्यामुळे आमच्या कुटीत तेल/तूप/हळद सर्व कांही होते. आम्ही चांगल्या तुपात हळदीची पावडर कालवून सर्व जखमांवर लावली. सकाळी आश्रमातील सर्व साधु संन्याशांना कळाले. सगळेजण आमच्या कुटीकडे धावले. त्यानंतरच्या बाकीच्या गोष्टी याच संदर्भात खूप आहेत. पण विषयांतर होईल म्हणून सांगणे टाळतो. संध्याकाळी आम्ही जपाला बसलो आणि त्या पिशाच्चाला म्हणालो, आता तू येथे राहू शकणार नाहीस. तुझ्या समोर दोन पर्याय आहेत. एक आम्ही संकल्प करून आजचा एक दिवसाचा जप तुला देतो, जेणेकरून तू या पिशाच्च योनीतून सुटशील व दुसरा आम्ही नुसता मंत्रोच्चार करून तुला बाहेर फेकून देऊ. पिशाच्चाने आम्हाला विनंती केली की मला या योनीतून मुक्त करा, आम्ही त्याला एक दिवसाचा जप दिला. तो त्या योनीतून सुटला.

हे सगळं ऐकून आम्ही स्वामीजींना म्हणालो, स्वामीजी आम्ही तर कल्पना तर करू शकत नाही.. की फक्त एका दिवसाच्या जपाने एक जीव पिशाच्च योनीतून मुक्त होतो मग ती जपसंख्या किती असेल? सगळेच अद्‌भुत अतर्क्य...

स्वामीजी पुढे म्हणाले, वैशाखानंदाच्या संदर्भात एक प्रसंग सांगतो, एकदा बाबा या वैशाखानंदाला घेऊन गुजराथमधील तीर्थस्थान खेडब्रह्माला गेले होते. आम्ही त्यावेळी गुजराथमध्ये आंबाघाटा आश्रमावर होते. आम्ही पण तेथे पोहोचलो. बाबांच्या एका शिष्याने मंदीर ट्रस्टच्या धर्मशाळेत दोन खोल्या राखीव केल्या होत्या.

एक खोलीत बाबा व दुसऱ्या खोलीत आम्ही व वैशाखानंद. बाबांना त्यावेळी कल्पना नव्हती की या दोघांसाठी एकच खोली आहे. रात्री नेहमीप्रमाणे आम्ही जप करीत ध्यानस्थ झालो. त्यावेळी आमच्या शरीरातून निघणारा चैतन्यप्रवाह वैशाखानंद सहन करू शकला नाही. त्याचा जीव कासावीस होऊ लागला. श्वास पण नीट घेता येईना. त्याच्या त्या धडपडीने आमच्या ध्यानावस्थेत खंड पडला. आमच्या लक्षात आले की काय घडले ते. आम्ही त्याला म्हणालो, तूं येथेच झोप आम्ही बाहेर जातो. दुसऱ्या दिवशी बाबांना हे कळाल्यावर बाबा वैशाखानंदावर रागावले की तू त्याच्या खोलीत झोपलाच का? त्याची चैतन्य शक्ती सहन करण्याइतका तू अजून पुढे गेला नाहीस. त्यानंतर खोली बुक करणाऱ्या शिष्यावर पण रागावले की तू सवितानंदाची वेगळी खोली का बुक केली नाही. हे सगळं ऐकून आम्हा सर्वांना प्रश्न पडला की एक संन्यासी, तो पण स्वामीजींचा गुरूबंधु चैतन्यप्रवाह सहन करू शकला नव्हता. त्यावेळी स्वामीजींची साधनेची स्थिती काय असेल? ... त्याकाळी कोणी गृहस्थाने स्वामीजींच्या खोलीत (स्वामीजी त्या गृहस्थाकडे मुक्कामाला असायचे तेव्हा) झोपायचा प्रयत्न करायचा तर त्याला ताप भरायचा. आता तो शक्तीप्रवाह स्वामीजींनी आतच जिरवला असावा असे वाटते.

आम्ही तर हे सगळे ऐकून आश्चर्यचकितच झालो. मनांत आले आपण थोडे कांही तरी जपध्यान करतो तरी आपल्याला वाटते आपण खूप कांही केले. यांच्या एक दशांशही आपण कांही करत नाही. अपेक्षा आणि अहं किती ठेवतो.

हे सगळे ऐकून मग मी बाकीच्यांकडे बघुन म्हणालो, मी दोन-तीनदा बाबांच्या जवळ छपरा आश्रमावर गेलो आहे. तेथे एकदा बाबांचे शिष्य सेवक श्री. रणजित सिंह आणि विरेंद्रजी भेटले. त्यांच्याशी गप्पा मारताना ते मला म्हणाले की, उदयभाऊ एकदा आम्ही बाबांना विचारले, बाबा तुमचे हे चार संन्यासी शिष्य आम्ही गृहस्थ. आम्हांला तर सगळे साधु-संन्यासी सारखेच व आदरणीय. तर हे चौघे सारखेच की यांच्यात काही फरक? **बाबा उत्तरले, ''बाकीचे हे सगळे फक्त साधु संन्यासी आहेत! सविता हा संत आहे. त्याच्या बाहेरच्या वागण्यावरून, चिडण्यावरून, रागावण्यावरून त्याच्याबद्दल भलता गैरसमज करून घेऊ नका. तो आतून संत आहे. त्याचे बाहेरचे वागणे परिस्थितीनुसार असते''.**

सुरूवातीला स्वामीजींच्या अथक प्रयत्नाने ज्या चार कुट्या बांधल्या गेल्या त्यांत पहिल्या कुटीत बाबा राहायचे. दुसरी कुटी बंद. बाहेरून कोणी आले तर त्याच्यासाठी तिसऱ्या कुटीत वैशाखानंद व चौथ्या कुटीत प्रबोधानंद. स्वामीजी कधीही पक्क्या कुटीत राहिले नाहीत. गवताच्या झोपडीत राहायचे. त्यांना एकच ध्यास. माँ चे मंदीर बांधुन त्यात माँ ची मुर्ती बसेल तोपर्यंत याच गवताच्या झोपडीत रहायचे. आम्ही सर्वांनी मग बाबांसाठी दुसरी एक मोठी वेगळी कुटी बांधली. बाबा तेथे रहायला गेले. त्यावेळी स्वामीजी तेथे नव्हते ते दक्षिण भारतात गेले होते. बाबांनी ती कुटी खाली केली लागलीच वैशाखानंदाने बाबांना म्हटले, मी त्या कुटीत राहतो. बाबांनी त्याच्याकडे वेधक नजरेने पहात म्हटले, 'तुझ्यासाठी नाही ती' बाबांनी स्वत:च्या हाताने तिला कुलूप लावले. किल्ली स्वत:जवळ ठेवली. एके दिवशी आम्ही सर्वांनी बाबांना विचारले, बाबा ती कुटी बंद आहे

त्यात कोण राहणार? बाबा उत्तरले, 'छोटे बाबा'. आम्हाला कळालेच नाही हे छोटे बाबा म्हणजे नेमके कोण? आम्हाला गोंधळलेले पाहून बाबाच म्हणाले, छोटे बाबा म्हणजे 'सविता' (बाबा स्वामीजींना सविताच म्हणायचे)

अशा या स्वामीजींशी माझी कशी भेट झाली त्याविषयी थोडक्यात सांगतो.

स्वामीजींच्या संपर्कात मी गेली चाळीस वर्षे आहे. स्वामीजींबद्दल अनेक अनुभव, अनेक चमत्कार व माझ्या अनेक शंका जिज्ञासांचे समाधान हे सगळं सांगितलं, लिहिलं तर एक स्वतंत्र पुस्तक होईल. त्यामुळे मी आता येथेच थांबतो. लेख पूर्ण करण्याआधी माझी आणि स्वामीजींची भेट केव्हा आणि कशी झाली ते सांगतो : जानेवारी ८२ मध्ये स्वामीजी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी संचालित हुरडा (जि. भिलवाडा-राजस्थान) येथील विवेकानंद विद्यालयात प्रवचनासाठी आले होते. तेथे अजमेरचे डॉ. श्रीकृष्ण शर्मा (जे कन्याकुमारीच्या मुख्य केंद्राशी संपर्कात होते) व केंद्राचे अजमेर विभागाचे कार्यकर्ते/प्रचारक श्री. श्रीराम आगाशे गेले होते. त्यांनी स्वामीजींना अजमेरला येण्याचा आग्रह केला. स्वामीजींनी त्यांची विनंती स्विकारली. ते अजमेरला आले. विवेकानंद केंद्रात त्यांचे प्रवचन झाले. त्यात त्यांनी पंचकोश आणि ऋतंभरा प्रज्ञावर फार सुंदर प्रवचन केले, विवेचन केले. सर्वांना समजेल अशा सहज सोप्या भाषेत व मला ते प्रवचन आवडले आणि त्यानंतरची प्रश्नोत्तरे सर्व पाहून ऐकून मला खात्री झाली की आपल्या वैफल्यग्रस्त-निराशावादी, हताश व द्विधा मनस्थितीतून हेच आपल्याला बाहेर काढू शकतील आणि मग दुसऱ्या दिवशी मी डॉ. श्रीकृष्ण शर्मांच्या बंगल्यावर पोहोचलो. स्वामीजींची भेट झाली त्यावेळी मला दर्शन वगैरे शब्दही माहित नव्हते म्हणून म्हटले भेटायला गेलो. स्वामीजींना मी पहिला प्रश्न विचारला, जीवनाचा उद्देश काय? ते सहज हसत उत्तरले, 'मोक्ष' मग मी माझ्या तर्कबुद्धीने त्यांना अनेक प्रश्न विचारले. प्रत्येक प्रश्नाचे ते छान उत्तर देत समाधान करत होते. मग मी अचानकच विचारले, ''माझी पण संन्यास घेण्याची इच्छा आहे''. स्वामीजींनी माझ्याकडे वेधक नजरेने पाहिले. ती नजर अशी जणू माझ्या अंत:करणाचा ठाव घेत आहे, माझ्या मनातले सर्व विचार वाचत आहे. स्वामीजींनी शांतपणे पण अंत:करणाचा ठाव घेणारे वाक्य उच्चारले, संन्यास घेण्यासाठी तू काय सोडून येणार आहेस? म्हणजे? स्वामीजींना बहुतेक करून माझी मनोदशा कळत असावी. ते म्हणाले, ते आधी सरकारी Class II ऑफिसर होऊन दाखव. तसे झाले की मग नोकरी सोडून आमच्याजवळ ये म्हणजे मग तुला संन्यास कां व कशासाठी घ्यायचा ते कळेल. मी काय व कां सोडून आलो ते कळेल. मग तू विचलित न होता खऱ्या अर्थाने साधना करशील.

मित्रांनो स्वामीजींचे एवढे शब्द माझ्या मनाचा ठाव घेत होते. त्यावेळची माझी मनोदशा काय होती ते सांगतो आणि माझ्या हे ही लक्षात आले की मी कांहीही न सांगताच त्यांना कळत होते. अंतर्यामी शब्द मी नुसता ऐकला होता आता प्रत्यक्ष अनुभवत होतो. माझे लहानपणापासूनचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व त्यामुळे मी इंग्रजीच्या शिकवण्यापण घ्यायचो. अभ्यासातही चांगल्यापैकी हुशार होतो पण माहित नाही काय व कसे घडले. मी बारावीला नापास झालो. मला स्वत:लाच विश्वास होईना की मी नापास झालो. त्याचा खूप आघात झाला

मनावर. तशातच आपली भारतीयांची सवय विशेषत: सहानुभूतीच्या नांवाखाली टोमणे मारायची, खोचक बोलायची. माझे नातेवाईक, मित्र-मंडळी व इतरांसमोर माझी स्थिती हास्यास्पद झाली होती. मी एकलकोंडा झालो. वैफल्य, निराशा, हताशा यामुळे यापुढे शिकायचेच नाही असे मी ठरविले होते. नक्की केले होते आणि स्वामीजी म्हणत होते तू क्लास टू ऑफीसर होऊन दाखव. मग सगळं सोडून ये. आम्ही तुला संन्यास दीक्षा देऊ.

त्यानंतर स्वामीजींनी मला खूपच सहजतेने आपुलकीने प्रेमाने समजवत या नैराश्यातून, हताशेतून बाहेर काढले आणि अचानकच स्वामीजी तेथे उपस्थित असलेल्या हुरडा विद्यालयातील शिक्षिकेला म्हणाले, ''आकाश में बादल छा गये है, कभी भी बारीश हो सकती है। अब इसको घर जानेको कहो।''. मला ते ऐकून आश्चर्यच वाटले. कारण बाहेर खूप ऊन होते. आकाशात ढगांचा पत्ता नव्हता. तरी स्वामीजी असं कां म्हणाले आणि मला येथून जायला कां सांगत आहेत? त्यावर ती शिक्षिका (नंतर लक्षात आले, कळाले स्वानुभवाने) म्हणाली, 'अच्छा ही होगा बारीश हो जायेगी तो उसमे उसका ही भलां होगा।'. पुन्हा माझ्या मनाचा गोंधळ अधिकच वाढला आणि मग स्वामीजींनी अचानकच माझ्या हातात त्यांनी लिहिलेली इंग्रजी कविता ठेवली. 'Gift of Mother' आणि ती कविता वाचता वाचता माझ्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. नंतर हुंदका दाटून आला आणि मी हमसून हमसून रडू लागलो. स्वामीजी करूणापूर्ण दृष्टीने माझ्याकडे पहात होते. थोड्या वेळाने मन शांत झाले आणि आता मला स्वामीजींच्या आणि त्या शिक्षिकेच्या संभाषणाचा अर्थ ही कळाला.

अंतर्यामी स्वामीजींना माझी मनोदशा आधीच कळाली की मी आता केंव्हाही रडून पडेल त्या अश्रूंच्या पुरात माझी निराशा हताशा, वैफल्य वाहून गेले. मनावरचा भार दूर झाला, मन हलकं झालं. मी पुन्हा पुन्हा ती कविता वाचली. मनाला शांती लाभली, हुरूप आला. मी शांत आणि प्रसन्न मनाने घरी परतलो. नंतर स्वामीजींच्या संपर्कात राहिलो. या घटनेनंतर वर्ष दीड वर्षानंतर स्वामीजी अचानक माझ्या घरी अजमेरला आले आणि सांगितले. आमच्या बरोबर गुरू महाराजांच्या आश्रमावर छपऱ्याला चल. स्वामीजींमुळे माझ्यात झालेल्या सकारात्मक बदलाने आईवडिलांनी पण त्यांच्याबरोबर जायला परवानगी दिली. मी बाबांच्या दर्शनाचा सद्भागी ठरलो इतकेच नव्हे तर सहसा कोणाला दीक्षा द्यायला हो न म्हणणारे, यथासंभव दीक्षा द्यायला टाळणारे निस्पृह बाबा स्वामीजींच्या नुसत्या विनंतीने मला दीक्षा द्यायला तयार झाले आणि माझी गुरूदीक्षा झाली.

जीवनाचा एक नवा आध्यात्मिक प्रवास सुरू झाला. स्वामीजींमुळे आणि बाबांच्या देहत्यागानंतर आता माझी आणि सौ. संगीताची साधना स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यज्ञानाम जप यज्ञोस्मिची वाटचाल चालू आहे. स्वामीजींचा गेली चाळीस वर्षापासून लाभलेला सहवास / मार्गदर्शन आणि आत्मीय संबंधामुळे मी माझे जीवन सफल झाल्याचे मानतो.

एवढेच सांगेन

धन्य मी। कृतार्थ मी।

Gift of Mother

Don't weep you little daughter
Come with me to holy mother
Don't dream the sorrow any more
Dance with joy every where
Let the people dance with you
Full of joy and blessing you
Bring the heaven on the earth
For them for whom life is a curse.
Sing the song pure and divine
Make the life happy and shine
Why do you think of death and suicide
Say them good by with happy cries.
For sorrow and pain where is the place?
Mother has sent you with her bless
Darkness of life and shadow will go away
Light and pleasure will be on your way the words have limit that is true
Love is an ocean and always new.
Life is not punishment, but a gift of mother
Enjoy the same when God is lover I have brought ring message of God
You are the bridegroom bride is a lord
To love is divine and to be loved is bliss
Not from the world but when mother will kiss

२. गुरूसेवा रत जे जीव

– गुरूमाऊलीची सरू

आश्विन नवरात्रीत आश्रमावर बरेच साधक जमले असता आपसातल्या चर्चेत योगेशभाऊ म्हणाले, जेव्हा मी पहिल्यांदा आश्रमावर मुक्कामासाठी येणार होतो तेव्हा मी माझ्या बाबांना प्रश्न केला. योगेशच्या बाबांची तुमच्यापैकी बहुतेकांची भेट झाली आहे. त्यांच्या साधनेबद्दल बोलण्याची आपली काय पात्रता? एकदा स्वामीजी म्हणाले होते, गुरूचरणी पूर्ण समर्पित हे शिष्योत्तम गृहस्थाश्रम आपल्या सनातन संस्कृतीच्या प्रमाणे करीत साधनेच्या उत्तम स्थितीत आहेत. अशा श्रेष्ठ मार्गदर्शकाला त्यांच्याच पुत्राने विचारले, बाबा मी पहिल्यांदाच आश्रमात जाणार आहे तर तेथे कसे राहिले पाहिजे? सेवा कशी केली पाहिजे? त्यावर आबांनी महाभारतातील द्रौपदी-सत्यभामाचा प्रसंग सांगितला. खरे तर प्रत्येक साधकाने मुळातूनच तो संवाद वाचला पाहिजे, अभ्यासला पाहिजे. सत्यभामेने द्रौपदीला विचारले, तू तुझ्या पाच पतिंना कसे खुश ठेऊ शकते? प्रसन्न ठेवते? कशी सेवा करते? त्यावर द्रौपदीने दिलेले सविस्तर उत्तर प्रत्येकाने वाचावे. त्यातले एक महत्वाचे वाक्य 'मी पति निजल्यानंतर निजते आणि पति उठण्याच्या आधी उठते.' योगेश तुला आश्रमावर राहतांना हा पहिला नियम पाळला पाहिजे की तू स्वामीजी झोपल्यावर झोपायचे आणि स्वामीजी उठायच्या आधी उठायचे. स्वामीजींच्या स्नानाआधी तुझे स्नान झाले पाहिजे, तरच तू इतर सेवा करू शकशील. त्यानंतर बरीच चर्चा झाल्यावर आम्ही सर्व साधकांनी स्वामीजींकडे मोर्चा वळवला. स्वामीजी आपण आता आम्हाला सेवा-सेवाधर्म आणि तुम्ही बाबांची सेवा कशी केली ते काही महत्वाच्या प्रसंगासह, घटनांसह सांगा. स्वामीजींनी योगेशने केलेली चर्चा ऐकलीच होती. सकाळच्या पूजा-पाठ-अभिषेकानंतर हवन आणि त्यानंतर सप्तशतीचे पाठ, पूर्ण उपवास त्यामुळे स्वामीजी स्वाभाविकच शरीराने कांहीसे थकलेले होतेच. स्वामीजी स्वत:बद्दल सहसा कांही सांगत नाहीत. पण आम्हा सर्वांचा 'बालहट्ट' पुरविण्यासाठी सांगायला सुरूवात केली.

बाबांच्या (श्री शक्तिबालक परमहंस) दिव्य प्रखर तरंगामुळे आश्रमावर कोणीही आलं तरी त्यांची ही शक्ती आपोआपच उर्ध्वगामी होऊ लागायची. आम्ही तर सतत चोवीस तास बाबांच्या सेवेत – सहवासात. त्यामुळे ज्या वेगाने शक्तीचे उर्ध्वगमन झाले साधनेची तीव्र प्रगती व्हायची त्याप्रमाणे शरीर बदलत नसे. साधना पण भोजनासारखी पचायला हवी. शरीरातील अंतर्गत बदलाव, क्षमता त्यामानाने इतक्या लवकर बदलत नाही. त्यामुळे अधून-मधून आमची प्रकृती बिघडत असे. अर्थात ताप, सर्दी, खोकला, इतर आजार नव्हे पण मुख्यत: पचनक्रिया बिघडायची. पोट बिघडायचे. आव/अमांशचा त्रास वाढायचा अशीच एकदा तब्बेत बिघडली होती, विश्रांती घेत पडून होतो. त्याच काळात भगवतीने मोठी कृपा केली. आम्हाला ती एखाद्या चित्रांच पुस्तक किंवा नकाशांचा ॲटलास दाखवावा तसे कोणत्या साधना पद्धतीने कशी प्रगती होईल, कोणत्या मार्गाने होईल, काय अडथळे येतील आणि साधना पुर्णत्वाला जायला साधारणत: किती काळ जाईल हे सर्व कांही सविस्तरपणे दाखवत होती. माँ भगवती नंतर म्हणाली, *'सर्वश्रेष्ठ साधना सेवाच आहे'* आणि त्याच क्षणी आमच्या समोर

सुवर्ण अक्षरांत अत्यंत दैदीप्यमान चार ओळींचा श्लोक, सेवेचा मंत्र प्रकट झाला. आम्ही तो अत्यंत तेजाने तळपणारा-झगमगणारा मंत्र वाचला पण नंतर लिहू असे ठरवले पण. परंतू प्रकृतीने दगा दिला. मंत्र लिहू शकलो नाही. कारण त्यानंतरचा थोडा काळ काहीशा ग्लानीत, कांहीसा बेहोषीत गेल्याने मंत्र स्मरणात राहिला नाही आणि असे दोनदा घडले. दोन्ही वेळा लिहू शकलो नाही आणि इजा-बिजा-तिजा म्हणीप्रमाणे जे दोनदा घडले ते तिसऱ्यांदा घडेल अशी आशा मनांत बाळगून बाबांजवळ हा विषय काढल्यावर बाबांनी प्रसन्नतेने आशिर्वाद देत म्हटले, यथायोग्य वेळी तो मंत्र पुन्हा एकदा तिसऱ्यांदा तुझ्यासमोर प्रकट होईल. त्यावेळी तू लिहू शकशील. माझ्या बंधुभगीनींनो आता येथेच मी तुम्हाला विदुषी संस्कृतच्या प्रकांड पंडिता विमलाताई पवनीकरांचे स्वामीजींबद्दलचे उद्‌गार जे कपीलभाऊंनी त्यांच्या लेखात लिहिले आहेत. त्याची आठवण करून देते. प्रसाद प्रकाशनाच्या कार्यक्रमात पण स्वामीजींची ओळख आधुनिक ऋषी म्हणून करून दिली जायची. परिमलताईंनी पण त्यांच्या लेखात तसेच म्हटले आहे आणि आमच्या शास्त्रात पण म्हटले आहे. **चिंतन मनन करतात ते मुनी आणि अशा मुनींपैकी ज्यांना मंत्र प्रकट होतात ते ऋषी.** आपल्या स्वामीजींना पण दोनदा मंत्र प्रगट झाला. आपल्या सर्वांचे दुर्दैव की तो मंत्र आपल्या कडे लेखी स्वरूपात आला नाही. बाबांच्या आशीर्वादाने माँ च्या कृपेने पुन्हा कधीतरी येईलच असा आपण विश्वास ठेवू या. चला हे थोडे विषयांतर झाले तरी त्याची पण गरज होतीच.

स्वामीजी पुढे म्हणाले **सर्वश्रेष्ठ साधना 'गुरूसेवा' हीच आहे. पण ती तशी सोपी पण नाही;** असे सांगत स्वामीजींनी सहजगत्या रामचरित मानसमधील भरत आणि लक्ष्मणाचा प्रसंग व ते दोहे सांगितले. रामचरित मानसमध्ये संत तुलसीदास भरत अयोध्येचे राज्य न स्वीकारता रामाला भेटण्यासाठी वनात जायला निघाला त्यावेळी पायी चालताना जेथे जेथे रामाची पदचिन्ह दिसतील तेथे तेथे मस्तक टेकवत वंदन करीत पुढे जात होता. त्यावेळी भरत म्हणतात- *'सिरभर जाऊ उचित अस मोरा। सबते सेवक धरमु कठोरा'* (अयोध्याकांड दोहा २०३) अर्थात मी जमीनीवर डोके टेकवून शिर्षासन करून चाललो तरी ते कमीच आहे. कारण सेवक धर्म खूप कठीण आणि कठोर आहे. संस्कृतमध्ये पण एक श्लोक असाच आहे ज्याचा अर्थ आहे की, सेवा धर्माचे रहस्य योग्यांना देखील लवकर ज्ञात होत नाही एवढा तो गहन आहे. रामचरित मानसमध्ये दुसऱ्या प्रसंगात शूर्पणखा आधी रामाजवळ आणि नंतर लक्ष्मणाजवळ जाऊन लग्नासाठी गळ घालते त्यावेळी लक्ष्मण तिला म्हणतो माझ्याशी लग्न करून तू सुखी कशी होणार? कारण मी स्वत: रामाचा सेवक आहे आणि सेवकाने कधीच स्वत:च्या सुखाचा विचार करायचा नसतो. भोजन, निद्रा, स्वत:च्या सुखसुविधा यावर संयम नसेल तर तो सेवाच करू शकणार नाही. जसे भिकाऱ्याने मानसन्मानाची अपेक्षा करणे चुकीचे आहे तेथे चौपाई आहे. *सेवक सुख चह मान भिकारी* (अरण्यकांड ३.१७) पुढे चर्चा करण्याआधी दुसऱ्या दोन तीन गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. भगवान श्रीकृष्ण गीतेच्या नवव्या अध्यायात म्हणतात, जे माझे सतत स्मरण करतात अशा परम भक्ताच्या (योग क्षेमं वहाम्यहम्) योगक्षेमाची काळजी मी स्वत:च घेत असतो. समर्थ रामदास म्हणतात *आम्ही कुणाचे काय खातो रे। तो राम आम्हाला देतो रे।।* बाबा गुरूमहिमात लिहीतात *संत न चाहे कछु सेवा। किये हरे अज्ञान।* या सर्वांचे तात्पर्य एवढेच की कोणत्याही अधिकारी पुरूषाची-संतांची

सर्व काळजी ती परमसत्ताच, ती माँ भगवती स्वत:च घेते त्यामुळे त्यांना आपल्या कोणत्याही सेवेची काहीच आवश्यकता नाही. आपल्याला सेवा करायची आहे ती आपल्या कल्याणासाठी, आंतरिक शुध्दीसाठी, गुरूकृपा-ईश्वर कृपेला पात्र होण्यासाठी आपल्या मांगल्यासाठी, आत्मकल्याणासाठी आणि स्वाभाविकच सेवेत कोणताही आळस, प्रमाद, कंटाळा, टाळाटाळ, दिरंगाई, नंतर बघू, करू केव्हा तरी इत्यादी विचार साधकांसाठी घातक ठरतात. नुकसानकारी ठरतात. **सेवकासाठी-साधकासाठी तितिक्षा आणि तत्परता हे दोन गुण अत्यंत आवश्यक असतात.** प्रत्येकाने अर्जुनासारखे 'गुडाकेश' व्हायचा प्रयत्न करायला हवा. निदान बस्तीस लक्षणी पुरुषाच्या लक्षणात एक लक्षण आहे 'श्वाननिद्रा'. सेवा करणाऱ्या साधकाची श्वाननिद्रा असावी. बोलण्याच्या, खाण्याच्या दोन्ही बाबतीत जीभेवर संयम हवा, सेवा स्वत:च्या हितासाठी करायची असते. आपण केलेली सेवा इतरांना सांगू नये. काय व कशी सेवा केली याचे वर्णन तर टाळावेच आणि त्याचबरोबर मी हे करतो तू ते कर असेही सेवेला कुणाला भाग पाडण्याची संधी देऊ नका. गुरूसेवा कशी करायची याचे अतिशय भावपूर्ण वर्णन ज्ञानेश्वरी माऊलींने ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात 'आचार्योपासनाम्' शब्दावर टीका लिहीताना ९९ ओव्यात सविस्तर वर्णन केले आहे. साधकांनी ते मूळातून वाचावे, चिंतन मनन करून आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. रामदास स्वामींच्या प्रिय शिष्याचे नाव कल्याण. समर्थांनी स्वत:च ठेवले, त्याचे मूळनाव दुसरेच होते. केवळ मनोभावे सेवा करून त्याने सगळे प्राप्त करून घेतले. तसेच संत एकनाथांचे शिष्य गावबा, उपनिषदात धौम्य शिष्य अरूणी, उपमन्यु यांची नावे येतात अजूनही अशी अनेक उदाहरणं आहेत.

आता सेवेचे मर्म समजून घेण्यासाठी काही गोष्टी नीट समजून घ्या. शरीर हे सेवा करण्याचे फक्त माध्यम आहे. शरीराने काम होते सेवा नाही. **हे काम सेवेत बदलवा हृदयातील प्रेमाने-समर्पणाने**. समर्पण नसले, हृदयात प्रेम नसले तर ती फार तर शारिरीक गुलामी होईल सेवा नव्हे. कोणताही गुलाम जो गुलामी करतो तो करीत असलेल्या कामाने त्याची यत्किंचितही आंतरिक शुद्धी होत नाही कारण हृदयात प्रेम नाही समर्पण नाही. यासंदर्भात आमचे काही अनुभव सांगतो-

वर सुरूवातीला आले आहेच की बाबांच्या निकट सान्निध्याने, त्यांच्या प्रखर चैतन्य शक्तीने आमच्या चैतन्य शक्तीचे उर्ध्वगामित्व व्हायचे त्याच्यानुरूप शरीर तितक्या झपाट्याने बदलत नाही त्याला वेळ लागतो. म्हणून आम्ही अधुनमधून पोटाच्या तक्रारीने आजारी पडायचो. अशीच एकदा तब्येत बिघडली. बाबांनी त्यांचे एक सेवाधारी जेष्ठ साधक रामविलास गुप्तांना कळवले. ते आम्हाला त्यांच्या घरी घेऊन गेले. आश्रम शहरापासून ३ कि.मी. पेक्षा अधिक दूर असल्याने डॉक्टरांनी रामविलासजींना सांगितले तुमच्या घरीच राहू द्या. तिसऱ्या दिवशी संध्याकाळी बाबांचा एक शिष्य आश्रमवासी ज्याचा उल्लेख सविता अर्घ्यातील एका लेखात वैशाखानंद म्हणून केला आहे. त्या वैशाखानंदाला बाबा म्हणाले की, तू सवितानंदाला विचारून घे की तो आज संध्याकाळी आश्रमावर परत येणार आहे का? तो येणार असेल तरच बाबा अढुपूरला (आश्रमापासून १५-२० कि.मी. दूर गाव) त्यांच्या शिष्याच्या आग्रहाने मुक्कामला आज जातील. वैशाखानंद रामविलासजींच्या घरी आला तो काही विचारण्याच्या आत, तोंड उघडण्याच्या आधीच आम्ही म्हणालो, ''बाबांना सांग आम्ही आज संध्याकाळी आश्रमात परत येत आहोत. आपणास अढुपूरला जाण्यास हरकत नाही.'' वैशाखानंद आश्चर्याने तोंड वासून

आमच्याकडे पहातच राहिला आणि नंतर काही क्षणांनी भानावर येऊन विचारले तुम्हाला काय माहित मी हेच विचारायला आलो होतो. आम्ही काहीच उत्तर न देता सहज हलकेसे हसलो हेच उत्तर. आश्रमावर परतल्यावर बघतो तर काय बाबांनी जाण्याची तयारी करून ठेवली होती. बाबा त्याला म्हणाले सविता येतो आहेच म्हणून आम्ही जाण्याची तयारी केली. गाडी आता येईलच. वैशाखानंद गोंधळला; त्याने बाबांना विचारले ''अगर बिना कुछ बताये, कुछ पुछे आप दोनो परस्परकी बात जान जाते हो तो मुझे वहाँ भेजा क्यु?'' जाऊन येऊन सहा किमी चालल्याने तो वैतागला होता. बाबा त्याच्याकडे वेधक नजरेने पहात म्हणाले की, ***''तुझे ये समझाने के लिए की, सेवा शरीरसे नहीं होती।''***

अशीच एका वैशाख महिन्यातली गोष्ट. खूप कडक ऊन पडलं होतं. आश्रमाच्या निर्माण कार्यासाठी परिचित व्यापाऱ्यांकडून आर्थिक सेवा मिळवण्यासाठी आम्ही सकाळीच आश्रमावरून छपरा शहरात यायचो. त्या दिवशी असेच आलो होतो बाबांच्या एका शिष्याकडे (गृहस्थ गुरूबंधू) भोजन घेतले. त्या दिवशी सिमेंटसाठी कलेक्टर कचेरीत जायचे होते. दुपारचा जवळ जवळ एक वाजला होता. ऊन तापलेलं. आम्ही सायकलवर होतो. आश्रमापासून ३ कि.मी. पेक्षा अधिक दूर. अचानक बाबांचा संदेश मिळाला ***''सविता बाबाको प्यास लगी है आश्रमपर आवो।''*** आम्ही तशीच सायकल वळवली. झपाट्याने आश्रमावर पोहचलो. बाबांच्या खोलीत गेलो. बाबा डोळे मिटून शांत बसले होते. त्यांचा कमंडलु बघितला त्यात पाणीच नव्हते. पाणी आणले, बाबांना दिले, पाणी पिऊन झाल्यावर बाबा म्हणाले, ''उन दोनो को बुलाओ'' आश्रमावर वैशाखानंद आणि आणखी एक वयस्कर संन्यासी शिष्य प्रबोधानंद होते. त्यांना सांगितले, ''बाबांनी तुम्हाला बोलवले आहे.'' ते दोघे बाबांसमोर गेले आणि बाबा त्यांच्या नेहमीच्या सौम्य प्रेमळ आवाजाऐवजी अगदी तीक्ष्ण धारदार आवाजात त्या दोघांना म्हणाले, ''तुम दोनो सवितानंद की केवल ईर्षा करते हो, तुम्हे लगता है बाबा तुम दोनोपर ध्यान नहीं देते, सवितानंद दुलारा है इसीलिए उसकी साधना तेजीसे बढती है। अब सुनो तुम इसी आश्रम में सौ मीटर से भी कम दूरीपर हो। तुम दोनोको बाबाने तीन तीन बार अंदरसे कहा बाबाको प्यास लगी है पानी लाओ तुम दोनोको पता नहीं लगा और यहाँसे ३ किमी से भी ज्यादा दूर सविताको बाबाने केवल एकही बार कहाँ और वह यहाँ आ पहुचाँ।''

याच उन्हाळ्यात बाबांचे काही गृहस्थ शिष्य दुपारी तीनच्या सुमारास बेलफळ आणि इतर एक दोन वस्तू ज्या उन्हाळ्यात सरबतासाठी कामास येतात ते घेऊन आले होते. त्यापैकी एकाने बाबांना विचारले, ''बाबा शरबत बनाके लावू?'' बेल का? सत्तूका? या फल के रस का ? बाबांना उलट त्यालाच विचारले, ''तुमको और बाकी सबको किस चिजका शरबत पिना है?'' सगळ्यांनी एकमेकांकडे पाहिले व म्हणाले, ''सत्तू का'' (सत्तू म्हणजे आपल्याकडे जसे ज्वारीचे लाह्यापीठ असते तसे हरभरे शेकून केलेले) एका शिष्याने बाबांना विचारले, ''मैं बनाके लावू?'' बाबा त्याच्याकडे बघून हसले व म्हणाले, ''सविता ले आएगा'' सगळ्यांनी गोंधळून बाबांकडे पाहिले. त्यापैकी एकजण हिंमत करून म्हणाला, ''बाबा सवितानंद येथे जवळपास कोठे दिसत नाही, त्याला सांगायला जाऊ?'' ''नाही येईल तो.'' ''पण बाबा त्याला काय माहिती की, आपल्याला आता सरबत प्यायचे आहे आणि ते पण सत्तूचे'' बाबांनी काही उत्तर न देता फक्त त्यांच्याकडे बघून सहज हलके

हसले. तेवढ्या वेळात आम्ही सत्तूचे सरबत (सर्वांसाठी) घेऊन बाबांच्या कुटीत पोहचलो. सत्तूचेच सरबत आणि जेवढे उपस्थित होते तेवढे प्याले घेऊन आम्ही पोहचलो. सर्वजण आश्चर्याने आमच्याकडे पहात राहिले. बाबा त्या सर्वांना एवढेच म्हणाले, **''सांगून केले जाते ते काम, न सांगता होईल ती सेवा.''**

छपरा शहरातील बाबांची एक दिक्षित साधिका. तिच्या दोन्ही मुलांची मुंज होती म्हणून सकाळीच गाडी घेऊन बाबांना घेऊन गेली. अर्थात आम्ही बरोबर होतोच. संध्याकाळच्या आधी बाबांच्या आदेशाने आश्रमावर परतलो. आम्ही परतल्यावर वैशाखानंद म्हणाला, ''मैं जाऊ वहाँ ?'' आम्ही म्हणालो, ''तुझे तू जाण बाबांनी तसे काही सांगितले नाही'' तरी तो निघून गेला. परत आला त्यावेळी रात्रीचे साडेनऊ वाजले होते. आम्ही आमच्या कुटीच्या दारात बसलेले पाहून तो आश्चर्यात पडला. त्याने विचारलं, ''दूध घेतल ?'' आम्ही म्हणालो, ''नाही, बाबांसाठी राहू दिले आहे.'' तो म्हणाला, ''बाबांसाठी ?'' ''बाबा तर आतापर्यंत दूध घेऊन झोपले पण असतील.'' आम्ही थंड आवाजात म्हणालो, ''आम्ही बाबांची वाट पहात आहोत. बाबा आश्रमावर परत येत आहेत.'' तो म्हणाला, ''काहीतरीच काय ? मी बाबांच्या पायांना तूपाने मालिश केले त्यानंतर बाबा झोपायची तयारी करत होते. बाबांचे अंथरूण लावून झाले होते. उद्या मौंजीचा कार्यक्रम. बाबा त्यासाठीच तर गेले आहेत. मग आता आणि या भलत्या वेळी आश्रमावर कशाला परत येतील ?'' आम्ही थोड्या रूक्ष आवाजात म्हणालो, ''तुला झोपायचे असेल तर जाऊन झोप. आम्ही बाबांची वाट पहात थांबणार आहोत.'' आमच्याकडे विचित्र नजरेने (जणू काही आम्ही पागल-वेडे झालो आहोत) पहात वैशाखानंद झोपायला निघून गेला.

जेमतेम अर्ध्या तासातच बाबा आश्रमावर पोहचले. बाबांची स्थिती पाहून आमच्या छातीत धडकीच भरली. रडू कोसळले. कारण बाबा त्यांच्या पायावर उभे पण राहू शकत नव्हते. बाबांना कारने आणले होते आणि दोन शिष्यांनी त्यांना उचलून त्यांच्या कुटीत आतमध्ये नेऊन झोपवले. बाबांना कुटीत झोपवून एक ज्येष्ठ शिष्य द्वारिकाप्रसादजींनी बाहेर येऊन आम्हाला घट्ट मिठी मारली आणि हुंदके देत रडत रडत म्हणाले, ''सवितानंद अब सब कुछ आपके हाथमें है।'' आम्ही त्यांना शांत करीत धीर देत म्हणालो, ''काय झाले ते तर आधी सांगा''. ते म्हणाले, मला सगळं नीट माहित नाही. पण बाबा ज्यांच्या घरी होते तेथून एकजण धावत माझ्या घरी आला (चार पाच घरांचेच अंतर होते) आणि म्हणाला, ''लवकर चला, बाबांची तब्येत बिघडली आहे. तुम्हाला बोलवत आहेत.'' मी पटकन गेलो. मला पाहून बाबा म्हणाले, ''कमरेपासून खालचा भाग अचेतन निर्जीव झाला आहे. बाबा उभेही राहू शकत नाहीत. लवकरात लवकर आश्रमावर सवितानंदजवळ पोहचवा. तोच आता सांभाळू शकेल. अन्यथा येथेच बाबांचे शरीर सुटेल''. त्यावेळचे रात्रीचे दहा वाजले होते. न्यायला साधन तरी काय ? सायकल रिक्षात आणणे शक्यच नव्हते. दुसरं कांही साधन नव्हत, पण मला आमच्या नातेवाईकांकडे त्याचवेळी लग्नासाठी जायचे होते. मनांत आलले वरात आली आहे तर कोणाची तरी कार असेलच आणि तसेच झाले. धांवपळ करून लग्नघरी पोहोचलो. कार मागितली आणि दोघांनी उचलून बाबांना आत ठेवून येथे आणलं. आम्हाला यातलं कांही कळत नाही. आता सगळं कांही तुमच्या हातात. आम्ही बाबांच्या कुटीच्या बाहेरच उभे राहून बोलत होतो. तेवढ्यात हा सगळा गडबड गोंधळ ऐकून कुंभकर्ण ज्याच्यावर प्रसन्न आहे तो वैशाखानंद आला बाबांच्या खोलीत जाणार तोच बाबा कडाडले. नेहमी शांत सौम्य

असणारे अगदी हलक्या आवाजात बोलणाऱ्या बाबांचे ते जमदग्नी स्वरूप, रौद्ररूप आम्ही पहिल्यांदाच पाहिले. बाबा त्या वैशाखानंदाला म्हणाले, ''बाबा के कुटीया में कदम भी नही रखना। जबतक बाबा नही बुलाऐंगे तब तक अंदर नही आना और अपना मुंह भी नही दिखाना, चले जाओ यहाँ से। (या घटनेनंतर जवळ जवळ महिनाभर बाबांनी वैशाखानंदला त्यांच्या खोलीत पाऊल पण ठेवू दिले नाही आणि त्याचे तोंडही पाहिले नाही)

त्याला हकलून देवून आलेल्या लोकांना रवाना केल्यावर आम्ही बाबांजवळ आलो. त्या आधीच आश्रमावर शेगडी पेटविण्यासाठी आणलेल्या गोवऱ्या एकत्र करून पेटवल्या. त्या जळत होत्या तोपर्यंत आम्ही बाबांच्या पायाशी बसून माँ ला प्रार्थना करीत गुरूमंत्राचा जप करीत बाबांचे पाय हळूहळू रगडत होतो. कमरेपासून पायाच्या तळव्यापर्यंत चेतना यावी म्हणून प्रार्थना करीत. बाबा पाय हलवू पण शकत नव्हते. अगदी चेतनाहीन निर्जीव अवस्था होती पायांची. बाबा हळूहळू आम्हाला सांगत होते. संध्याकाळी वैशाखानंद तेथे पोहचला. बाबांचे भोजन झाल्यावर बाबा बाहेर उघड्यावर कॉटवर आराम करीत पहुडले होते. आश्रमावर बाबांनी या वैशाखानंदाला कधीच त्यांच्या पायाची मालिश करू दिली नाही. आम्ही रोज रात्री बाबांच्या तळपायाला गायीच्या तुपाने मालिश करायचो आणि बाबा कायम मुंडन करायचे म्हणून टाळूवर पण मालिश करायचो. हे सर्व करताना जाणवायचे की बाबांच्या सर्वांगात मंत्रांची स्पंदने चालू आहेत. बाबा आमच्या शिवाय दुसऱ्या कोणाला कधीच मालिश करून द्यायचे नाहीत आणि या वैशाखानंदाने आपले हे नाव सार्थक करीत तेथील साधिकांकडून गायीचे तूप मागवले आणि तूपाची वाटी घेऊन बाबांजवळ आला. बाबा नको म्हणत असताना देखील वारंवार आग्रह करून पायाला मालिश करू देण्याची विनंती करू लागला. इतर परक्या लोकांसमोर मुंजीच्या त्या कार्यक्रमासाठी त्या साधिकेकडे आलेले तिचे नातेवाईक सर्व अपरिचित त्यांच्या समोर उगाच याचा पाणउतारा नको म्हणून शेवटी बाबा म्हणाले, ''कर थोडे''. त्याला तर त्या साधिकेवर व इतरांवर आपण किती सेवा करतो ते दाखवून इंप्रेशन पाडायचे होते. थोड्याच वेळात बाबांनी त्याला थांबायला सांगून आश्रमावर जायला सांगितले.

तो उठला पण तरी जाता जाता आपली फुशारकी दाखवत तेथे उभ्या असलेल्या सोळा अठरा वर्षाच्या दोन तरूण मुलींना म्हणाला, ''घ्या तुम्ही करा आता मालिश.'' बाबा नको म्हणाले. तेवढ्यात ती साधिका आली तिने पण बाबांना आग्रह केला. बाबा माझ्या भाच्या आहेत. दोघी चांगल्या संस्कारी मुली आहेत. करू द्या ना त्यांना सेवा. मुली पण आग्रह करू लागल्या. बाबा माँ ला म्हणाले, ''माँ तुझी लीला तू जाण. तुला काही खेळ करायचा दिसतो जशी तुझी मर्जी.'' दोन्ही मुली दोन बाजूला बसल्या. पायाला तुपाने मालिश करू लागल्या आणि अचानकच त्या दोघींच्या मनात कामविकार जागृत होऊन त्या काम विचारात रममाण झाल्या. त्यांच्या स्पर्शातून बाबांना तो विचार जाणवला. बाबांनी त्या दोघींना जायला सांगितले. पण त्या हट्ट करू लागल्या. पायापासून दूर होईनात. शेवटी बाबांनी आपली चेतना वर ओढली पण ती इतक्या झटक्यात अचानक वर गेली की कमरेपर्यंतचा भाग निर्जीव झाला. अजून ती वर उर्ध्वगामी होऊ पहात होती. कसे तरी बाबा ती कष्टाने कमरेच्या फार वर जाऊन सर्वांग निर्जीव करू नये म्हणून थांबवत होते. शेवटी बाबांनी त्या साधिकेला सांगितले आत्ताच्या आत्ता कसेही करून आश्रमावर सवितानंदाजवळ पोहचव. ती घाबरली, तिला काही सुचेना म्हणून

तिने चार पाच घरापलिकडे असलेल्या बाबांचे जुने दिक्षित साधक द्वारिकाप्रसाद गुप्तांना बोलावून घेतले. नंतर जे घडले ते वर दिले आहेच.

तेवढ्या वेळात पेटलेल्या गोवऱ्याची राख झाली होती ती हलकी गरम गरम राख आम्ही बाबांच्या मांड्यापासून तळव्यापर्यंत चोळू लागलो. मनात मंत्रही म्हणत होतो. अधून मधून बाबांशी बोलतही होतो. या परिस्थितीत बाबांच्या आत कोणतीही वृत्तीच न उरल्याने शरीर ठेवण्याचे प्रयोजनच वाटत नव्हते म्हणून त्यांच्यात कोणती तरी इच्छा जागवणे गरजेचे होते. असा प्रयोग आम्ही पूर्वी धनाबादला केला होता. त्यावेळी बाबांना व्याघ्रस्तुती व शक्तिकवच लिहायचा आग्रह करीत ती वृत्ती जागवली म्हणून त्यावेळी बाबा विदेही अवस्थेत जाण्यापासून थांबले. यावेळी आम्ही बाबांशी त्यांच्या जन्माच्या संदर्भात त्यांच्या आजोबांचा संकल्प सांगून बाबांच्या जन्मानंतर बाबांच्या जन्मगावी त्यांच्या आजोबांनी जेव्हा बालेश्वरीचे मंदिर एकट्यानेच उभारले त्याविषयी काही लिहावं म्हणून आग्रह करू लागलो. बऱ्याच वेळा नंतर आमच्या प्रयत्नांना यश आले. बाबांच्या अंर्तमनात माँ बालेश्वरीचा महिमा लिहीण्याचे बीज पडले आणि त्यानंतर साकारला, अवतरला ग्रंथ ***माई महिमा*** माँ बालेश्वरी संदर्भात. एकीकडे गोवऱ्याच्या राखेने मालिश चालू होते अधूनमधून आग्रह आणि मंत्रजप. बाबांनी जसे स्वीकारले की हो लिहीन तसे आम्ही आनंदलो कारण एक बीज आत पडले. आमच्या ह्या सर्व प्रयत्नांना यश आले. बाबांच्या पायात हळू हळू चेतना येऊ लागली. बाबांचे डोळे पण जडावले. बाबा शांत झोपी गेले.

त्यावेळी रात्रीचा एक वाजला होता. बाबांना झोप लागल्यावर आम्ही त्या रात्री त्या अंधारातून आश्रमापासून अडीच कि.मी. अंतरावर असलेल्या एका होमिओपॅथी तज्ञाकडे गेलो. त्याला झोपेतून उठवत सर्व परिस्थिती सांगितली. त्याने एक औषध दिले. आमची स्मरणशक्ती दगा देत नसेल तर बहुधा 'कॉरबालिक ॲसिड' असावे मदरटिंक्चर म्हणजे मूळ पातळ औषध. डॉक्टर म्हणाले, एक वाटीभर पाणी घ्या त्यात दहा थेंब टाका आणि दर दोन तासांनी दोन चमचे पाणी पाजा. जवळ जवळ आठवडाभराने बाबा कुटीच्या बाहेर येऊ शकले. तोपर्यंत आम्ही शारिरीक विधीची सर्व व्यवस्था त्यांच्या कुटीतच केली होती. जवळजवळ पंधरा दिवसांनंतर बाबा हिंडू फिरू लागले आणि एके दिवशी बाबा मला अचानक म्हणाले, ''सविता पूना जाने की तयारी करो, माँ का आदेश है, तुम्हे संन्यास दिक्षा देने का, इसी गुरूपौर्णिमाको।'' आम्ही काही क्षण स्तब्धपणे उभे होतो. मनात अनेक विचारांचा कल्लोळ उठला पण बाबांसमोर बोलू शकत नव्हतो. फक्त एवढेच म्हणालो, ''जैसी आपकी आज्ञा'' अंतर्यामी बाबांनी आमचे मनोगत जाणले व खाली बसण्याचा इशारा करीत म्हणाले, ''देख बेटा माँ की कृपासे सबकुछ तुम्हारे अंदर बीजरूपमें दे दिया है। अब उस बीजका विशाल वृक्ष बनाना तुम्हारी जिम्मेदारी है।'' या वाक्याचा नीट अर्थबोध व्हायला तुम्हाला बाबांशी आमची खूप आधी झालेली चर्चा सांगावी लागेल. चर्चेचा विषय होता संन्यास. बाबा म्हणाले, ''दोन प्रकारचे लोक संन्यास घेऊ शकतात. एक गृहस्थाश्रमातच साधना करून आत्मज्ञानाची स्थिती आल्यावर लोककल्याणासाठी गृहसंसार त्याग करून संन्यास वस्त्र धारण करणं तो 'विद्वत संन्यास'. अशा अधिकारी संन्याशाजवळ राहून ज्यांना घरगृहस्थीत राहून साधना करणे शक्य होत नाही पण विवेक वैराग्य तीव्र आहे ते साधनेसाठी इतरांकडून उपसर्ग होऊ नये म्हणून

स्वत:चा निश्चय डळमळीत होऊन कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये म्हणून संन्यास वस्त्र धारण करणे तो 'विदिशा संन्यास'. त्यानंतर आम्ही बाबांना प्रार्थना केली की, बाबा आम्हाला फक्त संन्यास वस्त्रासाठी वस्त्र नको आहेत जेव्हा कधी कृपा कराल तेव्हा पण आत्मज्ञान झाल्याखेरीज आम्हाला संन्यास वस्त्र देऊच नका. कारण गेरवा हा रंग ऋषीमुनींनी अशा करताच निवडला की तो अग्नीज्वाळांचा रंग आहे. ज्याच्यात ज्ञानाग्नी प्रकट होऊन सर्व कर्मे दग्ध झाली आहेत. त्याचे प्रतीक म्हणून अग्नीज्वाळांच्या रंगाचे वस्त्र संन्याशासाठी. कुंडलिनी शक्ती आणि शिवबिंदू यांच्या मीलनानंतर प्रतीक रूप म्हणून शिवबिंदू असलेल्या ठिकाणावरची शेंडी उतरवणे. शिवशक्तीच्या मीलनानंतर कबीराच्या शब्दात 'सुरति' नंतरच शेंडी उतरवण्याचा अधिकार. या पार्श्वभूमीवर हे रहस्य समजल्यावर वर्तमान परिस्थितीत आपल्या धर्मात संन्यास घेण्याची परिस्थिती किती भयावह आहे हे लक्षात येईल. जाऊ द्या हे विषयांतर झाले.

बाबांनी संन्यासासाठी भिक्षा मागायला जा अशी आज्ञा दिली. त्यावेळी आमच्या मनात पहिला विचार आला आपण संन्यासाला लायक झालो आहोत काय? आपल्याला आत्मज्ञान झाले आहे काय? या आमच्या विचार कल्लोळावर बाबांनी आम्हाला वरील उत्तर दिले. तसेच १९८३ मध्ये संन्यासी वस्त्र उतरवून अवधूती दिक्षा देताना बाबा पुन्हा म्हणाले, ''वटवृक्षके बीज के जैसे सबकुछ तुम्हारे अंदर दिया है।'' त्यानंतर म्हणाले, ''कच्ची कैरी आणि पिकलेला आंबा'' तसे पाहिले तर आंबाच. एक कच्चा, एक पिकलेला. तसेच अवधूती वृत्ती आणि परमहंस स्थिती यात पण हा असाच आणि एवढाच फरक. ***गुरूसेवा रत जे जीव सहज टरै अज्ञान।*** त्यानंतर जून महिन्यात आम्ही बाबांच्या आज्ञेने सर्व नातेवाईक आप्तेष्ट, मित्रमंडळी सर्वांकडे भिक्षेला गेलो त्यावेळी काय मिळाले ते सांगू नंतर पुन्हा केव्हातरी.

बाबांची एक विशेष कृपादृष्टी आमच्यावर होती. आम्ही जप ध्यान, पूजा, पाठ यापेक्षाही नेहमीच गुरूसेवेला अधिक महत्व दिले. यापूर्वीच्या एका पुस्तकात त्याचा उल्लेख पण आहे की, आम्ही कित्येक महिने ध्यानाला देखील बसायचो नाही. बाबांनी ज्यावेळी प्रबोधिनी भाष्य हा ग्रंथ लिहायला सुरवात केली त्यावेळी बाबा आंबाघाटा आश्रमावर होते आणि आम्ही बाबांची जन्मभूमी घुरघाटला माँ बालेश्वरीच्या सेवेत. त्या ग्रंथाची अर्पण पत्रिका बाबांनी आमच्या नावाने लिहीली होती आणि स्वत: आमचे स्केच (चित्र) काढले होते. हातात झाडू घेऊन कचरा काढताना. खाली लिहीले होते **'कर्मयोगी सवितानंद.'**

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

आजच स्मरणिका मिळाली. ती भव्यता पाहून दडपून जायला झालं. सगळं काही भव्य आणि अप्रतिम. कुठलाही शब्द नाही या ग्रंथाच्या तुलनेसाठी. असं भव्य काही साकार होणं हा गुरूकृपेचाच आविष्कार आहे. हे म्हणाले की दक्षिणेकडची भव्य मंदिर पाहून ती उभारण्यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तिची जी भक्तिची ताकद जाणवते तीच भक्ति या साठी कार्यरत झालेल्या सर्वांची आहे. कोटी कोटी प्रणाम स्वामीजी.

– सौ संध्या कुलकर्णी, कोल्हापूर

३. जल कमलवत्

– गुरूमाऊलीची सरू

हरिद्वारवरून आलेले एक संत मांडवीला त्यांच्या एका साधकाकडे त्याच्या दुकानात बसले असता त्यांची नजर रस्त्याने जाणाऱ्या एका व्यक्तीवर पडली आणि ते त्या व्यक्तीकडे काही क्षण आश्चर्याने पहात राहिले. त्यांनी त्या साधकाला सांगितले तू या माणसाला ओळखत असशील तर त्याला इकडे बोलव. तो साधक (दुकानदार) म्हणाला तो तर माझा मित्रच आहे आणि त्याने त्या व्यक्तीस हाक मारुन बोलवले. संत त्याच्याकडे आश्चर्याने पहात म्हणाले अरे बाबा तुला बघून मला अशा करता आश्चर्य वाटत आहे की तुझ्यावर दोन मारण प्रयोग झालेले आहेत हे मला कळत आहे आणि तरी तू अगदी स्वस्थ आणि सहीसलामत आहेस याचा अर्थ तुझ्यामागे खूप समर्थ अशी गुरूकृपा उभी आहे आणि त्यामुळे नीट लक्षात ठेव कधीही आपल्याकडून गुरूद्रोह होणार नाही याची नीट काळजी घे. याच व्यक्तीला डॉक्टरांनी रक्तातील काविळचा पॉझिटीव्ह (हिपोटायटीस बी) रिपोर्ट सांगितला होता. तो मेडिकल दृष्टीने खूप गंभीर आहे (अशा व्यक्तीची केव्हा अचानक गच्छन्ति होईल हे सांगता येत नाही) आणि तरीही गुरूकृपेने तो आज वीस वर्षानंतरही स्वस्थ आहे. एकदा स्वामीजींनी त्याला सांगितले की, तू या आठवडाभर स्वत:ची नीट काळजी घे. सगळे व्यवहार लक्षपूर्वक कर. त्याच आठवड्यात तो त्याच्या गॅसने चालणाऱ्या कारने जात असता अचानकच त्याच्या लक्षात आले कारमध्ये थोडासा धूर झाल्याचे. त्याने तत्काळ कार बंद केली. दार उघडून बाहेर आला. कारची सगळी दारे उघडी ठेवली आणि मेकॅनिकलला फोन केला. मेकॅनिक आला त्याने गाडी तपासून सांगितले की, ''साहेब तुम्हाला जर दोन मिनिटे उतरायला उशीर झाला असता तर सगळ्या गाडीचा विस्फोट होऊन आग लागली असती अशी ही व्यक्ती गुरूकृपेने अनेकदा वाचूनही आणि त्याच्यावर अनेक तऱ्हेचे उपकार असूनही त्या संताने त्याच्या भविष्याबद्दल दिलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करून तो गुरूद्रोह करून गुरूनिंदा करू लागला हे त्याचे दुर्दैव. स्वामीजींना त्याने काहीही फरक पडत नाही, कारण त्याच्या कर्माने तो स्वामीजींपासून दुरावला.

दुसरी गोष्ट मुळची मांडवीची आता सुरत विश्वविद्यालयामध्ये एस्.एस्सीला असणारी एक मुलगी चार दिवसांच्या सुट्टीत घरी आली. चार दिवसांनी ती सुरतला मुलींच्या वसतिगृहात परत गेली. त्यावेळी तिची रूमपार्टनर असलेली एक बंगाली मुलगी तिच्याकडे आश्चर्याने पहात राहिली. तिने विचारले अग तू माझ्याकडे अशी आश्चर्याने का पहात आहेस? ती बंगाली मुलगी उत्तरली की, 'तुला आठवत असेल की तू सुट्टीला घरी जाण्यापूर्वी मी तुझ्या हस्तरेखांचा अभ्यास केला होता. त्यावेळी माझ्या लक्षात आले होते की या आठवड्यात तुझ्यासह तुझ्या आईवडिलांच टिकीट कट झालेलं आहे. तुम्हा तिघांना जीवघेणा अपघात होईल आणि म्हणून तुला तरीही माझ्या समोर धडधाकट बघून मला आश्चर्य वाटत आहे. अशा काळघातक योगातून तू आणि तुझे आईवडील वाचले याच्यामागे नक्कीच कुठल्यातरी संतांची कृपा तुमच्यावर असली पाहिजे. आता आश्चर्यचकित व्हायची पाळी त्या मुलीवर होती. ती म्हणाली परवा मी आणि माझे आईवडील आमच्या गुरूमहाराजांबरोबर

माझ्या मावशीकडे जात होतो. त्यावेळी प्रवासात अचानक पाऊस सुरू झाला. पूर्वी रस्त्यावर डिझेल सांडले होते त्यात पाऊस पडत होता. आमचे सुदैव असे की तो रस्ता नेहमी भरपूर वाहतुक असणारा असुन देखील वडीलांचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी रस्त्यावर वेडीवाकडी चालत असताना इतर कोणतेच वाहन ना समोरुन ना मागुन आले. जर एखादे भरदार वेगाने जाणारे वाहन त्याच वेळेला रस्त्यावर असले असते तर आमची दशा काय झाली असती याची कल्पना देखील करवत नाही. गाडी खड्ड्यात एका अंगावर पडली त्यामुळे रस्त्याकडील दारे बंद तर दुसरीकडील दारे आकाशाकडे त्यामुळे बाहेर कसे पडावे हाच प्रश्न समोर असताना लक्षात आले की गाडीची पुढची संपूर्ण काच कोणीतरी अलगद काढून बाजूला ठेवावी तशी निघाली होती आणि त्यातूनच आम्ही चारीजण बाहेर आलो. आम्हाला चौघांना कुठेही थोडेही खरचटले देखील नाही. फक्त माझ्या चष्म्याची फ्रेम डोळ्याकडे थोडी दाबली गेल्याने मला तेथे किंचित दुखापत झाली. स्वामीजी सहजगत्या जणू काही घडलेच नाही अशा अविर्भावात गाडीतून बाहेर आले. कोणीतरी स्वामीजींना विचारले काय झालं? स्वामीजी हसत उत्तरले, ''गाडीचा बी. पी. वाढल्याने तिला चक्कर आली.'' हे ऐकून गोळा झालेले लोकही हसले. नंतर स्वामीजींनीच त्यांच्या एका साधकाला फोन करून दुसरी गाडी मागवून घेतली आणि आणखी दुसऱ्या साधकाला फोन करून गाडी बाहेर काढण्यासाठी दोर आणि ट्रॅक्टर घेऊन यायला सांगितले. अशा या भीषण प्रसंगातदेखील स्वामीजी शांत आणि स्वस्थ होते. आम्हा तिघांना मात्र काही सुचत नव्हते.

या घटनेनंतर या मुलीच्या वडिलांना ते मोटरसायकलने येत असताना त्यांची धडक एका गायीला लागली आणि ते मोटरसायकलवरून खाली पडले. धडक लागल्याने चवताळलेली गाय त्यांना शिंगाने मारण्यासाठी त्यांच्या अंगावर धावली. आसपास गोळा झालेले लोकही या प्रसंगाने घाबरले त्यांना वाटले की व्यक्ती आता वाचणार नाही. गाय त्यांच्या पोटात शिंग घालेल. पण आश्चर्याची गोष्ट अशी की स्वामीजींनी तरसाडा येथील काही साधकांना **माँ शरणम्** असा ठसा उमटवलेले चांदीचे लॉकेट (सिक्का) भेट दिले होते. त्या साधकाकडे असलेल्या लॉकेटकडे दृष्टी जाताच गाईचा राग निवळला. हिंसक झालेली गाय इजा न करताच माघार घेऊन निघून गेली. गोळा झालेल्या लोकांनी त्यांना आधी स्थानिक दवाखान्यात व नंतर सुरतला पोहचविले. सुरतच्या न्युरो सर्जनने त्याचे सगळे फोटो काढून पाहिल्यावर त्याच्या भावाला म्हटले, ''मी माझ्या इतक्या वर्षांच्या कारकीर्दीत अपघाताच्या हजारो केसेसचे फोटो पाहिले आहेत, मला स्वत:ला आश्चर्य वाटत आणि मेडिकल सायन्सच्या दृष्टीने असंभव वाटत की यांना डोळ्याला एवढा मार लागलेला असून आतमध्ये कुठेही काहीही क्षती झाली नाही हे एक आमच्या दृष्टीने आश्चर्यच आहे.

त्या व्यक्तीला सुरतच्या एका मोठ्या दवाखान्यात दाखल केले आणि अपघाताच्या दोन दिवसांनंतर एके दिवशी रात्री ती व्यक्ती अचानकच असंबद्ध बरळू लागली. डॉक्टरांनी घाईघाईने त्यांना झोपेचे इंजेक्शन दिले. इंजेक्शन देऊन तास-दोन तास झाले तरी ती व्यक्ती झोपली नाही आणि तिचं बरळणं पण थांबलं नाही. दोन तासांनी डॉक्टरांनी पुन्हा दुसऱ्यांदा झोपेचे इंजेक्शन दिलं तरीही त्याचा काही परिणाम झाला नाही. त्याचे जोरजोरात बरळणे चालूच होते. दवाखान्यात त्यांची पत्नी, मेडिकलला असणारा मुलगा आणि शिक्षक असलेला त्यांचा भाऊ त्यांच्या जवळ होते. सगळे चिंतेत पडले, त्यांनी डॉक्टरांना विचारले. डॉक्टर म्हणाले,

येत्या अठ्ठेचाळीस तासात हे आपोआप नॉर्मल झाले तर ठीक नाहीतर आयुष्यभर असेच वेडे चाळे करतील. झोपेची दोन इंजेक्शन देऊनही त्यांच्यावर काही परिणाम होत नाही त्यामुळे आता आम्ही काही करू शकत नाही. ही मेडिकलच्या भाषेत कन्व्हल्जन स्टेट आहे.

त्या दिवशी स्वामीजी मुद्दाम ठरवून त्या व्यक्तीच्या भावाच्या घरीच मुक्कामाला थांबले होते. इतकेच नव्हे तर त्यांनी भावास आवर्जून सांगूनही ठेवले होते की, ''आम्ही रात्री येथे मुक्कामाला अशासाठी थांबतो आहोत, आज रात्री यांना केव्हाही आमची गरज पडेल.'' शेवटी रात्री अकरा वाजता त्यांचे बंधू स्वामीजींना घ्यायला त्यांच्या घरी आले. स्वामीजी हॉस्पिटलमध्ये गेले. त्यांनी आधी रात्रपाळीच्या डॉक्टर आणि नर्सला बोलवून घेतले आणि विचारले, ''तुम्हाला अजूनही काही औषधे आणि इंजेक्शन द्यायची आहेत का? त्यांना झोप लागावी म्हणून आणखीन काय करायचे आहे का?'' डॉक्टर उत्तरले, ''आता याहून अधिक आम्ही काही करू शकत नाही.'' त्यावर स्वामीजी म्हणाले, ''मग आता आमचा प्रयोग करू.'' ते म्हणाले, ''तुम्हाला जे वाटेल ते करा, आम्ही त्याबद्दल कांही सांगत नाही.'' त्यावेळी दोघं तिघं डॉक्टर आणि नर्सेस तिथे येऊन पोहोचले आणि त्या सर्वांसमोरच स्वामीजींनी त्या व्यक्तीच्या डोक्यावर हात ठेवला आणि त्याला म्हणाले, ''आम्ही बोलतो तसे तू बोल'' असे म्हणत स्वामीजींनी डोक्यावरचा हात तसाच राहू देत ***या देवी सर्वभूतेषु निद्रा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।।*** हा मंत्र त्याच्याकडून पाच वेळा म्हणून घेता घेता ती व्यक्ती गाढ झोपी गेली. डॉक्टरांना पण हायसे वाटलं आता वेडे होण्याचा धोका पूर्ण टळला. एवढं सगळं होऊनही एकदा त्या व्यक्तीचा अहंकार स्वामीजींच्या बोलण्याने दुखावला आणि तो परिवार स्वामीजींपासून दूर गेला.

महाराष्ट्रातील बोर्डाला बारावीला पहिल्या दहात आलेली अत्यंत हुशार मुलगी स्वामीजींजवळ रडायला लागली आणि म्हणाली, स्वामीजी मला आता या वर्षी मेडिकलला प्रवेश घ्यायचा आहे आणि त्याआधीच माझ्या वडिलांनी त्यांच्या बहिणीला वचन दिले आहे की मी माझी मुलगी (म्हणजे मला) तुझ्या मुलाला देईन. मी त्या परिवाराला लहानपणापासून जात येत असल्याने चांगली ओळखते. मी विहीरीत उडी घेईन पण त्या घरात लग्न करून जाणार नाही. आता मला काय करावं ते कळत नाही. स्वामीजींनी तिला शांत करत म्हटले, कि तू आता तुझ्या वडिलांना नाही म्हणू नकोस. कारण तूं असं केलं तर ते तुला मेडिकलला ॲडमिशन देखील घेऊ देणार नाहीत. त्यापेक्षा आता नुसतं हो हो म्हणत सांग माझं शिक्षण झाल्यावरच लग्न करायचं आणि आम्ही तुला वचन देतो कि तो मुलगा आता मेडिकलला दुसऱ्या वर्षाच्या शेवटच्या टर्मला आहे. म्हणजे तुझ्यापेक्षा दोन वर्ष पुढं. तरीदेखील तू स्वतः M.B.B.S. होईपर्यंत तो मुलगा M.B.B.S. होणार नाही. मग तो स्वतःच तुला नकार देईल. ती मुलगी म्हणाली, पण स्वामीजी तो मुलगा अतिशय हुशार आहे. स्वामीजी हसले आणि म्हणाले, बघ काय होते तर आणि खरे तसेच घडले ती मुलगी आधी M.B.B.S. पास झाली तरी तो मुलगा पास झाला नव्हता आणि त्याने स्वतःच नकार दिला. M.B.B.S. झाल्यावर ती पुन्हा स्वामीजींच्या चरणी धांवली आणि म्हणाली, स्वामीजी मला डोळ्यांचं स्पेशालिस्ट व्हायचे आहे. (Opthalmologist) परंतु आमच्या कॉलेजला त्यासाठी एकच सीट आहे. माझ्या एका वर्गमैत्रीणीला पण डोळ्याच्या डॉक्टरचीच सीट हवी आहे. तिची आई आणि

मामा दोघेही आमच्याच मेडिकल कॉलेजला प्राध्यापक आहेत. स्वाभाविकच त्या दोघांमुळे तिला ओरलमध्ये माझ्यापेक्षा जास्त मार्क दिले जातील व मला ही सीट मिळणार नाही. स्वामीजी हसत म्हणाले, तिच्या मागे तिची आई आणि मामा असले तरी तू अनाथ नाहीस. काळजी करू नकोस ही सीट तुलाच मिळेल आणि घडले ही तसेच. लेखी परिक्षेत या मुलीला एवढे जास्त मार्क मिळाले की ओरल परिक्षेत तिला जास्त मार्क मिळुनही हा फरक शिल्लक राहीला आणि ती सीट हिलाच मिळाली. आज ती पुण्यात डोळ्यांची नामांकित डॉक्टर आहे. पण नेहमीप्रमाणे तिच्या दुर्दैवाने ती या सर्व गोष्टी विसरून तिच्या संसारात आणि व्यवसायात एवढी रमली आहे की तिला स्वामीजींची आठवणदेखील येत नाही.

अशा मी अनेक गोष्टी सांगू शकेन. एकदा मी स्वामीजींना याबद्दल विचारले की स्वामीजी 'तुमच्यावर या गोष्टीचा आघात होत नाही का?' स्वामीजी त्यावर हसून म्हणाले, ''अग वेडाबाई उन्हाने चालून थकलेला, शांत क्लांत झालेला प्रवासी एखाद्या झाडाखाली विश्रांती घेतो आणि विश्रांती पूर्ण झाल्यावर चालायला लागतो त्यावेळी झाड काय करते? ते गेलेल्या माणसासाठी रडत पण नाही आणि येणाऱ्या नवीन लोकांना सावली द्यायला चुकत पण नाही. ते अविरत तसे उभे असते. तसेच नदीवर पाणी प्यायला कुणी आलं आणि पाणी पिऊन निघुन गेलं त्याने नदिला काय फरक पडतो? तसचं आमचं जीवन''.

सुखाचा (व्यवहारीक) त्याग करुन नव्हे सगळच सोडून गुरुच्या शोधार्थ घरातून निघून जाणे आणि संन्यासोत्तर काळात स्वामीजींनी ज्यांना माया-ममता, प्रेम-आधार दिला अशा व्यक्तींनी/साधकांनी स्वामीजींना सोडून जाणे या दोन्ही परीस्थीतीत स्वामीजी तसेच शांत व अविचल राहतात किंबहूना ते असे राहु शकतात म्हणूनच ते 'स्वामीजी' आहेत. या प्रसंगी गीतेतील श्लोक आठवतो **जल कमलवत्.**

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।।

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

परम पूज्य स्वामीजी १००८ प्रणाम, सविता अर्घ्य हा प्रासादिक ग्रंथ मनन, चिंतन आणि ह्रदयाच्या गाभाऱ्यात जतन करून ठेवण्यासारखा आहे. मन प्रसन्न करणारा आहे, विचार करायला लावणारा आहे, उपदेश करणारा आहे चिरंतन मार्गदर्शन करणारा आहे. आपले आमच्यावर थोर उपकार आहेत. ह्या ग्रंथातून आपले मार्गदर्शन अप्रत्यक्षरित्या होत आहे असे वाटते. अजून एक विनंती प्रत्यक्ष मार्गदर्शन मला व्हावे ही कळकळीची प्रार्थना. माँ भगवतीस शरण। नमो नारायण।

– श्री. दिलीप देशमुख, मुंबई

४. हिरा न सांगे अपुले मोल

– गुरूमाऊलीची सरू

स्वामीजींशी श्रध्दा प्रेमाने जुळलेले नासिकचे श्री. निळकंठ शिंदे (निळुभाऊ) यांनी त्यांच्या आईवडिलांचा सहस्रचंद्रदर्शनाचा (८१ वर्ष पूर्ण झाल्याचा) कार्यक्रम खूप उत्साहाने व मोठ्या प्रमाणात साजरा केला. आजच्या काळात शोधावे लागतील असे मातृपितृभक्त निळुभाऊ, त्यांच्या वडिलांना ''सेवासूर्य'' ही मानाची पदवी मिळालेली. नासिकच्या कै. मौनी स्वामी जनार्दनस्वामींचे परमभक्त व अगदी जवळचे सेवाभावी शिष्य. सेवासूर्य शिंदेंनी श्री. जनार्दन स्वामींवर आणि इतर अनेक विषयावर बरीच पुस्तके लिहिली. एक ही पुस्तक विक्रीसाठी बाहेर पुस्तकांच्या दुकानात पाठविले नाही. त्यामुळे एक पण पुस्तक विकले नाही. अधिकांश पुस्तके सप्रेम भेट म्हणूनच स्वहस्ते अनेकांना वाटली. स्वाभाविकच पुस्तकांसाठी झालेला खर्च कधीच परत भरून निघाला नाही. तरी दरवर्षी मातृपितृभक्त निळुभाऊने आर्थिक झीज सोसत वडिलांच्या इच्छेला मान देत प्रत्येक पुस्तक छापले. त्या नानांचा सहस्त्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रम. जनार्दन स्वामी मठाचे समर्पित सेवक म्हणून व अनेक पुस्तकांचे लेखक म्हणून त्यांचा परिचय खूप लोकांशी. स्वाभाविकच कार्यक्रम खूप मोठ्या प्रमाणात झाला. निळकंठच्या विनंतीचा स्विकार करून स्वामीजी पण कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचल्यावर निळुभाऊनी स्वामीजींचे आदरपूर्वक प्रेमाने स्वागत केले. त्यांना बसायला एक खुर्ची दिली. स्वामीजी खुर्चीत विराजमान झाले.

थोड्याच वेळात जनार्दन स्वामींचे कांही संन्यासी शिष्य जे नासिकच्या आसपासच्या गांवात आश्रम बांधुन राहात आहेत ते पण आले. त्यांचा १५-२० जणांचा एकत्र समूह स्वामीजींपासून दूर एकत्रित बसला. त्र्यंबकेश्वरचे पण इतर संन्यासी होते. सर्वांच्या आपसात गप्पा चालू होत्या. स्वामीजी त्यांच्या खुर्चीवर एकटेच बाजूला बसलेले. उपस्थित गृहस्थापैकी बरेच जण त्या संन्यासी समुहाजवळ जाऊन वंदन करून विचारपूस करून यायचे. पण स्वामीजी एकटेच शांतपणे बसलेत ही गोष्ट निळुभाऊंना खूप खटकली. ते स्वामीजींजवळ येऊन म्हणाले, 'स्वामीजी मी या सर्व साधुसंन्याशांना आणि उपस्थित गृहस्थांना तुमचा परिचय करून देऊ का? ते सगळे तिकडे बसलेले गृहस्थ या बाजूला तुम्ही एकटेच. मला हे खटकत आहे, चांगल नाही वाटत.' स्वामीजी हसून त्याला म्हणाले, 'आम्ही एकटे बसलो आहोत म्हणून शांतीने जप करीत आहोत. कोणाला कांहीच परिचय करून द्यायची गरज नाही. तू तुझ्या कामाकडे लक्ष ठेव. आमची चिंता करू नकोस.' त्यानंतर अल्पावधीतच मौनी स्वामी जनार्दन महाराजांचे उत्तराधिकारी नासिकच्या जनार्दन स्वामी मठाचे अध्यात्मिक सर्वेसर्वा स्वामीश्री माधवगिरी महाराज कार्यक्रमाच्या ठिकाणी आले. त्यांना येतांना बघितल्यावर सर्व साधुसंन्यासी वृंद त्यांच्या यथोचित सत्कारासाठी, त्यांना मान देण्यासाठी उठून उभा राहिला. उपस्थित गृहस्थही उभे राहिले. माधवगिरी महाराजांनी हात जोडून सगळ्यांचे अभिवादन स्विकारले आणि त्यांना अभिवादन केले.

इकडे तिकडे नजर फिरवतांनाच त्यांचे लक्ष खुर्चीवर एकटेच बसलेल्या स्वामीजींकडे गेले. त्यांनी तत्काळ त्यांच्या अवतीभोवती जमलेल्या गर्दीला इशाऱ्याने दूर केले व ते सरळ स्वामीजींजवळ आले. माधवगिरीबाबा जवळ येताच स्वामीजी खुर्चीवरून उठले, उभे राहिले. माधवगिरी महाराजांनी जवळ येऊन वाकून स्वामीजींना चरणस्पर्श केला. ते दृश्य बघताच सगळे साधुसंन्यासी व गृहस्थ चपापले. सगळ्यांच्या मनात एकच प्रश्न आपण सर्वजण हृदयपूर्वक ज्यांना सन्मान देतो ते स्वामीश्री माधवगिरी महाराज वाकून ज्यांचा चरणस्पर्श करीत आहेत हे कोण? केव्हापासून तर ते एकटेच तेथे बसून होते. पुढे काय घडले ते सांगायची गरज नाही. तुम्ही कल्पना करू शकता. सागर जेवढा विशाल असतो तेवढाच तो शांत असतो. तसे ज्याचे अंतरंग ज्ञानाने ओतप्रोत भरलेले असते त्याला बाहेरून दाखवायची गरजच नसते. ते जगासमोर आपोआप प्रकट होते. गुरूमाऊलीचे तसेच आहे. अशा घटना माझ्या नजरेसमोर ही बऱ्याच वेळा घडल्या आहेत.

टिटवाळ्याचे प्रवचन आटोपून स्वामीजी आश्रमाचे दिक्षीत साधक श्री. अर्जुन चिंदरकरबरोबर (या घटनेच्या वेळी त्यांची दीक्षा झाली नव्हती.) त्याच्या कारने बोरीवली स्टेशनवर आले. स्टेशनावर पोलीसांचा बंदोबस्त पाहून स्वामीजींना थोडे आश्चर्यच वाटले. तेवढ्यात एका पोलीसाने स्वत:हून स्वामीजींना सांगितले की, स्टेशनवर माननीय सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत आलेले आहेत. स्वामीजी स्टेशनच्या आंत आल्यावर एका प्लॅटफॉर्मवर थोडी गर्दी व पोलीस बंदोबस्त पाहून लक्षांत आले श्री. मोहनजी तेथे आहेत. अर्जुनला घेऊन स्वामीजी तिकडे गेले. श्री. मोहनजी मध्यभागी उभे होते. त्यांच्याजवळ त्यांचे स्वीय सचिव व अन्य एकदोन मुख्य व्यक्ती. त्यांच्या भोवती कमांडोंचा गराडा. त्यांच्याभोवती रा. स्व. संघाचे व मुंबईचे कांही प्रमुख कार्यकर्ते व त्यानंतर रा.स्व. संघाचे कार्यकर्ते व त्यांच्या भोवती पोलीसांचे कडे असे सर्व वर्तुळाकार उभे होते. बाहेरच्या वर्तुळातील पोलीसांनी स्वामीजींना हाताचा इशारा करून दूरच थांबायला सांगितले. स्वामीजी शांतपणे जागच्या जागी उभे राहिले. पण ते अर्जुनला आवडले नाही. तो पोलीसांजवळ जाऊन कांही सांगण्याचा प्रयत्न करणार हे त्याच्या हालचालीवरून लक्षांत येताच स्वामीजींनी त्याला इशारा केला, गप्प बैस. ते लोक त्यांचे कर्तव्य करीत आहेत, त्यात अडथळा आणू नको. त्यांना परिचय सांगून पण उपयोग होणार नाही. ते त्यांच्या वरिष्ठांच्या आज्ञेने बांधलेले आहेत. ज्यावेळी मोहनजींचे लक्ष जाईल त्यावेळी भेट होईल. अर्जुन शांत उभा राहीला.

यत्किंचीतही अहंभाव मनात न ठेवणारे मोहनजी सगळ्यांशी मोकळ्या मनाने गप्पांत रंगले होते. सर्वांवर नजर टाकता त्यांची नजर अचानकच स्वामीजींवर पडली. स्वामीजी दिसताच त्यांनी दोन्ही हातांनी वाट करून देण्याचा इशारा करताच सर्व वर्तुळाकार कोंडी फुटली. रस्ता मोकळा केला. मोहनजी स्वामीजींजवळ आले. त्यांनी स्वामीजींना वाकून नमस्कार करताच उपस्थित सर्वजण गोंधळले. अडविणारे पोलिस तर बिचारे घाबरलेच. त्यांची घाबरगुंडी उडालेली पाहून स्वामीजींनी नजरेनेच इशारा करीत सांगितले. घाबरू नका तुमचे कांही चुकले नाही. तेवढ्यात मोहनजींनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना एकाच वाक्यात स्वामीजींचा परिचय करून दिला. तुम्ही सर्वांनी ज्यांचे पुस्तकं वाचले आहेत ते हे स्वामीजी. मोहनजी असे म्हणताच सर्वजण नमस्कारासाठी

धडपडू लागले. तेवढ्यात स्टेशनवर गाडी आली. ही आपली गाडी नाही हे स्वामीजींना चांगले माहित होते. कारण त्यांची गाडी यायला एक दिड तास वेळ होता. पण नमस्काराची ती गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी स्वामीजी अर्जुनला म्हणाले, अर्जुन चल लवकर गाडी आली. युधिष्ठिरासारखे शबल सत्य, गाडी आली होती हे खरे पण ती त्यांची नव्हती हे ही खरे पण स्वामीजींनी तेथून काढता पाय घेतला.

दुसरी घटनापण रा.स्व. संघाचे सरसंघचालक श्री. मोहनजी भागवतांबरोबरचीच, २०१८ सालची. डहाणूरोड जवळ तलासरी येथे वनवासी आश्रमाने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे स्वामीजींना निमंत्रण होते. कार्यक्रम पत्रिकेत स्वामीजींचे नांवही छापले होते. आयोजनाप्रमाणे दोन स्थानिक कार्यकर्ते गाडी घेऊन स्वामीजींना घ्यायला आले होते. सुरूवातीला स्वामीजींची बसण्याची व्यवस्था तेथील स्थानिक प्रजापती बंधुकडे केली होती. कार्यकर्ते स्वामीजींना तेथे घेऊन गेले. घरमालकाने स्वामीजींचे स्वागत करून बसायला एक खुर्ची दिली. त्या बैठक खोलीत आणखीन कांही खुर्च्या होत्या. शिवाय एक लाकडी पलंग व त्यावर बसण्यासाठी नवीन चादर टाकून आसन केले होते. स्वामीजींना ज्यांनी नेले त्या दोन्ही कार्यकर्त्यांना प्रश्न पडला हे कोणासाठी? तेवढ्यात एक महात्माजी त्यांच्या चार-पाच शिष्यांसह आले. आल्यावर स्थानापन्न झाले. आलेल्या शिष्यांना बसण्यासाठी खाली सतरंजी किंवा चटई नव्हती आणि ‘गुरूमहाराज’ समोर खुर्चीवर बसायची त्यांची तयारी नव्हती म्हणून ते ५/६ जण पलंगाच्या बाजूलाच उभे राहिले. चहापाण्याचा कार्यक्रम आटोपला आणि आयोजनकर्त्यांपैकी एकदोन मुख्य आयोजक व तीनचार कार्यकर्ते स्वामीजींच्या दर्शनासाठी आले. त्यांनी वंदन केल्यावर स्वामीजींना त्यांनी इशारा केला की त्या खुर्च्या आहेत त्या इकडे सरकून घ्या व त्यावर बसा. कारण खाली चटई किंवा सतरंजी काहीच नव्हती. आलेले कार्यकर्ते गोंधळले. स्वामीजी स्वत:च खुर्चीवर व त्यांच्या बरोबरीने त्यांच्या समोर खुर्चीवर कसे बसायचे? त्यांची ही गोंधळलेली मानसिकता बघुन स्वामीजी नेहमीप्रमाणे मिस्किल हसत गंमतीने म्हणाले.. आपण कारमध्ये, बसमध्ये, ट्रेनमध्ये बरोबर असतो तर काय केले असते? बसला असता ना! आणि हंसत हंसत गंमतीने म्हणाले, राम-रावण युध्दाच्यावेळी युध्द संपल्यावर राम झाडाखाली आराम करायचे आणि वानर झाडावर... त्यांना कोठे मर्यादा नडली? राम खाली वानर वर त्याने काय फरक पडणार. राम राम आहे वानर वानरच राहणार! खाली वर बसण्याने काय फरक पडणार. परिस्थिती बघुन वागावं.... निर्णय घ्यावा. शक्य आहे घरमालकांकडे मोठी सतरंजी किंवा चटई नसेल. या खुर्च्या तुम्ही आयोजकांनी आणून ठेवल्या आहेत ना बसण्यासाठी, मग बसा. स्वामीजींच्या या बोलण्याने विशेषत: रामवानर प्रसंगाने सर्वजण खळखळून हसले आणि संकोच सोडून खुर्चीवर बसले. पण पंचाईत झाली त्या गुरूमहाराजांची व त्यांच्या शिष्यांची. ‘उभ रहावं की बसाव’ याचा निर्णय त्यांना करता येईना.

थोड्या वेळाने आलेले कार्यकर्ते परत गेले. जातांना आयोजक सांगून गेले की, योग्य वेळी तुम्हाला घ्यायला गाडी येईल. त्यानंतर अर्ध्या-पाऊण तासांनी एक कार आली आणि त्या महाराजांना कार्यक्रमाच्या ठिकाणी घेऊन गेली. त्यांचे शिष्य त्यांनी आणलेल्या गाडीने गेले. स्वामीजी आता एकटेच होते. कार्यक्रमाची वेळ दुपारी तीनची. त्या महाराजजींना घ्यायला गाडी दोन वाजताच येऊन गेली, पण आता दुपारचे दोन वाजून

चाळीस मिनिटं झाली तरी स्वामीजींसाठी गाडी आली नाही पाहून ज्या कार्यकर्त्यांबरोबर स्वामीजी आले तेच अस्वस्थ झाले. चुळबुळ करू लागले. पण स्वामीजींवर कसलाच कांहीच परिणाम नाही, ते शांत बसलेले बघून ते दोघे विचारात पडले आणि शेवटी गाडी आली. स्वामीजी कार्यक्रम स्थळी गेले. भव्य स्टेज त्यावर कांही साधु-महात्मे विराजमान होते. मगाशी गेलेले ते महाराजजी पण व्यासपीठावर होते. व्यासपीठ दोन लेअरचे होते. वरती दोन सोफासेटच्या खुर्च्या. त्याच्या एक फूट खाली दोन्ही बाजुला सोफासेट, खुर्च्या आणि त्यावर साधुमहात्मा व रा. स्व. संघाचे, विश्व हिंदू परिषदेचे व तेथील वनवासी आश्रमाचे प्रमुख पदाधिकारी विराजमान होते. समोर सुमारे साठ हजार लोकांची उपस्थिती. पुढच्या दोन रांगात इतर साधुसंन्यासी, उद्योगपती, प्रमुख व्यापारी व रा.स्व. संघाचे, वि.हिं.प.चे, वनवासी आश्रमाचे प्रमुख कार्यकर्ते, स्थानिक महत्वाच्या प्रमुख व्यक्ती, सामाजिक/राजकीय कार्यकर्ते बसलेले होते. स्वामीजी गाडीतून उतरल्यावर व्ही.आय.पी. रांगाच्या पुढे एका कोपऱ्यात थोडे दूर एका प्लॅस्टिकच्या खुर्चीवर बसवण्यात आले. स्वामीजी शांतपणे त्यावर बसले. स्वामीजींबरोबर आलेले दोन्ही कार्यकर्ते अस्वस्थ झाले. स्वामीजींना मानाने स्टेजवर तर नेले नाही, पुढच्या रांगेत पण चांगल्या खुर्चीवर मध्यभागी बसवले नाही. रांगांपासून दूर एका कोपऱ्यात एका जुन्या प्लॅस्टिकच्या खुर्चीवर बसवलेले पाहून ते दोघे चिडले. ते आयोजकांशी याविषयी कांही वाद घालण्याच्या आधीच स्वामीजींनी त्यांना इशारा केला शांत राहण्याचा. समोरच्या पहिल्या दोन तीन रांगेतील व्ही.आय.पी. पैकी कांहीनी कपाळाला आठ्या पाडत चेहऱ्यावर असा भाव केला की कोण ही व्यक्ती, कोण कुठले महाराज? इतक्या उशिरा कां आले? आम्ही तर केव्हाच येऊन आसन ग्रहण केले. इतरांच्या पण विचित्र नजरा त्यामुळे ते दोघे कार्यकर्ते जास्त अस्वस्थ झाले. पण स्वामीजी गीतेत म्हटल्याप्रमाणे,

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित्।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ।।१९ ।।

कसल्याच मानापनाची-आदराची अपेक्षा न ठेवता शांतपणे खुर्चीवर बसले होते. ते त्या दोघांना म्हणाले, 'आयोजकांनी त्यांच्या पद्धतीने आयोजन केले आहे. त्यांत तुम्ही आता मधे टोकून त्यांचा मानसिक गोंधळ करू नका. आयोजकांना अडथळा आणू नका. आम्हाला येथे बसल्याने कांही फरक पडत नाही.' ते दोघे दुःखी कष्टी चेहऱ्याने मनातील अस्वस्थता लपवीत स्वामीजींच्या जवळ बाजूला उभे राहिले आणि तेवढ्यात मोहनजी गाडीतून खाली उतरले. पुढच्या २/३ रांगेत बसलेल्या सर्व व्ही.आय.पीं. नी उठून हात जोडून मोहनजींना अभिवादन केले. मोहनजींनी पण हात जोडून त्या सर्वांचे अभिवादन केले. स्वाभाविकच हात जोडून सगळ्यांना अभिवादन करीत सगळीकडे नजर फिरवित असताना त्यांची दृष्टी एका कोपऱ्यात खुर्चीवर बसलेल्या स्वामीजींवर पडली. मोहनजी आपल्याकडे येत आहेत असे बघून स्वामीजी खुर्चीवरून उठून उभे राहिले. तेवढ्यात मोहनजी स्वामीजींजवळ पोहोचले. खाली वाकून चरणस्पर्श केला. स्वामीजींनी मोहनजींचे दोन्ही खांदे धरून त्यांना उभे करीत ह्रदयाशी धरले आणि म्हणाले, ''मोहनजी हे काय करीत आहात? हे साठ हजार लोक आणि शेकडो व्ही.आय.पी. तुमच्याकडे पाहात आहेत.'' मग काय झाले, पाहू देत की त्यांना... तुम्हाला नाही

तर कोणाला नमस्कार करु? असे म्हणत मोहनजींनी उजव्या हाताने स्वामीजींचा हात धरून व्यासपीठावर प्रस्थान केले, हे दृश्य बघुन ज्यांच्या कपाळावर उपेक्षेच्या आठ्या पडल्या होत्या ते खजील झाले. मान खाली घातली, काहीसे गोंधळात पडले. कदाचित मनोमन विचार करीत असतील कोण हा प्राणी?

स्वामीजी आणि मोहनजी व्यासपीठाकडे जातांना आधी अकरा सुहासीनींनी दोघांना तिलक करून औक्षण केले, आरती ओवाळली. नंतर व्यासपीठावर गेल्यावर स्वामीजींनी तेथे असलेल्या खुर्चीवर नजर टाकली. प्रत्येक खुर्चीवर नांव होते. सोफासेटवर नांव होते. तेथे त्या व्यक्तीने बसायचे. पण स्वामीजींचे नांव कोठेच नव्हते म्हणून शांतपणे उभे राहिले. तेवढ्यात मोहनजींनी त्यांना आदराने उंचावर असलेल्या व्यासपीठावर नेले जेथे दोनच सोफासेटच्या खुर्च्या होत्या. एकीवर मोहनजी दुसरीवर स्वामीजी... पण स्वामीजी तसेच शांत प्रसन्न निर्विकार होते. जसे खाली कोपऱ्यात असलेल्या खुर्चीवर बसल्यावर होते. दोन्ही स्थितीत ***'सम'*** ही खरी ***'स्थितप्रज्ञता'***... माझे परमभाग्य की मी त्यांच्या सेवेत आहे आणि त्याहून मोठं भाग्य की ती 'सरूची गुरूमाऊली' आहे. ही खरी जीवनाची सार्थकता आणि म्हणून पुन्हा म्हणते,

सदा सर्वदा योग तुझा घडावा।
तुझे कारणी देह माझा पडावा।
उपेक्षू नको गुणवंता अनंता।
रघूनायका मागणे हेचि आतां।।

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

सादर प्रणाम, काल गुरुवार म्हणून जी तिन्ही सांजेला दत्तांची पूजा असते त्या नंतर जी स्मरणिका घेतली हाती, ती रात्री २ ला बाजूला ठेवली. (कारण ती पूर्ण होई पर्यंत बाजूला ठेवावी असे वाटतच नव्हते) ती वाचताना वाटले की आपली काही तरी पूर्व जन्म पुण्याई असावी म्हणून आपल्या संपर्कात आलो आणि इतक्या दिग्गज लोकांच्या अनुभवा मध्ये माझा अनुभवाला जागा मिळालेली बघून म्हटले, माझी पात्रता नसताना हा केवळ आपला व भगवतीचा कृपा प्रसाद. फार काही लिहीत नाही, स्मरणिकेच्या बऱ्याच गोष्टींनी/लेखांनी मला अंतर्मुख केलं; परत एकदा 'पारायण' करणार आहे स्वामीजी खरंच काही भौतिक मागणे नाही आता फक्त, गुरू गोविन्द दोऊ खड़े, काके लागूं पांय। बलिहारी गुरू अपने गोविन्द दियो बताय।।

– संदीप देसाई, मुंबई

५. सहस्त्ररश्मी दिवाकराची कशी गाऊ महता - सौ. प्रतिभा कुलकर्णी, रावेर

निराकार आधार ब्रह्मादिकांचा
जया सांगता सीणली वेदवाचा
विवेके तदाकार होऊनि राहें
मना संत आनंत शोधूनि पाहें। (१४८-मनोबोध)

वरील ओवी समर्थ स्वामी रामदास कृत मनोबोध ग्रंथातील आहेत. हे वर्णन स्वामीजींना यथार्थपणे लागू पडते. स्वामीजींच्या जीवनावर आधारित '**सविता अर्घ्य**' या स्मरणिकेचे प्रकाशन अतिशय दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाले. त्यात अनेक मान्यवरांचे, मातब्बर लेखकांचे लेख आपण वाचले आहेत. आता स्मरणिकेच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन होऊ घातले आहे त्याकरीता हा एक लेख स्वामीजींचे दर्शन घडविणारा.

कधी कधी माझ्या मनात प्रश्न पडतो की खरेच आपण स्वामीजींना ओळखतो का? 'खरे रूप देवा तुझे कोणते कळेना'. विविध रूपात, विविध क्षणी त्यांचे आगळे रूप प्रत्ययास येत असते. सर्व श्रांत, क्लांत जीवांचा आधार, उध्दारकर्ता ते आहेतच. सर्व सामान्य लोकांविषयीचा कळवळा, ओतप्रोत प्रेमाने, करूणेने भरलेले मन केवळ साधकांचीच नव्हे तर इतर जनांची पण तळमळ, सर्वांच्या हृदयात भक्तीचे बीज रोवणारे स्वामीजी, तर एखाद्या क्षणी शिस्त व वेळेच्या बाबतीत कडक, कठोर असणारे स्वामीजी आतून मात्र मातृहृदयी आहेत. प.पू. स्वामीजींचे नाव स्वामी श्री सवितानंद हे सर्वश्रृत आहे. सविता या शब्दाचा एक अर्थ सूर्य असा होतो. एकीकडे आपल्या तेजाने जगाचे संचलन अखंडपणे करत असणारे भगवान श्री सूर्यनारायण तर दुसरीकडे आपल्या सजल, निर्मल व अहेतूक कृपेची धारा बरसवणारी नर्मदा मैया. सूर्याची पितृतुल्य कर्मठता व नर्मदा मैयाची मातृहृदयी वत्सलता एकाच वेळी अनुभवाला येते ती स्वामीजींमध्ये. या दोन्ही गुणांचा अनोखा संगम म्हणजे आपले स्वामीजी. शिस्तीच्या, कामाच्या, वेळेच्या बाबतीत कठोर, कडक स्वभावाचे स्वामीजी आतून मातृहृदयी आहेत. अपार आपुलकी, प्रेम व करूणेचा महासागर स्वामीजी आणि हो! का नसणार?

ज्ञानेश्वर माऊलींचा वरदहस्त त्यांचेवर आहे. पुण्यात वास्तव्यास असताना पुणे ते आळंदी नेहमीच पायी वाऱ्या केल्यात. ज्ञानोबारायांसारखा ज्ञानवंत गुरू मिळावा म्हणून प्रार्थना केली. ज्ञानरायांनी भरभरून आशीर्वाद दिला. ज्ञानेश्वर माऊलींप्रमाणेच अपार कष्ट सोसलेत. भारतभर केलेल्या पायी प्रवासात अनेक सुखद व दुःखद अनुभव घेतले, लोकांकडून मान-अपमान सहन केलेत परंतू या गोष्टींचा उल्लेख त्यांच्या अध्यात्मिक लेखन पुस्तकात कोठे कोठेच आढळत नाही. उलट सर्व लोकांप्रती कमालीचा कळवळा, जिव्हाळा, प्रेम आहे म्हणून स्वामीजी संतपदाला पोहचले आहेत.

''*जया अंगी मोठेपण तया यातना कठीण*''

स्वामीजी त्यांच्या कठोर तपस्येतून, ज्ञानयोग साधनेतून सर्वांच्या कल्याणासाठी माँ भगवतीकडे प्रार्थना करीत असतात.

ॐ सर्वे भवन्तु सुखिनः सर्वेसन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद दुःखमाप्नुयात ।

आपण मूळ विषयाकडे वळूयात. खरेच का आपण स्वामीजींना ओळखतो? तेव्हा स्तोत्र मंत्राचे विज्ञान हे पुस्तक घराघरात पोहचले होते. इतरही पुस्तके प्रकाशित झालेली होती. पुस्तके वाचून नानाविध प्रांतातून, देशातून अगदी परदेशातून सुध्दा स्वामीजींना त्याबाबत फोन येत असतात. पलिकडून व्यक्ती विचारते स्वामीजी काय करत आहात? स्वामीजी आश्रमात एकटे असतात तेव्हा ते सर्व कामे स्वत: करत असतात. स्वामीजी उत्तर देतात, झाडू लावत आहोत, कचरा काढत आहोत, भांडी घासत आहोत. ऐकणारा अगदीच स्तंभीत होऊन जातो. व्यासपीठावरून आपल्या प्रवचनातून मंत्रमुग्ध करणारे स्वामी, ज्ञानामृत पाजणारे, सामाजिक प्रश्न, अध्यात्म भक्ती, धर्म याबद्दल सखोल ज्ञानी असणारे स्वामी कचरा काढत आहेत, भांडी घासत आहेत, ऐकणाऱ्याचा स्वत:च्या कानावर विश्वासच बसत नाही. तो पुन्हा विचारतो, स्वामीजी म्हणतात, ''अरे आमच्या दृष्टीने दोन्हीही कामे सारखीच. प्रवचन व लेखनातून आम्ही तुमच्या मनातील कचरा, घाण मलीन विचार तर स्वच्छ करीत असतो. तुमचे मन चकचकीत भांड्याप्रमाणे आतून बाहेरून स्वच्छ करत असतो. आश्रमात दोन्ही (अश्विन व चैत्र) नवरात्रापूर्वी आश्रमाचा अगदी कानाकोपरा स्वच्छ केला जातो त्यावेळी इतर साधक बंधू-भगिनींच्या बरोबरीने स्वामीजी स्वत: अगदी खांद्याला खांदा लावून काम करीत असतात.

खरेच स्वामीजींचे प्रवचन, लेखन यातून श्रोता-वाचक अंतर्मुख होतो. स्वत:विषयी जागरूक होतो. काही वाक्ये काही विचार असे असतात की ते व्यक्तीत परिवर्तन घडवून आणतात. स्वामीजी अंर्तज्ञानी आहेत हे सर्वश्रुत आहे. केवळ साधकाचेच नव्हे तर संपर्कात असणाऱ्या व्यक्तीचे अंतरंग ते जाणून असतात. या गोष्टीचा येथे उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. कोणाचेही शारीरिक, आर्थिक नुकसान होऊ नये याचाही ते पूर्वसूचना देऊन काळजी घेत असतात. आपल्या लेकराला कोणताही त्रास होऊ नये असाच त्यांचा निरंतर प्रयत्न असतो. येथे आपणास स्वामीजींना *''तूच सुखकर्ता तूची दुःखहर्ता अवघ्या जनांच्या नाथा''* असे म्हणावेसे वाटते.

आश्रमात अथवा कुण्या साधकाच्या घरी, परिचिताकडे, प्रवचन स्थळी आपण निरीक्षण केले असेल तर एक गोष्ट प्रकर्षाने आपणास जाणवली असेल. ती म्हणजे स्वामीजींकडे लहान मुले चटकन आकर्षित होतात. एकदा ते स्वामीजींच्या मांडीवर आरूढ झाले की स्वत:च्या आईबाबांजवळ देखील परत जाण्यास लवकर तयार होत नाहीत. स्वामीजी जेव्हा बाळ गोपाळांबरोबर खेळतात, हसतात, त्यांच्याशी गप्पा गोष्टी करतात, त्यांना शब्दकोडे, गणिती कोडे घालतात तेव्हा स्वामीजींचे निरीक्षण केले असता त्यांच्या निरागस हास्यातून, बालिश नजरेतून त्यांच्यातील बालरूपाचे दर्शन आपणास घडते. स्वामीजी त्यांचे वय, मोठेपणा विसरून बालकांसमवेत एकरूप झालेले दिसून येतात. ते निरागस, निष्पाप भाव व निर्झराप्रमाणे खळखळून हसणे हे आपण पाहत असतांना स्वामीजींच्या चेहऱ्यावरची निरामयता आपल्या नजरेतून सुटत नाही.

अ. अविभक्तम् विभक्तेषु

स्वामीजी प.पू. बाबांच्या सेवेत अंबाघाटा आश्रमावर होते त्यावेळचा प्रसंग. स्वामीजींचे नाव त्या काळात अंबाघाटा व परीसरात बहुतेक ठिकाणी पोहचले होते. एके दिवशी एक जिपगाडी नदीच्या पैलतीरावर येऊन थांबली. गाडीत काही वकील, जज्जसाहेब बसले होते. तेथेच किनाऱ्याजवळील शेतात एक शेतमजूर काम करीत होता. साहेबांनी मजूरास विचारले येथे कोणी स्वामीजी, कोणी महात्मा, महानुभव राहतात काय? ते कोण आहेत? कसे आहेत वगैरे. मजूर म्हणाला, मी अडाणी अशिक्षित माणूस. मी काही त्यांचा सत्संग, प्रवचन ऐकत नाही परंतू त्या व्यक्तीजवळ गावातील उच्चशिक्षित, प्रतिष्ठित तसेच शाळेचे शिक्षक, प्रिन्सीपल येतात. त्यांचे जवळ बसतात शिवाय सर्व लहान मुले त्यांचे जवळ येतात, खेळतात. अशी व्यक्ती निश्चितच सामान्य नसावी एवढे मला कळते.

तू तरी केवळ परमेश्वर। दिसतोसि आम्हा नर।
न कळे तुझा महिमा अपार। गौप्यरूपे गुरू नाथा॥

वरील ओवी म्हणजे प.पू. स्वामीजींचे वर्णन पांढऱ्याशुभ्र वेषातील, कुठलेच अवडंबर नाही, मोठेपणा-लोकेषणा नाही. अत्यंत साधेपणा बोलण्यातील वागण्यातील विनयता, सहजता हे पाहून आपल्या मनाला प्रश्न पडतो खरेच आपण स्वामीजींना ओळखतो का? ह्या बाह्यस्वरूपाच्या आत अंतरंगात परमेश्वराची अनंत रूपे नटली आहेत. या वेगळ्या रूपाचे दर्शन करूयात.

स्वामीजी रावेर येथे २००५ साली आले तेव्हा प्रथमत: कोजागिरी पौर्णिमेला त्यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रवचनानंतर उपस्थित श्रोत्यांमधून आमच्या शाळेतील लेखपाल श्री. वाणीमामा यांच्या सौभाग्यवतींनी स्वामीजींना त्यांच्या घरी येण्यास खूप आग्रह केला. सौ. वाणीताई या श्री स्वामीसमर्थांच्या नि:सीम भक्त. स्वामीजी त्यांच्या आग्रहास्तव त्यांचे घरी गेले. आसनस्थ झाले. सौ. वाणीताईंनी नमस्कार केला व स्वामीजींकरीता दुध घेऊन आल्या. डोळे विस्फारून पाहतच राहिल्या. खुर्चीमधे तर श्री स्वामीसमर्थ महाराज बसले आहेत. डोळे मिटले पुन्हा पुन्हा पाहिले एकदा स्वामी समर्थ एकदा स्वामीजी.

कराडचे श्री. शिरीष जोशी काही कामानिमित्त पुण्याला गेले असता 'प्रसाद प्रकाशन' च्या कार्यालयात स्वामीजींचे पुस्तक विकत घ्यायला गेले. त्यावेळी कार्यालयातील मंगलाताई देशपांडे त्यांना म्हणाल्या, ''ज्या स्वामीजींचे पुस्तक घ्यायला तुम्ही आलात त्या स्वामीजींचे आज संध्याकाळी नृसिंह मंदिरात प्रवचन आहे. या तुम्ही तेथे.'' हे ऐकून स्वामीजींचे प्रत्यक्षात दर्शन होईल या विचाराने श्री. शिरीष जोशींना खूप आनंद झाला. ते संध्याकाळी प्रवचनस्थळी पोहचले आणि स्वामीजींकडे आश्चर्याने स्तब्ध होऊन पाहतच राहिले. कारण दोन दिवसांपूर्वी ते स्वत: घरी स्वामी समर्थांची पूजा करीत असता त्या दिसत होते. त्यावेळी ते खूप गोंधळले होते. स्वामी समर्थांचा फोटो व दुसरेच कोणी स्वामीजी कसे दिसत आहेत? व ते कोण आहेत? आणि आता तेच स्वामीजी त्यांच्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष होते.

आता या दर्शनाचा उत्तरार्ध जोशीकाकांच्याच शब्दात. प्रवचनानंतर स्वामीजी नमस्कारासाठी जवळ आलेल्या मुलांच्या हातावर खडीसाखर वाटत होते. खरे तर ते फक्त लहान मुलांच्या हातावर खडीसाखर ठेवत

होते, त्यांच्या पालकांच्या हातावर नाही. धाडसाने मी हात पुढे केला. स्वामीजींनी क्षणभर माझ्याकडे पाहिले. खडीसाखर माझ्यापण हातावर दिली. ते मोजून चार दाणे होते. मी विचार केला घरी जाऊन भावाला, भावाच्या पत्नीला, माझी मुलगी तेथेच असल्याने प्रसाद म्हणून सर्वांना एकेक दाणा द्यावा. कागदाची पुडी घेऊन कोथरूडला माझ्या भावाच्या घरी गेलो आणि काय आश्चर्य जो कोणी हात पुढे करेल त्याच्या हातावर मी खडीसारखरेचे दाणे ठेवत होतो. त्याचवेळी माझा भाऊ व बहिण परिवारासह असे सर्व मिळून एकूण २२ जणांना एकेक दाणा दिला तरी माझ्या पुडीत चार दाणे तसेच होते याचे रहस्य मला अजूनही उलगडले नाही. पण मी त्याच क्षणी स्वामीजींजवळ मनातल्या मनात नतमस्तक झालो. माँ अन्नपूर्णेचे दर्शनच या अनोख्या गोष्टीतून आपणास घडते.

असाच एक आगळा अनुभव धुळ्याच्या एक साधिका गणेशपुरी मुक्तानंद स्वामींच्या. त्या आपल्या गुरूंच्या आश्रमात गणेशपुरी येथे गेल्या होत्या. तेथे त्यांनी स्वामी मुक्तानंद यांच्या फोटोला नमस्कार केला. त्यांना फोटोत स्वामीजींचे दर्शन वारंवार होत होते. एकदा स्वामी श्री सवितानंद तर एकदा स्वामी श्री मुक्तानंद. १९९० चा चार्तुमास, माँ भगवतीच्या आदेशाने स्वामीजींनी 'बहुचराजी' येथे केला. (जि. मेहसाणा, गुजरात) गुरूपौर्णिमा नुकतीच झाली होती आणि एके दिवशी स्वामीजींनी याच साधिकेला त्याच वेळी पत्र लिहायला सुरवात केली. बेटी, आज तारीख xxx वार xxx दुपारचे दोन वाजत आहेत आणि आता तू गणेशपुरीला 'मुक्तानंदाच्या' आश्रमात मुक्तानंद स्वामींच्या फोटो समोर उभी राहून दर्शन घेत आहे. डोळे उघडे असतांना दर्शन होते तेव्हा तुला तुझे गुरू मुक्तानंद दिसतात आणि तेथे डोळे मिटून तू उभी राहिली की आम्ही दिसत आहोत. असे तीन वेळा झाल्याने तू गोंधळात पडली आहे, विचारात पडली आहे की, मुक्तानंद व स्वामीजी एकच की वेगळे! १५ दिवसांनी त्या साधिकेचे पत्रावर उत्तर आले आणि तिने लिहिले की, ''बाबा, मला खूप आश्चर्य वाटत आहे की तुम्ही गणेशपुरीपासून आठशे-नऊशे कि.मी. दूर बहुचराजीला आहात आणि तेथून तुम्ही हे सगळे कसे पाहिले? तुम्ही दिलेली तारीख, वार व वेळ घटना अगदी शब्दश: तशीच्या तशी खरी आहे. मला याचे रहस्य कळत नाही.''

जगद्गुरू आदि शंकराचार्य म्हणतात माँ भगवती जी ब्रह्मा विष्णू महेश यांची सुद्धा गुरू आहे, सर्व गुरूंची आदिगुरु माँ भगवती आहे ती विविध शरीरांना माध्यम करून प्रकट होत असते व आपले कार्य करवून घेत असते. स्वामीजी नेहमी म्हणतात, ''गुरू शरीर नाही ती एक अखंड अशी सत्ता आहे, ते एक परमतत्व आहे. गुरू एक त्रिकालबाधित सत्य आहे.'' सांगण्याच्या ओघात तर मुळ मुद्दा बाजुलाच राहिला. स्वामीजींना गुरूपद माँ भगवतीने प्रदान केले त्याचे काही मोजकेच दाखले आपण पाहुयात. राजस्थानचे महाराणा प्रताप यांच्या चौदाव्या पिढीतले वंशज राजाधीराज श्री. हेमेन्द्रप्रतापसिंह त्यांच्या महाराणींना नेहमी भगव्या वेशातील, पांढरेशुभ्र केस व दाढी असणारे साधू दर्शन द्यायचे व संकेत म्हणा अथवा आदेश व्हायचा की हेच तुझे गुरू असा वारंवार स्वप्न दृष्टांत व्हायचा. राणी साहेबांना स्वप्नाची उकल होईना. हे कोण? कुठले? या महात्म्याला मी कधी पाहिले देखील नाही. मग कसे ओळखू? मनाला सतत सतावणारे प्रश्न परंतू माँ भगवतीची लीलाच आगळी. एकदा त्या त्यांच्या फॅमिली डॉक्टरांकडे नियमित तपासणीसाठी गेल्या तेव्हा स्वामीजी डॉक्टरांकडे

त्यांच्या आग्रहास्तव दोन दिवस मुक्कामाला आले होते. राणीसाहेब स्वामीजींना पाहून अवाकच झाल्या. त्यांचा स्वत:च्या डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता की ज्यांचे दर्शन त्यांना स्वप्नात वेळोवेळी होते, गुरू असल्याचा संकेत मिळतो आणि आज ते साक्षात डोळ्यासमोर अगदी हुबेहुब तेच आणि तसेच रुप. राणीसाहेबांनी साश्रुनयानांनी स्वामीजींना प्रणाम केला व म्हणाल्या, स्वामीजी तुम्हीच माझे गुरू आहात असा मला दैवी आदेश आहे.

असाच अनुभव डोंबिवलीचे श्री. अशोक धामणकर व सौ. ज्योतिताई धामणकर यांचा. श्री. अशोकजी त्यांच्या वाढदिवसाला पायी यात्रा करीत शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनाला जायचे व साईबाबांना प्रार्थना करायचे की माझे गुरू कोण? ते मला सांगा नाहीतर तुम्हालाच मी गुरू मानेन. प्रार्थनेच्या वेळी डोळे मिटले की साईबाबांच्या जागी त्यांना स्वामीजी दिसत व साईबाबांचा आदेश होई की हेच तुझे गुरू आहेत, एवढेच नव्हे तर स्वामी वासुदेवानंद सरस्वती यांचे कोकणातील जन्मगावी माणगांव येथे दर्शनाला गेले असतांना देखील त्यांना असाच आदेश होऊन स्वामी वासुदेवानंद सरस्वती यांचे जागी स्वामीजी दिसले. एकदा ते पुण्यातील त्यांचे नातेवाईक सौ. भिडेताई यांचेकडे गेले असता त्यांचे घरी स्वामीजींची भेट झाली. मनाने ग्वाही दिली. वेळोवेळी दर्शन होणारे स्वामी हेच आहेत. आता तर वाचक बंधू भगिनींची सुध्दा पक्की खात्री पटली असेल की माँ भगवतीनेच त्यांच्याकडे गुरूपद सोपवले, माँ भगवतीच्या आदेशानुसार स्वामीजींनी मंत्रदीक्षा देण्याचे स्विकारले. माँ भगवतीच्या भक्तीचा अगाध महिमा, भक्ती सेवेचे बीज जनसामान्यांच्या ह्रदयात स्वामीजींना माध्यम करून माँ च रोपत आहे. चला तर मुळ प्रश्नाकडे पुन्हा वळू की स्वामीजी नक्की कोण? आता एक गंमतीदार प्रसंग येथे आपणास कथन करते.

धुळे येथील एक प्राध्यापिका एकदा बोललेला नवस फेडायला धुळ्यातीलच एकवीरा मंदिरात आल्या. त्यांनी कबूल केल्याप्रमाणे साडी, खण, नारळ, बांगड्या, मंगळसूत्र, पायातील जोडवी असे सर्व सौभाग्य अलंकार घेऊन त्यांनी एकवीरा आईची ओटी भरली. त्यानंतर त्यांनी स्वप्नात पाहिले की, देवीला नेसवलेली हिरवी साडी, खण, नाकातील नथी सह सर्व सौभाग्य अलंकार स्वामीजींच्या अंगावर आहेत. मनोमन खात्री पटली की, स्वामीजीच माँ भगवतीचे सगुण साकार रूप आहेत. यानंतर याच्याशी मिळता जुळता दुसरा प्रसंग. स्वामीजी छपरा (बिहार) येथे गुरूमहाराजांजवळ वास्तवास असतांना एका व्यक्तीस की जो बाबांचा शिष्यपण नव्हता त्याला सुध्दा स्त्री रूपात स्वामीजींचे दर्शन झाले. अगदी तसेच साडी, चोळी, नथ, जोडवे, बांगड्यासह व तसेच हाच अनुभव स्वामीजींची लाडकी मानस कन्या सौ. टीनू बेन (मांडवी, सुरत) यांचा सुद्धा आहे. प.पू. श्री. माधवनाथमहाराज (इंदौर) यांच्या पंचपदीत एक ओवी आहे ***''अनंतरूपे अनंत वेषे नटलासी बहुरंगा''*** या उक्तीशी जुळणारा एक आगळा वेगळा अनुभव अहमदनगर येथील डॉ. लक्ष्मीकांत कौर्टिकर यांच्या बाबतीतला. डॉ. कोर्टिकर अधिक श्रावण मासात स्वामीजींना पंढरपूर येथे श्री. विठ्ठलाच्या दर्शनासाठी घेऊन गेले. तेथे पांडुरंगाच्या चरणांवर डोके ठेवले. आतून आदेश झाला स्वामीजी व पांडुरंग वेगळे नाहीत. प.पू. स्वामीजींनी मुर्तीच्या चरणांवर डोके ठेवले. मंदिरातील पुजाऱ्याने मुर्तीविग्रहाच्या गळ्यातील तुळशीचा हार स्वामीजींना घातला.

स्वामीजी माँ भगवती, श्रीकृष्ण, श्री विठ्ठल, साईबाबा कि अजून काही? ज्ञानेश्वरीतील या ओव्या स्वामीजींना लागू पडतात.

संत तैसे दीपीका। उजळती प्रकाश मार्गा
भुवरी आणुनी स्वर्गा। नक्षत्रे जैसे शोभती
तेथे मार्गी वर्तावे। भूस्वर्गी नित्य रमावे
देही-विदेही असावे। प्राण असती तो वरी

आता थोडे वेगळ्या विषयाकडे वळू या. स्वामीजी भगवान दत्तात्रयांचे अवतार नृसिंह सरस्वती स्वामी प्रमाणेच एकाच वेळी अनेक ठिकाणी प्रकट होऊन साधकाच्या संकटाचे हरण करून त्याचे रक्षण करीत असतात, ह्या गोष्टीचा अनुभव मी स्वत: व अनेक साधक बंधू भगिनींनी घेतला आहे. त्यापैकी एक दोन घटना सांगते.

माझी कन्या चि. प्राजक्ता हिच्या पायाच्या पंजात गाठ झाली होती व त्या ऑपरेशनसाठी मी तिच्यासह चोपडा येथे बहिणीच्या गावी निष्णात अशा सर्जनकडे गेले होते. तिच्या ऑपरेशनच्या वेळी स्वामीजी तिच्याजवळ ऑपरेशन संपेपर्यंत उभे होते. ऑपरेशन थेटरमधून प्राजक्तास स्ट्रेचरवरून बाहेर आणल्यावर वेगळ्या स्वतंत्र रूम मध्ये शिफ्ट केले. त्यावेळी ती बेशुध्दा अवस्थेत खूप बडबडत होती. मी कळवळून आर्ततेने स्वामीजींना प्रार्थना केली आणि पाहते तर काय काही क्षणातच स्वामीजी रूमच्या प्रवेशद्वारातून आत येत असल्याचे मी पाहिले, सुटकेचा नि:श्वास टाकला की स्वामीजी आले आता प्राजक्ताच्या तब्येतीची चिंता नाही. हा प्रसंग घडला त्यावेळी स्वामीजी आश्रमात मुक्कामाला होते. अगदी असेच सौ. संध्याताई (पुणे) यांचे पाठीच्या मणक्याच्या ऑपरेशनच्या वेळी घडले.

स्वामीजींचे दैवी रूप खरेच आपण ओळखू शकत नाही. स्वामीजी माँ चे लाडके भक्त आहेतच. त्यांच्या हृदयात माँ भगवती व परम पूज्य बाबाच विराजमान आहेत. परंतू या लाडक्या भक्ताची इवलीशी चूक देखील माँ खपवून घेत नाही. या विषयीचा काही दिवसापूर्वीच घडलेला गंमतीदार किस्सा. दि. १२/०१/२०२१ बुधवारची घटना कथन करीत आहे.

गानतपस्वी पंडित अजितकुमार कडकडे यांनी आदल्या दिवशीच स्वामीजींना फोन केला व म्हणाले, ''बाबा उद्या माझा वाढदिवस अगदी सकाळपासूनच शुभेच्छांचे चाहत्यांचे, स्नेही नातेवाईकाचे फोन सुरू होतील, लोक भेटायला येतील. तुम्हाला नमस्कार करुन तुमच्याकडुन आशीर्वाद घ्यायला देखील वेळच मिळणार नाही म्हणून आत्ताच फोन केला. स्वामीजींनी त्यांना प्रश्न केला, ''तुम्ही सकाळी किती वाजता उठता?'' त्यांनी उत्तर दिले पहाटे साडे तीन वाजता. स्वामीजी म्हणाले, ''मग त्याचवेळी फोन करा.'' कडकडेनी म्हणालेत 'बाबा तुमची झोप मोड होईल, नाही होणार स्वामीजी उत्तरले. या संभाषणात प. पू. स्वामीजींच्या तोंडून अगदी सहजच निघाले आम्ही पण पहाटे साडेतीन वाजताच उठतो. ठरल्याप्रमाणे सगळे व्यवस्थित झाले. पण आज काय? माँ भगवती म्हणते, तू तीन वाजता उठतोस काय? बघते आज कसा काय उठतो ते! स्वामीजी घडलेला प्रसंग स्वत:च्या शब्दात सांगत होते. नित्योपासना आटोपली, पूजा आरती झाली व सरूताईस म्हणाले,

आज पहाटे तीन वाजता जाग आली, काही क्षणांसाठी डोळे उघडले परंतू अंग एवढे अखडले होते की हलताच येईना. शिवाय डोळ्यात झोप पण खूप शेवटी तसेच अंथरुणावर पडून राहिलो. नंतर केव्हातरी डोळा लागला. जाग आली ती सकाळी थेट सहा वाजता, असे का घडले ? खरे तर स्वामीजींना एरव्ही कोणी काही विचारले तर स्वामीजींचे उत्तर असते माँ झोपवते तेव्हा झोपतो, ती उठवते तेव्हा उठतो. पण त्यांचे तोंडून नकळतपणे शब्द बाहेर पडले पहाटे तीन वाजता उठतो. एवढीच चूक-साधक बंधू भगिनींना आपण अंतर्मुख होऊन विचार करायचा आहे. आपण बोलतांना अशीच भाषा वापरतो की मी हे काम केले, मला अमूक काम करायचे आहे सारखे सारखे 'मी', 'मी' वगैरे. त्यावेळी जगन्माता आपल्याकडे पाहून गालातल्या गालात हसत असेल. स्वामीजींचा हा आगळा अनुभव आपणासाठी बोधपाठ आहे. माँ तिच्या परमप्रिय भक्ताची एवढीशी चूक पण खपवून घेत नाही म्हणजे आपण अजून तिच्यापासून किती कोस दूर आहोत.

ब. खेळ मांडियेला : कृष्ण कन्हैया

आता आपणास दुसरी छानशी गोष्ट सांगते, गोष्टच नाही एक छानसे गुपितच सांगते. आपल्या स्वामीजींवर भगवान श्रीकृष्णाची अहेतूक अशी कृपा आहे. याबाबतीतील दोन चार प्रसंग मी आपणासमोर सांगते. स्वामीजी नेहमी म्हणतात ईश्वराची भक्ती, ईश्वराचे प्रेम तेव्हा खरे., जेव्हा आपल्याला आपल्या प्रेमळ परमेश्वराशी भांडता येईल, भांडता देखील आले पाहिजे, तक्रार करता आली पाहिजे, जसे की संत तुकोबाराया, संत जनाबाई, मीराबाई हे देखील आपल्या लाडक्या परमदैवताशी रागाने भांडले आहेत. तसा उल्लेख संतश्रेष्ठ तुकोबाच्या अभंगात, जनाबाई ओवी, मीराबाईचे पदे यातून आढळतो.

स्वामीजींच्या बाबतीत घडलेली एक घटना सांगते, प. पूज्य बाबा आपले दादागुरूंनी (श्री शक्तीबालक परमहंस) आश्रमासाठी नुकतीच जमिन विकत घेतली होती, एके दिवशी ते स्वामीजींना म्हणाले की, तू त्या जमिनीवर रहायला जा आणि बाबांसाठी झोपडी बांधून झाल्यावर बाबांना घ्यायला ये. हा सर्व प्रसंग सविस्तरपणे स्वामीजींनी स्वत: (गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु) या पुस्तकात लिहिला आहे. पण त्यात न सांगितलेली गोष्ट सांगण्यासाठी हा लेखन प्रपंच. बाबा त्यावेळी छपरा शहराच्या 'गुजरी' भागात सावरिया (कृष्ण) च्या मंदिरात राहत होते. त्या मंदिरापासून आश्रमाची जागा सात-आठ कि.मी. दूर. स्वामीजी सकाळी बाबांना प्रणाम करून तेथे जायला निघाले. त्या काळात स्वामीजींचा उजवा कान नेहमी वाहत असे म्हणून तो पुसून कोरडा करत राहण्यासाठी स्वामीजींनी सावरीया मंदिरात दिवाबत्ती आरतीसाठी आणलेल्या कापसातून थोडा कापूस बरोबर घेतला. स्वामीजी आश्रमाच्या जागेवर जाऊन दिवसभर काम करीत राहिले. रात्री तेथे लाकडी पलंगावर झोपले आणि अचानक स्वामीजींच्या उजव्या कानाला ठणक लागली, स्वामीजींच्या उजव्या कानातून सारखा पू वाहू लागला. वेदनेची तीव्रता नेहमीपेक्षा अधिकच होती तो असह्य ठणका स्वामीजी सहन करीत होते. रात्रभर झोप नाही, सारखी तळमळ. असे का झाले असावे हा प्रश्न विचारत स्वामीजी अंतर्मुख होऊन विचारमग्न झाले. मंदिरातून कापूस घेतल्यानंतर वेदना वाढली हे त्यांना उमगले. रात्रीच अंथरूणावर उठून बसले. मनातच उलगडा झाला. श्रीकृष्णा तुझ्या मंदिरातून इवलासा कापूस काय आणला तर तू वेदना अधिकच तीव्र केलीस. सकाळी

तुझा कापूस तुला परत. मनाशी निश्चय केला. पहाटे लवकरच उठून सर्व आटोपून लवकरच मंदिरात गेले. मनात राग तर होताच. कृष्णाशी भांडण केले. तू स्वत: माखनचोर आहेस, गोपींजवळचे, त्यांच्या घरातले शिंक्यातले दही लोणी तू चोरून खातोस, स्वत: चोर व इवलासा कापूस मंदिरातून घेतला तर तुझ्या लेखी ती चोरी. कापूस आणून तुला व्याजासकट परत करतो. थोड्याच वेळात श्रीकृष्णाला नमन करून म्हणाले, ''हा घे तुझा कापूस तुला परत'' आणि काय चमत्कार पहा. तत्क्षणीच वेदना थांबली, बंद झाली आणि उजव्या कानातून पू येणे त्या क्षणीच थांबले बंद झाले. आज त्या गोष्टीला त्रेचाळीस वर्षे झाली आहेत. परत कानातून कधीच पू आला नाही.

आता एक आणखी मजेशीर प्रसंग. आपले स्वामीजी व कृष्ण प्रेमाचा. भगवान श्रीकृष्णाने स्वामीजींवर भरभरून प्रेम केले. अहेतूक करूणेचा वर्षाव स्वामीजींवर केला. याचा उल्लेख स्वामीजी लिखित ''**श्री गुरूलीलामृत**'' या पवित्र ग्रंथात वाचावयास मिळतो. साधना काळात स्वामीजी गिरनार पर्वतावर श्री गुरूजींच्या सहवासात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुरू शोधात तपस्यारत होते. त्यावेळी एके रात्री त्यांना स्वप्न पडले. स्वामीजी व गुरूजी गंगा किनारी उभे आहेत. स्वामीजी गंगास्नानासाठी गंगेच्या पवित्र विशाल अशा पात्रात उतरतात त्याच वेळी भगवान श्रीकृष्ण प्रकट होतात. श्री गुरूजी श्रीकृष्णास विचारतात, ''याची (स्वामीजींची) सुटका कधी होणार? यास मुक्ती कधी मिळणार? अजून काही कर्माचा हिशेब बाकी आहे काय?'' श्रीकृष्ण उत्तरतात किमान एकशे आठ वेळा गंगास्नान याने केले तरच. गुरूजींनी उत्तर दिले गंगामैयाचे हे रौद्ररूप पाहता १०८ वेळा स्नान करून हा तर आजारी पडेल. कदाचित मृत्युही ओढवेल मग कसे करावे? त्याच क्षणी प.पू. बाबांचे गंगा किनारी आगमन झाले व ते श्रीकृष्णास म्हणाले आता नक्की खरे खरे सांग याच्या ऐवजी मी गंगास्नान किती वेळा करावे? तुझ्या म्हणण्याप्रमाणे केले तर ज्या कार्यासाठी, जगतकल्याणासाठी, धर्म प्रचार प्रसार, जनांच्या उद्धारासाठी याचा जन्म झाला आहे. ते कार्य कसे पूर्ण व्हावे? तेव्हा अगदी खरे खरे सांग कृष्णा मी किती वेळा स्नान करावे? भगवान श्रीकृष्ण प.पू. बाबांना म्हणाले एकदाच. मी तुमचा अधिकार जाणतो, या क्षणी प.पू. बाबांनी गंगेत स्नानासाठी उडी घेतली व त्याच क्षणी स्वामीजींना खडबडून जाग आली....

अशी ही अहेतुक कृष्ण कृपा. कृष्णाचे त्याच्या भक्तांवरील प्रेम या प्रसंगावरुन आपल्या लक्षात आले असेलच, खऱ्या निस्सीम भक्ताला देवपण त्याच्यापासून दूर जाऊ देत नाही. देव आणि भक्त वेगळे रहात नाहीत अशी अद्वैतांनुभुतीची अनुभूती स्वामीजींजवळ येते.

कृष्णकृपेचा आणखीन एक विलक्षण अनुभव स्वामीजींनी स्वतःच सांगितला आहे जो 'इतुक्या जीवांचा करीतो सांभाळ' या ग्रंथात पृष्ठ क्र. ७३ ते ८० मध्ये दिला आहे. श्री गुरुचरित्र ज्यांनी वाचले आहे त्यांना त्यातील एक घटना चांगलीच माहिती असेल. श्री श्रीपाद श्रीवल्लभ भक्तांच्या आग्रहाने दिवाळीच्या दिवशी एकाच वेळी आठ भक्तांकडे उपस्थित होते.आपणा सर्वांची अशीच एक मोठी गैरसमजूत आहे की अशा घटना पूर्वी घडल्या. आता घडत नाहीत, घडणार नाहीत, असे अधिकारी संत पूर्वी होऊन गेले आता नाही. तर मग आता वाचा या दोन विलक्षण घटना. त्याही आजच्या काळातील!

अहमदनगरचे वेद्य श्री. लक्ष्मीकांत कोर्टीकर व त्यांचे कनिष्ठ बंधू वैद्य श्री. ओंकार कोर्टीकर हे दोन्ही भाऊ पूर्ण श्रद्धेने स्वामीजींशी जोडले आहेत. सुमारे पाच सहा वर्षांपूर्वीची गोष्ट त्यांच्या मातोश्री ज्या सेवानिवृत्त

शिक्षिका व उत्तम भागवत कथाकार. त्या महिन्याभरासाठी ऋषिकेशला गेल्या होत्या ऐके दिवशी त्यांचा लक्ष्मीकांतला फोन आला अरे स्वामीजी ऋषीकेशला आले आहेत का? तू त्यांच्या येण्यासंदर्भात मला कळवले नाहीस. ते येथे कोठे उतरले आहेत माझ्यावर नाराज आहेत का? कारण मघाशी ते गंगेत स्नान करित होते. बाहेर आले. माझ्याकडे बघून हात वर केला. मी जागेवरुन उठून त्यांच्या जवळ पोहचण्याच्या पूर्वीच गर्दीत नाहीसे झाले. ते ऐकून वैद्य श्री. लक्ष्मीकांतजी गोंधळात पडले त्यांना वाटले स्वामीजी ऋषीकेशला जाणार असते तर मला हे नक्कीच कळवले असते. स्वामीजींना फोन करुन विचारावे का? त्यांच्या मनात असा वैचारीक गोंधळ चालु असतानाच पंढरपूरहून त्यांच्या सासुबाईंचा फोन आला. त्या पंढरपूरच्या पायी वारीला आळंदीहून पंढरपूरला गेल्या होत्या. त्यांनी विचारले अहो जावईबापू स्वामीजी पंढरपूरला आले आहेत का? मघाशी ते चंद्रभागेत स्नान करीत होते. मी नदीकाठीच बसले होते. त्यांच्या जवळ जाईपर्यंत ते फक्त माझ्याकडे बघुन हसले पण न बोलताच गर्दीत नाहीसे झाले. आता तुम्हीच सांगा आजच्या काळातही अशा घटना घडतात ना? असे अधिकारी पुरुष आहेत ना?

दुसरा असाच एक प्रसंग स्वामीजी त्यावेळेस गुलाबपुरा जि. भीलवाडा (राजस्थान) ला प्रवचनास गेले होते. त्यांचा तेथून अचानक मला फोन आला प्राजक्ता शाळेत पडली तिला गुडघ्यावर थोड खरचटल आहे तू रागवशील म्हणून ती तुला सांगणार नाही तिला डेटॉल वगैरे काही लावून दे मी तर आश्चर्य चकित झाले. स्वामीजी राजस्थानात माझी मुलगी येथे रावेरला. ती त्यावेळेस तिसरीला होती. फोन ठेवला थोड्याच वेळात प्राजक्ता घरी आली शाळेचे दप्तर ठेवले पाणी पिऊन न सांगताच खेळायला जायला निघाली मी तिला विचारले शाळेत तू पडली? ते ऐकून रडवेल्या स्वरात म्हणाली हो ग आई पण त्यात माझी काहीच चूक नव्हती. शाळा सुटल्यावर आम्ही सगळ्याच धावत बाहेर पडलो तेवढ्यात एका मुलीने मला मागून धक्का मारला म्हणून मी पडली पण तुला कोणी सांगितलं? मी उत्तर देणार तेवढ्यात ती पुढे जे म्हणाली ते ऐकून माझी स्थिती तर आश्चर्यचकित हे शब्द अगदी फिके वाटतील अशी झाली अगं आई स्वामीजी कुठे आहेत? कारण मी पडली ना त्यावेळेस मला स्वामीजींनींच हात धरून उभे केले स्कर्टला लागलेली धुळ त्यांनीच झटकली आणि गुडघ्यावर लागले होते त्यावर त्यांनीच फुंकर घातली आणि मग कोठे निघून गेले कोणास ठाउक? आपल्या घरी नाही आले का?

आता आणखीन एक तिसरा प्रसंग माझ्या स्वतःच्याच घरातला. त्यावेळी रावेरला पंधरा दिवसातून एकदा पाणी यायचे. त्यादिवशी पाणी यायचा दिवस होता सकाळी पाणी लवकर आले नाही आमची दोघांची सकाळची शाळा. नाईलाजाने जाणे भाग होते परंतु चिंता पाण्याची. आज पाणी नाही भरले तर पुढचे पंधरा दिवस काय? शेवटी मनाचा हिय्या करुन सगळी मोठी भांडी नळाजवळ आणून ठेवली घरात दोन लहान मुले पाच-सहा वर्षाची प्राजक्ता आणि चार-साडे चार वर्षाचा प्रणव. नळाजवळ लहान दोन पातेली ठेवून त्यांना समजून सांगितले की या लहान लहान भांड्याने पाणी भरायचे आणि या मोठ्या भांड्यात टाकायचे. सगळी भांडी भरुन ठेवायची. शाळेतून परत येईपर्यंत पाणी आले आणि गेले, मनात धाकधुक पोर खेळण्यात लागली असतील तर पाणी भरले की नाही? नसेल भरले तर पुढचे पंधरा दिवस कसे काढायचे? विचार करीत करीत मी घरी आले

बघितलं तर नळाजवळ एक पण भांड नाही. मुलांना तर रीकामी भांडी पण उचलणं शक्य नव्हत. काय झालं असेल? घरात आले तर सर्व भांडी भरलेली, जागच्या जागी ठेवलेली. मला कळेना हा काय प्रकार आहे. मी मुलांना हाक मारुन विचारलं अरे पाणी कोणी भरलं? भांडी कोणी आणून ठेवली? मुलांनी जे उत्तर दिले ते ऐकून तर मी दिङ्मूढ झाले आश्चर्याने स्तिमित होऊन स्तब्ध झाले. दोन्ही मुलं एका स्वरात म्हणाली अग आई तू गेल्यावर पाणी आलं आम्ही पाणी भरत भरत स्वामींना हाक मारली म्हणालो स्वामीजी या ना, आमच्याकडून हे पाणी भरल जात नाही. तुम्ही मदत करायला या आणि आमच्या बरोबर खेळायला पण या! आणि अग आई स्वामीजी आले पण आणि त्यांनी पाणी भरलं, भांडी पण जागच्या जागी ठेवली. मग आमच्या बरोबर थोडावेळ खेळले आणि काय माहित कुठे गेले? तू यायच्या आधीच निघून गेले. मी स्वामीजींना फोन लावला. स्वामीजींनी फोन घेतला स्वामीजी तर आश्रमावर, मी विचारले तर स्वामीजी हसले आणि म्हणाले माँ भगवतीची लीला तिच जाणे !

आता अजून एका मजेशीर प्रसंगाचा उल्लेख करते तो असा की, भुसावळ तालुक्यातील वरणगांव फॅक्टरी येथील थोरात कुटुंब श्री साईबाबांचे भक्त व श्रीकृष्णाचे भक्त. श्रीकृष्ण जन्माष्टमीला त्यांनी गोपाळ कृष्णाचा पाळणा सजविला. श्रीकृष्णाची मोहक मूर्ती पाळण्यात ठेवली. पाळणा झुलवताना श्रीकृष्ण जन्माच्या वेळी ते सर्व पाहतच राहिले. त्यांना पाळण्यात श्री कृष्णाची मुर्ती नाही तर बालरूपात श्री साईबाबा व स्वामीजी दिसत होते.

सुमारे पस्तीस वर्षापूर्वी श्रावण महिन्याचा अधिक मास होता. मांडल (जि. भिलवाडा, राजस्थान) चे वैद्य श्री. लाभशंकर जोशी यांच्या आग्रहाने स्वामीजींना पवित्र तीर्थ श्री नाथद्वारा (राजस्थान) येथे श्रीनाथजींच्या दर्शनासाठी जाण्याचा योग आला. श्रीनाथजी म्हणजे 'बालकृष्णच'. एरव्हीही तेथे कायम गर्दी असते पण आता तर श्रावण महिना त्यात अधिक मास मग गर्दीचे काय विचारावे? तेथील घटना स्वामीजींच्याच शब्दात

श्रीनाथजींची एक वेगळीच परंपरा आहे. दिवसातून अनेक वेळा श्रीनाथजींचा शृंगार बदलला जातो. तितक्या वेळा वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य दाखवतात मग दर्शनासाठी दरवाजा उघडतो. २० ते ३० मिनिटे दरवाजा उघडा, पुन्हा दोन तास बंद त्यामुळे तेथे दर्शनासाठी खूप गर्दी होते आणि २०, ३० मिनिटात सर्वांना दर्शन घेऊन बाहेर निघायचे असते. त्यामुळे स्वाभाविक धक्काबुक्की, चेंगराचेंगरी होते. स्वस्थपणे शांततेने दर्शन करता येत नाही. दर्शन शब्दामागे जे रहस्य आहे त्याचा येथे काहीच अर्थ नाही. बरे काही भाविक भक्त असे की, श्रीनाथजींच्या सर्वच शृंगारात दर्शन करण्याची इच्छा ठेवतात. त्यामुळे गर्दी सारखी वाढतच राहाते. कसेबसे दर्शन करून बाहेर आलो. त्या धक्काबुक्की चेंगराचेंगरीने अनेक लोकांच्या झालेल्या शरीरस्पर्शाने आम्ही थोडे अस्वस्थ, बेचैन होऊन शांत, स्थिर होण्यासाठी एकीकडे बसून राहिलो. ते वृद्ध दांपत्य वैद्यराज व माताजीपण दर्शन घेऊन परत आले आणि म्हणाले, चला. आम्ही सहज स्वाभाविक विचारले, प्रसाद कुठे मिळतो? वैद्यराज म्हणाले, येथे प्रसाद वाटला जात नाही. दुकानातून विकत घ्यावा लागतो. आम्हाला तर आश्चर्य वाटले. आमचा हा पहिला अनुभव की मंदिरात प्रसाद मिळत नाही विकत घ्यावा लागतो. (खेदाची गोष्ट आहे. जगन्नाथपुरीला पण हीच परिस्थिती आहे आणि ते देखील एकेका तिथीसाठी नैवेद्य देणाऱ्यांची (देणगीदारांची) निदान चार-पाच

हजार नावे असतील. लाखो नाही तर करोडोंची आवक असते.) माताजी म्हणाल्या, अन्नदाता (माताजी आम्हाला नेहमीच अन्नदाता म्हणून संबोधन करतात; अजूनही) तुम्हाला प्रसाद हवा ना चला पुढे. एखाद्या दुकानातून घेऊ. आम्ही थोडे चिडल्यासारखेच म्हणालो, प्रसाद आणि विकत? छे छे विकत घेतलेला प्रसाद आम्ही खाणार नाही. मंदिरात बसलेल्या त्या चोराने आम्हाला प्रसाद नाही खाऊ घातला फक्त धक्केच खाऊ घातले. आहेच तो चोर बदमाश. अरे, अरे, अन्नदाता तुम्ही भगवंताला शिव्या देत आहात माताजी मेवाडी भाषेत नाराजी प्रकट करीत बोलल्या. शिव्या नाही देऊ तर काय करू? सकाळपासून गर्दीत त्रासून गेलो. धक्काबुक्की सहन केली. तो आरामात बसून दिवसातून सात-आठ वेळा खातो आणि लोकांना प्रसाद नाही. दुकानावरून विकत घ्यावा लागतो. आमचा राग कमी होईना. आम्ही असेच आणखी काही बडबडत चाललो होतो. वृद्ध वैद्यराज नुसतेच हसत मुकाट्याने चालत होते. माताजी तर नाराज होत्या आम्ही देवाला शिव्या देत आहोत म्हणून.

तेवढ्यात एका दुकानातून आवाज आला, ओ महाराजजी, स्वामीजी महाराज जरा ठहरीए आवाज तर आम्हीपण ऐकला. पण तेथे तर कोणी आपल्या ओळखीचे नाही. तेवढ्यात दुसऱ्यांदा हाक आम्हा तिघाच्या कानावर आली. समोरून येणाऱ्या यात्रीने आम्हाला इशारा केला की दुकानदार तुम्हाला हाक मारतो आहे. आम्ही उजवीकडे वळून पाहिल. एक दुकानदार आम्हाला हात करून थांबण्याचा इशारा करतो आहे. दुकानदार तर एकटाच आणि ग्राहकांची प्रसाद घेणाऱ्यांची खूप गर्दी. तरी तो त्या गर्दीला बाजूला सारून एका द्रोणात प्रसाद घेऊन धावत आमच्याजवळ आला, घाईघाईने हातात प्रसादाचा द्रोण ठेवला. वाकून नमस्कार करीत धावत दुकानात परतला. एवढे ग्राहक होते ना दुकानात? आम्ही तिघे क्षणभर अवाकच झालो. आमच्या हातातील प्रसाद आम्ही तिघांनी घेतला. बाकीचा आसपास चालत असलेल्या यात्रेकरूंना वाटला. सगळ्यांना थोडाच एवढा महाग प्रसाद विकत घेता येतो. माताजी म्हणाल्या, 'बघा, श्रीनाथजीने तुम्हाला प्रसाद खाऊ घातला होय ना? आम्ही म्हणालो, त्याला शिव्या दिल्या म्हणून खाऊ घातला तुम्ही त्या चोराला ओळखत नाही पक्का स्वार्थी आणि बदमाश आहे. एवढासा प्रसाद देऊन आमचे समाधान करू पाहातो. स्वत: मात्र दिवसभरात काय काय पक्वान्न, मेवा, मिठाई खात राहातो. त्याची रीतच अशी आहे. माताजी म्हणाल्या, 'अन्नदाता प्रसाद मिळाला तुम्हाला आणखी काय हवे? आम्ही म्हणालो, आमचे बोलणे जर त्याला झोंबले असेल मनाला लागले असेल तर त्यानं मंदिरात बोलवावं राजभोग खायला. भलतंच काय? माताजी म्हणाल्या.

दुसऱ्या दिवशी त्या प्रेमळ दंपतीच्या आग्रहाने पुन्हा मंदिरात गेलो पण कालच्या धक्काबुक्कीच्या अनुभवाने मंदिरात दर्शनाला न जाता बाहेरच्या परिसरात ओट्यावर जप करत बसलो. थोड्यावेळाने वयाने वृद्धत्वाकडे पोहोचलेला पण अजून मजबूत कणखर शरीर असलेला जसा एखादा भूतपूर्व पहिलवान, हातात एक मोठी काठी, कमरेला पांढरा स्वच्छ पंचा व बाकी शरीर उघडे, इकडे तिकडे पाहात कोणाला तरी शोधत होता. आम्ही दुरूनच त्याला पाहिले. एवढ्या गर्दीत परिचिताला शोधत होता. वैद्यराजजी व माताजी पण दर्शन घेऊन आमच्या जवळ येऊन बसले. काही वेळाने तो वयस्कर वृद्ध आमच्याजवळ आला. आमच्याकडे नीट निरखून पाहिले. न जाणे कसली परीक्षा करत होता. मग डोके हलवले. हेच ते असे तो मनाशी म्हणाला व त्याने दोन्ही

हात जोडून नमस्कार केला आणि म्हणाला, 'स्वामी महाराज' पुढचे शब्दच त्याच्या ओठांतून फुटेनात. आवाज भरून आला कंठ गदगदित, डोळ्यांत अश्रू, भावनांचा आवेग आवरून अश्रू पुसून तो म्हणाला, मी पूर्वी श्रीनाथजींच्या मंदिराचा मुख्य पुजारी होतो. वृद्धत्वामुळे आता काम होत नाही म्हणून पूजा सोडली. माझा मुलगा आता तेथे पुजारी आहे. आम्हाला हे कळेना हे सर्व तो आम्हाला का सांगत आहे. असेल आम्हास त्याचे काय घेणे. पुढे तो सांगू लागला, इतकी वर्षे सेवा-पूजा केली पण श्रीनाथजींची अशी कृपा कधीच झाली नव्हती. कधी ध्यानात, स्वप्नातसुद्धा दर्शन झाले नव्हते. पण आज माझे भाग्य उजाडले. तुमच्यामुळे स्वप्नात का होईना मला दर्शन देऊन गेले. आमच्यामुळे? आम्ही कुतूहलाने विचारले. होय काल रात्री श्रीनाथजी माझ्या स्वप्नात आले. मला दर्शन घडले ते म्हणाले उद्या मंदिरात हे स्वामीजी येतील म्हणून त्यांनी स्वप्नात तुम्हाला दाखवले. तुम्हाला तर कधी पाहिलेले नाही. स्वप्नात पहिल्यांदा पाहिले. श्रीनाथजी म्हणाले, यांना उद्या माझ्या मंदिरात आणून माझ्या नैवेद्याची थाळीभोग खाऊ घालायचा. सकाळी मी खूप आनंदात उठलो. सर्व आटोपून आधी गादीपती आचार्यश्रींना भेटलो. त्यांची परवानगी घेतली. मग व्यवस्थापकांना भेटलो, नंतर आत्ताचे जे पुजारी आहेत त्यांना भेटून ही हकिकत सांगून आतमध्ये आपल्या भोजन भिक्षेसाठी श्रीनाथजींच्या थाळीची व्यवस्था करून आलो आहे. केव्हापासून तुम्हाला या गर्दीत शोधत आहे. त्यांचे अश्रू थांबले. आमचे अश्रू सुरू झाले. आमच्या तिघांच्या डोळ्यांत अश्रू. आम्ही म्हणालो, आम्ही एकटे नाहीत. आमच्या सोबत हे दोघं वृद्ध माताजी व वैद्यजी आहेत. खरे त्यांच्याबरोबर आम्ही आहोत. आम्ही एकटेच येऊन आतमध्ये प्रसाद खाणे आम्हाला योग्य वाटत नाही. थोडा प्रसाद येथेच आणून द्या आम्ही तिघं खाऊ. तो म्हणाला, काळजी करू नका. त्यांचीही व्यवस्था होईल. चला आत गेलो तर नानाविध पदार्थ, पक्वान्न, नानाविध भाज्या वगैरेंची थाळी कसली मोठी परातच आमच्या समोर आली. मूर्तीमध्ये सजीवत्व नसते, मूर्तीत चेतना नसती नुसतीच पाषाण प्रतिमा असती तर कालचे आमचे भांडण, शिव्या कोणी ऐकल्या? कुणाच्या कानावर गेल्या? आमचे मनोरथ कोणी पुरवले?

परमेश्वरा असा हा तुझा अगाध महिमा न कळे सामान्य जना, कनक, कांचन, लोकैषणा, किर्ती यापासून कोसोदूर, विन्मुख असलेल्या आपल्या स्वामीजींना स्वत: माँ भगवतीने गुरूपद बहाल केले आहे. स्वामीजी माँ भगवतीचे लाडके भक्त. त्यांच्या शरीरास माध्यम करून ती परमात्म शक्ती अवघ्या अज्ञानी जनांना भक्तीमार्गास लावत आहे. ज्ञानामृत पाजून जीवन जगण्याचा मार्ग दर्शवत आहे. कारण ***बुडती हे जन देखवेना डोळा.*** स्वामीजींनी कधीच अभिलाषा केली नव्हती की कोणास आपण दीक्षा द्यावी अथवा कुणाचे गुरू व्हावे. त्यांचा मातृवात्सल, मातृ भाव व मनात अत्यंत करूणा असल्याने माँ ने गुरूपद त्यांच्याकडे सोपवले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अत्यंत कठोर तपस्येने योगसाधनेत आत्मोपनच्या ही उच्च स्थितीत पोहचलेल्या स्वामीजींना पाहून आठवते ती ही पंक्ती

योग विशारद तुम्हे बनायो। दैवी शक्तीसे गुरूपद पायो।

क. धरुनि राही गुरुचे बोट

स्वामीजींनी **श्री गुरुलीलांमृत** या ग्रंथात म्हंटले आहे

धरुनि राही गुरुचे बोट। माया न करी साधनी खोट।
अन्यथा पडते ऐसी गाठ। ठकठका।। १५-३२।।

तुम्ही सर्वांनी **'सविता अर्घ्य'** स्मरणिकेत '*पाणी किती आणणार*' हा लेख वाचला असेलच, गुरूवर पूर्ण श्रध्दा ठेवून त्यांचे शब्द प्रमाण मानून त्या प्रमाणे वागले तर किती लाभ होतो त्याबद्दलचे वर्णन करणारा हा लेख म्हणजे या ओळीचे आचरणच होय.

आपल्यापैकी अनेक जण गुरूचरित्राचे पारायण करतात. त्यात श्रीपाद वल्लभांनी त्यांच्या एका शेतकरी भक्ताला त्याच्या शेतात उभे असलेले पीक कापायला सांगतात, अजून कणसात धान्याचे दाणे पक्व सुध्दा झालेले नव्हते. तरी गुरू आज्ञेने त्याने शेतातील पीक कापले. पुढची कथा आपणास ज्ञात आहे. आपण फक्त पोथ्या वाचतो, पारायणे करतो. स्वामीजींनी सांगितल्याप्रमाणे ज्यांनी ऐकले व ज्यांनी ऐकले नाही या बाबतीतल्या दोन घटना मी आपणास सांगणार आहे.

स्वामीजींचा आश्रम जेथे आहे त्या तरसाडा गावाजवळील कडोद या गावची ही घटना आहे. तेथे श्री. जितुभाई गोहिल नावाचे एक बिल्डर व कॉन्ट्रॅक्टर राहतात. तर झाले असे, एके दिवशी जीतुभाई रात्री दहा वाजता आश्रमावर आले. खरे तर स्वामीजींची ही झोपायची, विश्रांतीची वेळ, अत्यंत उद्विग्न, दु:खी मन:स्थितीत ते आले व स्वामीजींना अत्यंत काळजीच्या स्वरात म्हणाले, ''स्वामीजी मला एका शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचे ३० लाखाचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले होते. त्या संस्थेचे ट्रस्टी माझ्या चांगल्या परिचयाचे, त्यांना आज संध्याकाळी मी फोन करून सांगितले की माझी माणसे, बांधकामासाठी लागणारे साहित्य घेऊन रात्री ट्रकने तेथे पोहचत आहेत. त्यावेळी ट्रस्टच्या अध्यक्षांनी मला सांगितले की आम्ही आपल्या सोबत केलेले कॉन्ट्रॅक्ट रद्द केले आहे. दुसऱ्या एका बिल्डरने हे काम २८ लाखात करायची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे आम्ही हे काम त्याला देणार आहोत.'' माझ्या चांगल्या ओळखीच्या व्यक्तीने माझी अशी फसवणूक करावी! मला कळवले देखील नाही. आता सामान टाकायला माणसे येत आहेत त्यावेळी हे मला सांगत आहेत. या गोष्टीचा मला अतिशय राग, संताप, चीड आली, मी आताच रात्रीच्या रात्री तेथे जातो, त्या सर्वांना भेटतो, भले माझे नुकसान झाले तरी हे काम मी २५ लाखात करतो असे सांगून मी हे कॉन्ट्रॅक्ट परत मिळवणार, स्वामीजींनी सर्व गोष्ट शांतपणे नीट ऐकून घेतली व त्याला शांत करीत सांगितले की तू असे काहीही करू नको कारण तू ३० लाखावरून २५ लाखावर काम करायला तयार झाला तर बाहेरच्या जगात तुझ्या शब्दाला किंमत राहणार नाही, लोक तुझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत. 'जे होते ते चांगल्यासाठीच होत असते' असे समजून हा विषय डोक्यातून काढून टाक व घरी जाऊन शांतपणे झोप. त्यांनी स्वामीजींची आज्ञा मानली व ते घरी परतले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानंतर ते आठवड्याने आले ते मिठाईचे पाकिट घेऊनच. अतिशय आनंदाने आश्रमावर धावत येऊन म्हणाले, ''मला कालच एका मंदिराच्या भक्तनिवासासाठी एक करोड रूपयाचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले. जर मी त्या

शाळेच्या कामामध्ये अडकलो असतो, माझे मजूर, माल, सामान त्या बांधकामात अडकले असते तर मला हे काम घेता आले नसते. मी आपल्या शब्दांवर पूर्ण विश्वास ठेवून घरी परतलो खरचं माझ्यासाठी *'जे होत ते चांगल्यासाठीच होत'* हे आपले शब्द अक्षरश: १००% खरे झाले. हे काम होता होता त्याच संस्थेचे मुलांच्या वसतीगृहाचे अजून एक कोटीचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले. हे काम सुरू असतांनाच, त्यांच्या कामाची गुणवत्ता, निष्ठा पाहून श्री. जितुभाईना ब्यारा येथे मार्केट बांधण्यासाठी ३ कोटीचे पुढचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले. खरे तर जितुभाई स्वामीजींचे दिक्षित साधक नाहीत पण त्यांची पूर्ण श्रद्धा स्वामीजींवर आहे. ते स्वामीजींना गुरूस्थानीच मानतात.

या उलट नागपूरची दिक्षित दंपती खूप आर्थिक अडचणीत सापडली, डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढतच होता. त्यांना स्वामीजींनी सांगितले तुम्ही राहता हे घर तुमच्या लहान परिवाराच्या मानाने खूप मोठे आहे, हे तुम्ही विका आणि त्यातून कर्ज फेडून उरलेल्या रकमेत उपनगरात एक छोटासा फ्लॅट विकत घ्या. तो तुमच्यासाठी पुरेसा आहे. हा साधक गुरूचरित्राचे पारायण तर करतो पण स्वामीजींच्या शब्दाचे पालन करायला धजावला नाही, कारण त्या घराशी त्याच्या आईचे असलेले भावनिक संबंध, ते घर त्याच्या वडिलांनी बांधलेले होते. परंतू वर्ष दोन वर्षातच परिस्थिती अधिकच बिकट होत गेली. शेवटी नाईलाजास्तव ते घर त्यांना विकावेच लागले.

आता फरक लक्षात घ्या ज्यावेळी स्वामीजींनी घर विकायला सांगितले त्यावेळी त्या घराची किंमत त्यांना ८० ते ९० लाख रूपये मिळत होती, परंतु त्यांनी स्वामीजींच्या सांगण्याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर काही महिन्यातच सरकारने नोटबंदी जाहीर केली आणि त्याचा परिणामस्वरूप बांधकाम क्षेत्रात कमालीची आर्थिक घसरण झाली आणि शेवटी त्यांनी ते घर विकले त्यावेळी त्यांना फक्त ५५ लाख रूपये एवढीच घराची किंमत मिळाली. परिणाम ना कर्ज पूर्ण फेडू शकले ना स्वत:साठी फ्लॅट खरेदी करू शकले. आज ते अगदी छोट्या फ्लॅटमध्ये भाड्याने राहत आहे. दोघे पतीपत्नी नोकरी करीत आहेत, दोन मुलं शिक्षण घेत आहे, आर्थिक ओढाताण खूप होत आहे. हे विपरित घडायला आणखी एक कारण त्या दंपतीपैकी त्या दिक्षित कन्येची स्वामीप्रती श्रध्दा डळमळीत होऊन मनात विकल्प जागल्याने तिने त्यांची इतरांजवळ निंदाच केली. गुरूनिंदा हा खूप मोठा गुरूद्रोह आहे. या गुरूद्रोहामुळे परिस्थिती अधिकच खालावली. आता पश्चाताप दग्ध होऊन स्वामीजींची क्षमायाचना करून जवळ येण्याचा प्रयत्न करीत आहे. स्वामीजींनी जरी क्षमा केली तरी ती ईश्वरसत्ता, प्रकृती अशा गुरूनिंदेच्या अपराधाची क्षमा करत नाही. याचे रहस्य स्वामीजींचे 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' या ग्रंथात महिषासूर राक्षसाचे देवीचे वाहन सिंहावर आक्रमण करतो या संदर्भात सविस्तर समजावले आहे.

अशीच एक चूक स्वामीजींच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करत माझ्या लहान भावाने केली. त्याने कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्याच्या व्यापाराचे दुकान उघडले. उद्‌घाटनाप्रसंगी स्वामीजींना बोलावले होते. स्वामीजी त्यावेळी जाऊ शकले नाहीत, परंतू नंतर एक महिन्याच्या आत स्वामीजी माझ्या माहेरी पाचोरा येथे जाऊन आले आणि त्यांनी माझ्या भावाला दोन गोष्टी समजावून सांगितल्या.

१) इंग्रजी भाषेत एक म्हण आहे. Big bite is not a good bite मोठा लचका तोडू नका तो न चावता येतो न गिळता येतो. (२) तू आताशी व्यवसायाला सुरवात केली आहे. तुझ्या अन्नधान्य माल जळगांवच्या व्यापाराला विक. पै दोन पै कमी मिळतील पण जळगांव येथून जवळ असल्याने व्यापाऱ्यांकडून पैसे वसूल करू शकशील. यापेक्षा दूर व्यापार, सौदा निदान दोन-तीन वर्षे करू नकोस. माझ्या भावाने हो ला हो असे तोंडावर म्हंटले. त्यानंतर महिन्याच्या आतच दैवीलिला अशी झाली की, गुजराथमधील बडोदा येथून एक व्यापारी आला, त्याने एक ट्रक माल खरेदी केला, लाखो रूपयांचे पेमेंट त्याने बँकेचा ड्राफ्ट देऊन केले त्यानंतर पुन्हा १५ दिवसांनी अजून एक ट्रक माल खरेदी केला त्याचेही पैसे लगेच बँक ड्राफ्टद्वारा चुकते केले. त्यामुळे भावाचा विश्‍वास बसला. कदाचित तो मनातल्या मनात स्वामीजींच्या सांगण्यावर हसला पण असेल. नंतर पुन्हा १५ दिवसांनी त्या माणसाने अजून एक ट्रक माल खरेदी केला. आधीच्या दोन अनुभवाचा विश्वास असल्याने भावाने एक ट्रक माल पाठवला. आता तो व्यापारी ट्रक व मालासह गायब झाला. पैसे न आल्याने भाऊ स्वत: तपास करायला बडोद्याला गेला, त्यावेळी तो व्यापारी दिलेल्या पत्त्यासह फरार होऊन गेला होता. भावाचे लाखो रूपयांचे नुकसान झाले. त्यामुळे झालेले कर्ज वाढत गेले तो आज खूप कर्जबाजारी आहे. अशा अनेक घटना सांगता येतील. गुरू वचनावर श्रध्दा ठेवणे व न ठेवणे याच्या परिणामस्वरुप दोन ध्रूवाचे अंतर पडते.

अजुन एक प्रसंग आता सांगते. एक साधिका जिचा पती स्वत: गायनॅक डॉक्टर व सरूताई या दोघींना साधारणत: पंधरा महिने आधी सुचित केले होते की डॉक्टरांसाठी ऑगस्ट आणि सरुसाठी नोव्हेंबर येथे पर्यंत तुमची प्रसूती येणार नाही याची काळजी घ्या. पूर्वसूचना मिळून देखील जे व्हायचे तेच झाले. स्वामीजींनी सांगितलेले तेवढे गांभीर्याने मनावर घेतलेच नाही, अगदी बरोबर त्या त्या महिन्यातच प्रसूती झाली. दोघींची अपत्ये जन्मत: सुदृढ सुस्थितीत असतांना देखील मृत्यु ओढावला.

आता माझ्या बाबतीतली गोष्ट सांगते. मी उन्हाळ्याच्या सुट्टीत आश्रमावर आलेली होती आणि २-३ दिवस थांबून येथून पाचोऱ्याला (माहेरी) जायचे होते. कारण तेथे सरकारी दवाखान्यात दर गुरूवारी फॅमिली प्लॅनिंगच्या ऑपरेशनचा कॅम्प असायचा. ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरांचा उत्तम, निष्णात सर्जन म्हणून नावलौकिक होता, म्हणून माझ्याकडच्या (सासर-माहेर दोन्ही) परिवारांचा तेथेच ऑपरेशन करावे असा आग्रह होता. मी आश्रमावरून घरी जायला निघाले त्यावेळी स्वामीजी मला एवढेच म्हणाले की, ऑपरेशन या गुरूवारी न करता पुढच्या गुरूवारी कर. स्वामीजींच्या बोलण्याचा उद्देश, आशय मला कळाला नाही. मी फक्त 'हो' म्हटले. घरी गेल्यावर माझ्या दोन्हीकडच्या परिवाराने मला सांगितले की, या गुरूवारी केले काय किंवा त्या गुरूवारी केले काय ऑपरेशन तर तेच डॉक्टर करणार आहेत. तर मग याच गुरूवारी का नाही करायचे? तुला आठ दिवस जास्त विश्रांती मिळेल. त्यामुळे सगळ्यांच्या आग्रहाने मी त्याच गुरूवारी ऑपरेशनसाठी दवाखान्यात दाखल झाले. ते कुशल डॉक्टर ऑपरेशन करत होते. काही वेळापूर्वी माझ्या आधी एका बाईचे ऑपरेशन व त्यानंतर माझा नंबर. त्याचवेळी डॉक्टरांच्या घरून काही तरी अपघटनेचा फोन आला व ते डॉक्टर निघून गेले म्हणून माझे ऑपरेशन त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या ज्युनिअर डॉक्टरने केले. त्याने नेमकी काय

चूक केली ते मला सांगता येणार नाही, पण ऑपरेशनच्या दुसऱ्याच दिवशी मला डाव्या हाताची हालचाल करता येईना. मला ब्लाऊज देखील आई किंवा बहिण घालून द्यायची, अशी हाताची स्थिती झाली होती. औषधोपचार, मालिश, शेकणे सर्व उपचार झाले. जवळ जवळ एक महिना होत आला तरी माझा डावा हात हलेना. जणू कांही हात लाकडाचा झाला होता. त्यावेळी स्वामीजी माझ्या तब्येतीची विचारपूस करायला पाचोरा येथे आले व त्यांनी माझ्या डाव्या खांद्यावर सहज थोपटले आणि अचानकच माझ्या हाताची हालचाल सुरू झाली. मे महिन्याची सुट्टी संपल्यानंतर मी रावेरला माझ्या घरी गेली त्यावेळी मला पोटात तीव्र वेदना होऊ लागल्या. माझे पोट खुप दुखू लागले. मी चोपड्याला एका सर्जन डॉक्टरांना तब्येत दाखवायला गेली. तेथील डॉक्टरांनी सोनोग्राफी, एक्सरे वगैरे काढण्यास सांगितले. सगळे रिपोर्ट बघून नंतर सांगितले की ज्या डॉक्टरांनी तुमचे ऑपरेशन केले त्याने मोठी घोडचूक केली की मूर्खपणा केला आहे. गर्भाशयाला आतड्यासह टाके घातले गेल्यामुळे तुमचे गर्भाशय खाली उतरले (हार्निया) आता पुन्हा मोठे ऑपरेशन करून आधीचे टाके काढावे लागतील व गर्भाशयाच्या खाली एक जाळी बसवावी लागेल आणि हा सगळा खर्च चाळीस हजारापेक्षा जास्त होईल. त्यानंतर देखील तुम्ही खाली वाकून वजनदार वस्तू / पाण्याची भरलेली बादली कधीही उचलू शकणार नाही. स्वामीजींनी त्या दिवशी काय सांगितले होते त्याचे रहस्य मला नंतर कळाले, परंतू आयुष्यभर पश्चातापाची वेळ आली.

आश्रमाचा दिक्षीत साधक वैद्य योगेश बहुतेक आपल्या सर्वांच्या परिचयाचा असेलच. त्याचा एक अनुभव आपणास सांगते. इंचगिरी संप्रदाय जो श्री. स. स. भाऊसाहेब महाराज उमदीकर आणि त्यांच्या अनेक शिष्यांनी नावारुपास आणला. त्या संप्रदायात योगेशची बालपणी दीक्षा झालेली होती. त्याला साधन करताना येणाऱ्या काही शारिरीक अडचणींबाबत त्याचे सदगुरु श्री गणपतराव महाराज, कन्नूर यांनी देह सोडल्यानंतर मर्गदर्शन मिळेनासे झाले. पुढे स्वामीजींच्या संपर्कात आल्यावर आपण मला आध्यात्मिक मार्गदर्शन कराल का असे योगेशने विचारल्यावर स्वामीजी उत्तरले, तू ज्या परंपरेतून दीक्षीत आहेस ती परंपरा अत्यंत सुदृढ व सशक्त असून आम्ही तुला वेगळा गुरुमंत्र देण्याची आवश्यकता नाही. आम्ही तुला आवश्यक मार्गदर्शन करु तत्पूर्वी तुझ्या गुरुस्थानी जाऊन मी स्वामी श्री सवितानंद यांच्याकडून आध्यात्मिक मार्गदर्शन घेऊ इच्छितो आपण अनुमती द्यावी अशी प्रार्थना कर असा आदेश स्वामीजींनी योगेशला दिला.

ही विलक्षण घटना पूर्णपणे उलगडण्याकरीता थोडी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे.योगेशच्या सदगुरुंचे दादागुरु श्री. स. स. भाऊसाहेबमहाराज उमदीकर हे अत्यंत श्रेष्ठ आध्यात्मिक अधिकारी पुरुष होते. त्यांचे एक प्रसिद्ध शिष्य म्हणजे श्री. गुरुदेव रानडे, निंबाळ येथे ज्यांचा आश्रम आहे हे होत. योगेशचे पूर्ण कुटुंब या श्री स. स. भाऊसाहेबमहाराजांचे मूळगाव उमदी येथील निवासी. १९१४ साली श्री. स. स. भाऊसाहेबमहाराज यांनी देह सोडल्यानंतर त्यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या उमदी येथील राहत्या वास्तूचे (देशपांडे वाड्याचे) वैभव ओहोटीस लागले. १९५६ साली श्री. गुरुदेव रानडेंच्या पुढाकाराने उमदी येथे एक छोटासा टुमदार आश्रम उभारण्यात आला पण दुर्दैवाने अल्पावधीतच त्या मठाची व्यवस्था ढासळली. योगेशच्या वडीलांनी त्यांच्या

सदगुरुंच्या आज्ञेनुसार या ठिकाणाचा जीर्णोद्धार व व्यवस्थेस स्वत:स वाहून घेतले. त्या मठाची व्यवस्था पहाण्याचे भाग्य या परिवारास लाभले. अशा पार्श्वभूमीवर स्वामीजींनी योगेशला श्री. स. स. भाऊसाहेब महराज (संप्रदायाचे मूळ पुरुष) व सदगुरु श्री. गणपतराव महाराज यांना प्रार्थना करण्यास सांगितले.

यात्रमाणे योगेश व त्याचे वडील कन्नूर येथे गेले असता तेथील दत्तात्रय मंदिरात व शेजारील गुरुमहाराजांच्या समाधी जवळ योगेशने मला केवळ अनुमतीच नव्हे तर त्या अनुमतीची काही खूण पटवा अशी कळवळून प्रार्थना केल्यावर श्री भगवान दत्तात्रयांच्या तीन शीरकमलांच्या जागी एक श्री. भाऊसाहेब महाराज दुसरे श्री. गणपतराव महाराज तिसरे स्वामीजी असे तीन चेहेरे अत्यंत आनंदाने व कौतुकाने अनुमती देण्याऱ्या मुद्रेत योगेशला दिसले. हा बुद्धीचा खेळ किंवा भास तर नाही ना असा मनात संशय येत असताना व एकमेकांशी काही चर्चा झालेली नसताना योगेशच्या बाबांना देखील हाच अनुभव आला (अर्थात हाच अनुभव परीचितांशी बोलत, अभिवादन स्वीकारत योगेशच्या बाबांना उशीर झाला.) ते येऊन नमस्कार करेपर्यंत योगेश ध्यानस्थ झाला होता. बाबाही ध्यानाला बसले.यथावकाश उठून परतीच्या प्रवासात उभयतांनी एकमेकांना हा दृष्टांत सांगितला.चालू वाहन थांबवून उभयता पिता-पुत्र किती तरी वेळ आनंदाने हात जोडत, आनंदाश्रू ढाळत हा अनुभव व त्याचा आनंद अनुभवत होते.

ड. रसवर्ज्यं रसोप्यस्य

स्वामीजींनी एका पुस्तकांत त्यांच्या लहानपणीची आठवण सांगतांना लिहिले आहे की ते कधीच स्वत:हून सांगत नसत की भाजीत मीठ कमी आहे की जास्त आहे की टाकलेच नाही. आईने विचारले तरच सांगायचे, आई कधी रागावून म्हणायची, अरे तू सांगत का नाही भाजीत मीठ नाही, अगदी शांतपणे, मुकाट्याने कशी रे खातोस. स्वामीजी म्हणायचे, 'त्यात काय सांगायचे होते असे कधी तरी, मुद्दाम थोडीच कोणी करतं?' आणि अन्नाला नाव पण ठेवू नये. हे जर त्यांचे संस्कार जन्मजातच आहेत आणि आता तर ते अवधूत आहेत, हाती भिक्षापात्र आहे. सांगायचा तर प्रश्नच येत नाही. त्यांच्या चेहऱ्याकडे बघून कोणी अंदाज देखील करू शकणार नाही की स्वयंपाकात काही गडबड आहे. शांत, प्रसन्न चेहरा, हसतमुख राहून माँ भगवतीचा प्रसाद म्हणून सर्व स्विकारणारे, त्यामुळे होते काय घरचे लोक जेवायला बसले की तेव्हाच कळते स्वयंपाक कसा झाला आहे. कोणी स्वामीजींना विचारले तरच सांगतील ते ही खुमासदार, गंमतीदार शब्दात की स्वयंपाक करणाऱ्याला हसू यावे व तिचे मन ही दुखू नये. कधी काळी गप्पांच्या ओघात त्यांच्या तोंडून ऐकलेले गंमतीदार किस्से, प्रसंग.

एकदा मी स्वामीजींना विचारले, ''स्वामीजी कॉफी पिणार?'' स्वामीजी म्हणाले, ठीक आहे कर पण आम्ही एकदा कॉफी प्यालो तशी तू करू पण शकणार नाहीस आणि आम्ही पिऊ पण शकणार नाही. म्हणजे कशी? मी विचारले, स्वामीजींनी सांगितले-एकदा आम्ही एका गरीब आदिवासी बाईकडे प्यायला पाणी मागितले, ती म्हणाली महाराज पाणी देते व चहा पण करून देते, स्वामीजी म्हणाले चहा पित नाही 'मग कॉफी तर घ्या' तिचा आग्रह. तिच्या प्रेमळ आग्रहामुळे स्वामीजी हो म्हणाले. त्यानंतर तिने पटकन दाराशी बांधलेल्या

बकरीचे दूध काढले, मुलाला जवळच असलेल्या दुकानावर पाठवून कॉफीची 'वडी' मागवली. आता डेअरीमिल्क चॉकलेट मिळतात तशी पूर्वी कॉफीची वडी मिळायची. तीन भागात रेघ पाडून विभागलेली आता मिळते तशी पावडर स्वरूपात नाही, त्या वडीला एक विचित्र वास यायचा आणि घरात साखर नव्हती म्हणून गुळ. बकरीचे दुध, कॉफीची वडी, गुळ या कल्पनेनेच मी शहारले. पण त्या गरीब आदिवासी बाईचे मन दुखवू नये म्हणून स्वामीजी ती कॉफी आनंदाने प्याले. शिवाय कॉफी छान झाली होती अशी शाबासकी सुद्धा दिली.

आता दुसरी घडलेली घटना सांगते, बडोद्याच्या वयाने लहान असलेल्या एका गृहिणीने, स्वामीजींना अनेकवेळा आग्रह केला की 'माझ्याकडे जेवायला या.' स्वामीजी उदयभाऊंकडे मुक्कामाला उतरायचे. कार्यक्रमाच्या व्यस्ततेमुळे स्वामीजी जायचे टाळायचे. एकदा वेळ होता म्हणून तिला म्हटले की आज येणार, तिचे आमंत्रण स्वीकारले. तिला खूप आनंद झाला. अतिशय आनंदात घरी जाऊन स्वयंपाक केला, स्वामीजींनी चेहऱ्यावरचा भाव किंचितपण न बदलू देता शांतपणे भोजन केले. जेव्हा ती जेवायला बसली त्यावेळी तिच्या लक्षात आले की अतिआनंदाच्या भारात तिने काय उलट-सुलट केले. शेवाईच्या खिरीत साखरेऐवजी मीठ व भाजीत मिठाऐवजी साखर, आहे की नाही जेवणाऱ्याची कसोटी? पण स्वामीजी माँ अन्नपूर्णेचा प्रसाद म्हणून ते सुध्दा आनंदाने जेवतात चेहऱ्यावरचा भाव न बदलता.

एकदा एका कन्येकडे सकाळी अल्पोपहारात पोहे खाल्ले. पोह्यात मीठ खूप जास्त होते. पण स्वामीजींनी दर्शवले नाही. त्यावेळी त्या कन्येच्या मोठ्या बहिणीने तिला म्हटले, 'अग पोह्यात किती मीठ टाकले आणि आता स्वामीजी तेथून २० कि.मी. दूर प्रवचनासाठी गेले. कार्यक्रमाच्या व्यस्ततेमुळे दुपारी ते भोजन घेणार नाहीत. रात्रीचे जेवण घ्यावे असे त्यांचे ठरले आहे. रात्रीच्या जेवणात भाजी-पोळी, थोडी खिचडी. जेवण झाल्यावर त्या कन्येने विचारले, 'स्वामीजी भाजी, खिचडी चांगली झाली होती का? स्वामीजी हसत हसत म्हणाले, बेटी तुझे गणित चांगले आहे.' तिला कळेना स्वामीजी असे का म्हणाले. स्वत: जेवायला बसली तेव्हा लक्षात आले, भाजीत मीठच टाकले नव्हते. ती स्वत:शीच हसली. सकाळी पोह्यात मीठ जास्त तर भाजीत मीठ नाही म्हणजे एकूण सरासरी बरोबर. तुझे गणित चांगले आहे हे स्वामीजींचे शब्द पुन्हा आठवून ती हसली.

दुसरीकडे पुन्हा पोहे खाण्याचा प्रसंग, पुन्हा एका कन्येकडे पोहे खाण्याचा प्रसंग. त्यात सुद्धा मीठ जास्त. कन्येने स्वामीजींना विचारले. मीठ बरोबर होते ना! स्वामीजी हसून उत्तरले, पोहे अजून थोडे पाहिजे होते. तिला वाटले स्वामीजींना खूप भूक लागली असेल व पोहे कमी वाढले गेले म्हणून स्वामीजी असे म्हणत आहेत. तिने स्वत: जेव्हा उरलेले पोहे खाल्ले तेव्हा लक्षात आले. तिने स्वामीजींना विचारले, 'तुम्ही सांगितले नाही की मीठ जास्त होते'. स्वामीजी म्हणाले सांगितले तर खरं की पोहे कमी पडले. स्वामीजींच्या बोलण्याचा अर्थ नंतर तिच्या लक्षात आला.

तर तिसऱ्या प्रसंगात एका गृहिणीने हौसेने पालकाचे भजे स्वामीजींसाठी केले आणि पुन्हा प्रश्न मीठ बरोबर आहे ना! स्वामीजी हसून म्हणाले, 'ताई आपल्याकडे मराठीत एक म्हण आहे की खाल्लेल्या मीठाला जागले पाहिजे!' मग खाणाऱ्याच्या लक्षात राहिले पाहिजे की आपण या घरचे मीठ खाल्लं आहे. बाईच्या चटकन

लक्षात आले तिने पुन्हा भिजवलेले पीठ कालवले व नविन भजे बनवले. वेगवेगळ्या प्रसंगातून आपल्या लक्षात तर आल असेलच स्वामीजींनी रसनेवर ताबा मिळवला आहे. कधी कोणतीच तक्रार नाही अन्न हे पूर्णब्रह्म. माँ अन्नपूर्णेचा प्रसाद व भिक्षापात्रात घेतलेले अन्न टाकायचे नाही. आपण स्वत: अंतर्मुख होऊन विचार करूयात आपण काय करतो ?

आता एक वेगळा पण गंभीर प्रसंग. स्वामीजींनी एकदा चर्चेच्या ओघात सांगितलेला. संपूर्ण भारतभर पायी भ्रमण करीत असतांना प्रवासात त्यांचा मुक्काम बिहारमधील प्रसिध्द तीर्थक्षेत्र 'गया' (पितृगया) ला एका आश्रमात होता. आश्रमाच्या गादीपती महंतानी स्वामीजींना आग्रहाने व आदराने विनंती करून थांबवून घेतले, कारण दुसऱ्या दिवशी दसऱ्याचा सण होता. तेथे साधुसंन्याशांचा मोठा भंडारा होता. दुसऱ्या दिवशी ७०/७५ साधू-संन्याशी जेवायला येणार होते. पंगत बसली, वेळेवर सर्व लोक आले. स्वामीजींचे भिक्षापात्र म्हणून पंगतीतील रांगेत न बसता स्वामीजी थोडे बाजूला बसले. भोजनात वरण-भात, भाजी-पुरी शिवाय वेगवेगळे तीन मिष्टान्न पदार्थ, चटणी, कोशिंबीर भाज्या देखील तीन वेगवेगळ्या अशी पदार्थांची रेलचेल होती. त्यातील एक भाजी होती दुधी भोपळ्याची आणि काही वेळा असे होते दुधी भोपळा कडूपण निघतो. तयार केलेल्या अन्नाचा नैवेद्य दाखवायचा असतो म्हणून साधुसंन्याशी नैवेद्य करण्याच्या आधी चाखून बघत नाहीत आणि त्या दुधी भोपळ्याच्या भाजीचा घास तोंडात घेताच दोन-चार साधू थू-थू करीत उठून उभे राहिले. गदिपती महंताना अपशब्द बोलू लागले, शिव्या देऊ लागले, तेवढ्यात त्यांचे लक्ष शांतपणे जेवत असलेल्या स्वामीजींकडे गेले. एकाच भिक्षापात्रात सगळे पदार्थ एकत्र झाले होते. या लोकांसारखे केळीच्या पानावर स्वामीजी जेवले नाहीत. सगळा मोर्चा स्वामीजींकडे वळला. दोन-चार जण तर अंगावर धावले. अशासाठी की स्वामीजींनी सुध्दा भोजन अर्धवट सोडून त्यांच्याबरोबर आरडा-ओरडा करण्यात सामील व्हावे. जेवतांना एरव्ही मौन असलेले स्वामीजी प्रसंग बघून मौन सोडत त्यांना म्हणाले, 'मुद्दाम कोणी काही केले नाही. दुसरे इतर पदार्थ आहेत ते खा, भाजी कडू आहे तर खाऊ नका. एका भाजीसाठी, भरलेल्या पानावरून उठून तुम्ही महंताला शिव्या देत आहात, खरे तर तुम्ही अन्नाचा अपमान करीत आहात, आमचे तर भिक्षापात्र आहे, त्यात सगळं एकत्र झाल आम्ही ते टाकू शकत नाही. परमपूज्य स्वामीजी इंद्रजीत आहेत असा उल्लेख येथे वावगा ठरणार नाही. 'इंद्रजीत' म्हणजे सर्व इंद्रियावर ताबा मिळवलेला. आपला आपल्या जीभेवर तरी ताबा आहे ?

पुर्वी चर्चा केली त्याची पुन:श्च आठवण स्वामीजी माँ चे लाडके दुलारे आहे. ***'माँ गिरीजा के तुम ही दुलारे गुरूरूप में तुमही पधारे'*** या प.पूज्य बाबांच्या आरतीतल्या ओळी स्वामीजीसाठी पण लागू पडतात.

शरणागत भक्तवत्सल माँ भगवती आपल्या शरणी आलेल्या भक्ताची कधी कठोर परीक्षा घेते तर कधी त्याला घाबरवून सोडते. यातून तिच्या भक्ताची दृढ निष्ठा, खरी भक्ती कदाचित माँ अजमावून पाहत असावी. आपला भक्त डगमगतो काय की मागे हटतो, की मार्गच बदलतो वगैरे.

एकदा चर्चेच्या ओघात स्वामीजींनी सांगितलेली गोष्ट जी त्यांनी स्वमुखाने स्पष्ट केली. आपणास ज्ञात आहेच की स्वामीजींनी वेगवेगळ्या ठिकाणी चार्तुमास केले आहेत. १९९० साली तरसाडा येथे आश्रम

बांधण्यापुर्वी; केलेला चातुर्मास त्याबद्दलची गोष्ट. आपण नेहमीच पाहतो स्वामीजी नेहमी त्यांच्या जवळ असलेल्या भिक्षापात्रातच भोजन करतात. हे भिक्षापात्र प.पू. बाबांनी स्वत: स्वामीजींना अवधूती दीक्षेच्या वेळी दिलेले आहे. ध्यान पूजा पाठ आटोपल्यानंतर चातुर्मासात स्वामीजी भिक्षेसाठी जात, कोणाच्याही घरासमोर भिक्षेसाठी उभे राहायचे. ***ॐ भवति भिक्षां देही*** असा उच्चार करायचे. त्यांची भिक्षा मागण्याची एक आगळी पद्धत होती. स्वत:च त्यांनी काही भिक्षेचे नियम घेतले होते. आज एका घरी भिक्षा घेतली तर दुसऱ्या दिवशी दुसऱ्या टोकाला तिसऱ्या दिवशी अजून वेगळ्याच गृही. त्यामुळे व्हायचे असे की कुणालाच कळायचे देखील नाही की स्वामीजींनी कालच्या दिवशी कोणते पदार्थ खाल्ले व आज कोणाकडे भिक्षेला जाणार? त्यामुळे माँ भगवतीने स्वामीजींची चांगलीच परीक्षा घेतली. गंमत अशी की संपूर्ण चातुर्मासात स्वामीजींनी मुगडाळ-भात व भेंडीची भाजी फक्त हेच आणि एवढेच पदार्थ भिक्षेत खाल्ले. आश्रम बांधण्यापूर्वी स्वामीजींचा मुक्काम एका मंदिरात होता. मंदिराच्या समोर राहणारी एक शिक्षिका हे दररोज पाहत असायची. एके दिवशी ती स्वामीजींना म्हणाली, 'दररोज हेच पदार्थ खाण्यापेक्षा माझ्या घरून भिक्षा घेऊन जात जा.' यावर स्वामीजींनी दिलेले उत्तर अतिशय मार्मिक आहे. साधकास बोध घेण्यासारखे आहे. स्वामीजी म्हणाले, 'साधनेत बुद्धीची चतुराई कामाची नाही आणि भिक्षा ठरवून मागता येत नाही.' माँ ची लीला तर खरी पुढेच आहे. गंमत अशी की कधी कधी स्वामीजी या शिक्षिकेकडे भिक्षेला जायचे. नेमके तिच्याकडे पण स्वयंपाकात तेच पदार्थ त्यावेळी असायचे. तिच्या स्वत:च्याच मनाचा गोंधळ व्हायचा. ती माँ पुढे नतमस्तक व्हायची. माँ भगवतीचा जो निर्णय असेल त्या प्रमाणेच घडेल. माँ अन्नपूर्णेकडे भिक्षा मागत असताना कधी स्वामीजींच्या मनात चुकून वेगळा विचार आला तर सदैव प्रेममयी, करूणामयी असलेली माँ आपल्या लाडक्या भक्ताला अद्दलही घडवते. स्वामीजींनी या संदर्भात मागे पोस्ट टाकल्याचे आपणास आठवत असेलच.

कांही महिन्यापूर्वी प्रवासात असतांना स्वामीजी एका ठिकाणी म्हणजे आळंदीला एका गृही मुक्कामाला गेले. त्यांनी येण्याविषयीची पूर्व सूचना ४/५ दिवस आधी दिलेली होती. घरातील गृहीणीने स्वामीजींसाठी सायंकाळच्या नाश्त्याला खमण (ढोकळा) बनवले होते. नेहमी प्रमाणे सरूताईंनी स्वामीजींना फोन करून विचारले, 'स्वामीजी नाश्ता झाला? व काय खाल्ले?' स्वामीजी म्हणाले, 'सरू तुला तर माहित आहेच की कोरडे पदार्थ खायला, गिळायला आम्हाला किती त्रास होते ते. म्हणून कोरडे पदार्थ अनुकूल वाटत नाही बस इतकेच. तुझ्या मामीला माहित होते आम्ही येणार असल्याचे मग इडली-सांबर न बनवता खमंण का बनवले?' ही अशी इवलीशी तक्रार. त्यानंतर पुढच्या ८/१० दिवसांच्या प्रवास काळात रोज सायंकाळी नाश्त्याला वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या गृही इडली-सांबरचाच नाश्ता मिळाला. कधी कधी तर असेही होते प्रवासात वेगवेगळ्या ठिकाणी भोजनात पुरण-पोळीच खावी लागली.

वरील गोष्टी वाचून साधकांनी विचार करायचा आहे की, एवढे थोर साधक असूनही माँ कशा प्रकारे अद्दल घडवते. बोलण्या सांगण्याच्या ओघात मागची गोष्ट अपूर्णच राहिली. तेव्हा पुन्हा पूर्व पदावर. स्वामीजी चातुर्मास करतात त्यावेळी त्यांचा भिक्षेचा नियम काटेकोरपणे ते पाळत होते. त्यांच्या मनोमन संकल्पानुसार ते

जास्तीत जास्त पाच घरीच फक्त भिक्षा मागायची, एखाद्या घरी पूर्ण भिक्षा मिळाली तर दुसऱ्या क्षणी पुढे जायचे नाही. कधी कोणाकडे सुतक, वृद्धी, मासिक धर्म अशा काही करणांमुळे भीक्षा मिळाली नाही तर पुढच्या तीन, चार घरी जात नसत. कधी कधी तर असाही योग यायचा की स्वामीजींना पाचही घरी भिक्षा मिळाली नाही. त्यांना असे रिक्त हस्ते परत येतांना पाहून त्या गावातील सरपंच, तसेच मंदिराचे पुजारी म्हणाले जर तुम्हास चारही घरी भिक्षा मिळाली नाही तर पाचवे घर कायमसाठी आमचे ठेवा. यावर स्वामीजी म्हणाले, निमात घेतलेल्या व्रअतात अशा पळवाटा कामाच्या नाहीत. बुद्धीची चतुराई तर मुळीच कामाची नाही. भिक्षेसाठी कोणतेही घर नियमित ठेवता येत नाही. निमंत्रण घेता येत नाही. तरसाडा येथील चातुर्मासात ३/४ वेळा असेही घडले आहे की कोठेच भीक्षा न मिळाल्यामुळे स्वामीजींना उपवास घडला आहे.

आपल्याला निरीक्षणातून, स्वामीजींच्या सहवासातून लक्षात आलेच असेल की स्वामीजी घेतलेला वसा, व्रत, नियम ते कधीच मोडत नाहीत. दिलेला शब्द व वेळेच्या बाबतीत तर स्वामीजी अत्यंत शिस्तप्रिय प्रसंगी कठोर पण नियम मात्र अत्यंत काटेकोरपणे पाळतात. स्वामीजी आपल्या प्रवचनातून नेहमी सांगत असतात, 'मनुष्य हा मोठा चतुर हुशार असा प्राणी आहे.' एखादी गोष्ट वेळेवर केली नाही तर तो वेगवेगळ्या पळवाटा शोधतो, वेगवेगळी कारणे, सबब सांगून आपल्या वर्तनाचे समर्थन करतो. साधनेत तक्रार पळवाटा, चुकारपणा कामाचा नाही.

आतापर्यंतच्या काळात स्वामीजींच्या अनेक आध्यात्मिक ग्रंथांचे प्रकाशन झाले आहे. त्यांचे लेखन, मार्गदर्शन, त्यांचे प्रवचन हे वाचून-ऐकून असे वाटते की आपले स्वामीजी एक युगपुरूष आहेत. त्यांचे लेखन अनेक युगानुयुगे धर्मरक्षणाचे कार्य करेल. स्वामीजींची पुस्तके युगानुयुगे वाचकांस, साधकास मार्गदर्शक ठरतील. जीवन जगण्याची कला, दृष्टी देणारे आहेतच यात शंकाच नाही. त्यांचे शब्द व सिध्दांत हे चेतनयुक्त असल्याने एक नवी उर्जा व जोश, एक नवी दिशा आपणास देतात. हा लेख नसून वेगवेगळ्या प्रसंगाची एक शब्दमाला, एक शलाका आहे ती आपणास पसंत पडेल अशी आशा व्यक्त करून ही शब्दफुलांची ओंजळ स्वामीचरणी अर्पण करते.

विषया विनिवर्तनो निराहरस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ।

(भगवद्‌गीता अ. २ श्लोक ५९)

स्वामीजींवरती श्रीकृष्ण, माँ भगवती, गुरु दत्तात्रेय यांच्या अपार कृपेची आणि मायेची साक्ष देणारे काही मोजकेच प्रसंग आपणास या लेखाद्वारे माहित झाले आहेत. अन्य काही प्रसंग देखील सत्संग, प्रवचन प्रवासातून आपणास कळाले असतील किंवा भविष्यात कळू शकतील. या सर्व लेखन प्रपंचाचा केवळ एकमात्र उद्देश आहे तो म्हणजे साधक सज्जनांना स्वामीजींच्या आध्यात्मिक अधिकाराची कल्पना यावी व त्यांच्याकडून वर्तन व्यवहार समयी सतत स्मरणपूर्वक मर्यादा पालन व्हावे हाच आहे. आपल्या सेवा, हट्ट, आग्रह, प्रेम याचा एखाद्या शस्त्राप्रमाणे वापर करुन स्वामीजींना आपले म्हणणे मान्य करायला लावणे किंवा आपल्या इच्छेप्रमाणे

वागावयास भाग पाडण्याचा प्रयत्न करणे या गोष्टींचा स्वामीजींना प्रचंड तिटकारा आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, **धबधब्याच्या पाण्याखाली ना अंघोळ करता येते ना ते पिता येते.**

स्वामीजी प्रवासात असताना, आपल्याकडे मुक्कामास आले असताना अथवा आपण अन्य शिष्याकडे सत्संगाकरिता गेलो असता या वरकरणी हसतखेळत आपल्यातीलच एक होत मिसळून जाणाऱ्या स्वामीजींच्या बाह्यरूपात एक अवधुत अंतरंगात विराजत आहे हे विसरता कामा नये. बैठक व्यवस्था, आसन, वस्त्रे, स्वयंपाकाची भांडी-कुंडी, बिछाना, स्वागत, संभाषण या सर्व माध्यमातून यथासंभव मर्यादापालन ही उत्तम साधकाची तळमळ असली पाहिजे.

आपल्याला सेवा करावयास मिळते हेच आपले भाग्य आणि स्वामीजी ती स्वीकारतात हीच त्यांची कृपा याचे सतत स्मरण व त्या अनुषंगाने आचरण सर्व साधक-सज्जनांना आध्यात्म पंथात पाथेय प्राप्त करण्याकरीता दिशादर्शक ठरावे हीच आदिगुरु माँ बालेश्वरी व दादागुरु श्री शक्तिबालक परमहंस यांच्या चरणी आर्त प्रार्थना.

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

सविता अर्घ्य स्मरणिका-पवित्र ग्रंथ तो गुरुमाउलींचा!
स्मरणिका-अमृतकुंभ तो गत जीवन क्षणांचा!
स्मरणिका-मधुकोष तो भावनांचा!
स्मरणिका-पुष्पगुच्छ तो अनुभवांचा!
स्मरणिका-संगम तो स्तुती आणि आराधनेचा!

आदरणीय परमपूज्य स्वामीजी, सादर चरण स्पर्श! स्वामीजी आपली स्मरणिका सविता अर्घ्य मिळाली तिचे वाचन करीत असताना सहज भाव प्रकट झाला की, जिनके मुखपर तेज और तेजमे सौम्यता, जिनकी वाणी मे ओज और ओज मे मधुरता! जिनके हृदय मे वात्सल्य और वात्सल्यमे प्रविणता, जिनके जीवन मे अध्यात्म और अध्यात्ममे सरलता!! ऐसे संयम के पूर्ण प्रतिमान दिव्य सितारे, आस्था के अप्रतिम केंद्र शत-शत वंदन हमारे!! स्वामीजी स्मरणिकेच्या रूपाने अतिशय अप्रतिम अशा ग्रंथाचे निर्माण झाले आहे. या स्मरणिकेची रचना अंतरंग, बाह्यरंग या बद्दल काय बोलावे शब्द अपूर्ण पडतील इतकी उत्कृष्ट कामगिरी या गोष्टीचा अनुभव नक्की येईल! स्मरणिका तयार करण्याची परवानगी देऊन आपण आमच्यावर कृपा केली स्वामीजी आपले कोटी कोटी वंदन!! योगेश दादा आणि त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे त्यांच्या संपूर्ण कार्याबद्दल, सुंदर अशा स्मरणिकेची निर्मिती व तिच्या घवघवीत यशाबद्दल खूप खूप अभिनंदन!!!

– स्वामीजींची मंत्र दीक्षित कन्या,
शुभांगी पाटील, रावेर.

दिपक तू माझ्या अंधारी पथाचा

१. हे तो स्वर्गीचे देणे

– प्रा. भालचंद्र पाठक, बेटावद

गाठी पूर्वजन्माचे काही पुण्य असेल, आई-वडील, भावंडं, मित्रपरिवार, शिक्षकजन सर्वचजण प्रेम माया करणारे भेटले. शिक्षक म्हणून नोकरी झाली. पाठीशी कुणी नसतांना मानाचा राज्याचा 'आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' लाभला. आयुष्यभर व्याख्याने, प्रवचने, कीर्तने, भाषणे, कथाकथनं केली. उदंड यशप्राप्ती झाली. आता वय झालं. ७७. गात्रं शिथिल झाली. हाताला, मानेला थोडा कंप झाला. नेत्रतेज कमी झाले. कान, अवयव नियंत्रणाबाहेर गेले. सारं जीवन अळणी झालं. मधुमेह, रक्तदाब, संधिवात हे नवे मित्र लाभले. बाहेर पडणं कठीण झालं. बालचमू जसा जुने रंग विटलेले खेळणे सांदीकोपऱ्यात भिरकावतो तसं जीवन प्रवाहापासून दूर जात राहिलेल. मग सहाजिकच अशा वेळी कुणी 'बोला... लिहा...' असं म्हटलं तर श्रावणातली दहीहंडी आपल्याच मस्तकावर फुटल्याचा आनंद किंवा उत्सवातल्या देवीची पालखी अकल्पितपणे आपल्याच खांद्यावर आल्याचा आनंद होतो. उत्साह वाढतो. हातापायात तात्पुरते बळ येते. विद्यार्थी प्रयोगशाळेत प्रयोग करतात. लोखंडी खिळ्याला वायर गुंडाळून विद्युत प्रवाह सोडतात. खिळ्यात तात्पुरते चुंबकत्व येते तशी गत होते.

बालपणीच्या आठवणी एकदा लिहून झाल्या तेव्हाच अतृप्तता होती. पुष्कळ काही राहिल्याची खंत होती, पण प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा असतात. झालं आता ही संधी पुन्हा नाही असं वाटत असतांनाच पुन्हा दुर्मिळ संधी मिळाली. मन तृप्त झालं. आठवणींच्या मधाच्या पोवळ्याला सुखद धक्का बसला आणि आठवणींच्या लाटा उसळू लागल्या. मधुर आठवणींचे पक्षी गतायुष्याच्या आकाशात मुक्त संचार करू लागले.

हा आठवणीचा पक्षी स्वैर विहरत येऊन विसावला. श्री रामेश्वर कामेश्वराच्या बेटावदच्या शिवमंदीरात स्वामीजींचा रोजचा नियम होता. आईकडून तेल-वात-पणती घ्यावी. सांजवेळी शिवमंदीरात जावं. अंधार पडलेला असावा. तेव्हा बेटावदला वीज आलेली नव्हती. तो अंधार अधिकच भयावह वाटे. स्वामीजींबरोबर केव्हा केव्हा मी जाई. मी भित्राच होतो. आजही आहे. स्वामीजी पुढे व सावकाश पावलांनी मी मागे मागे जाई. छातीएवढ्या उंच शिवपिंडी – त्याच्या चौकोनी साळुंका. दोन सारखी शिवलिंगे गूढ गंभीर वातावरण. स्वामीजी वात सरसी करून ती पेटवायचे. अंधार चिरीत प्रकाश उजळायचा. त्यामुळे वातावरण अधिकच गूढ व्हायचे. मग सुरू व्हायची स्वामीजींची शिवस्तुती.

कैलासराणा शिव चंद्रमौळी। फणींद्र माथा मुकुटी झळाळी।
कारूण्यसिंधू भवदु:ख हारी। तुजवीण शंभो मज कोण तारी॥ १॥

स्वामीजींचा भक्तीत भिजलेला स्वर. 'तुजवीण शंभो मज कोण तारी।' हे म्हणताना प्रगट होणारा निर्वाणीचा भक्तीभाव अंत:करणाचा खडक फोडायचा. वाटायचं आपणही ही शिवस्तुती पाठ करावी. तसा माझा हा निर्णय मंदीरात असे तो टिकायचा! घरी गेल्यावर सपशेल विसरायचो. घरी वातावरण पूर्ण धार्मिक-वडील कित्येक स्तोत्रांचे उत्तम संग्राहक. आवाज अतिशय सुंदर. भक्ती नसलेल्याच्या मनी भक्ती जागृत व्हायची, पण स्वत: पडले कर्मदरिद्री! कुठून लाभ होणार? वाटायचं, झालं आता. निघूया. पण स्वामीजी म्हणत रहायचे, 'ॐ

नम: शिवाय।' मी काकुळतीला आलेलो असायचो. पण बोलता यायचं नाही. तसाही मी फक्त श्रोताच होतो. स्वामीजींना निरीक्षित असायचो. हवेने फरफरणारी पेटती ज्योत. स्वामीजींचा कंपीत आवाज, पण भक्तीमय वातावरण निर्माण करायला समर्थ! मग दोनही शिवलिंगांवर भाळप्रदेश टेकवला जाई आणि थोड्या कष्टानेच स्वामीजी शिवमंदीरातून बाहेर पडत. पाठोपाठ अधीरतेने मी...

आता मागे वळून पाहतांना वाटतं हा नियतीचा काही संकेत होता कां? बालपणातही एवढी शिवभक्ती इतकी जागृत कशी? मोठ्यांनाही न साधणारा हा भक्तिभाव इतका पराकोटीचा कसा? आणि इतरही मंदीर गावात असतांनाही शिवभक्तीच कां? संन्यासाची बीजं यात अनुस्यूत होती कां? *'तुजवीण शंभो मज कोण तारी'* म्हणतानाची आर्तता इतकी प्रखर कां? तेव्हापासूनच मन शिवभक्तीत असे लीन झालेले कां?

जादूगार जादूचे खेळ करतो. खापऱ्यांचे रूपये आणि दोरीचे साप होतात. त्याला या खेळामागचे रहस्य ज्ञात असते. चकित व्हायची पाळी फक्त आपली असते! स्वामीजी तेव्हापासूनच आपला हात पुरणार नाही अशा उंचीवर होते. आपल्यालाच हे कळत नव्हतं. कळलं तेव्हा तर स्वामीजी आणखीनच उंचावर जाऊन पोहोचले. मी एकदा हा विचार भाबडेपणाने स्वामीजींना बोलून दाखवला. 'स्वामीजी मात्र मी तुमच्या बरोबर येऊ शकत नाही. फरफट होते.' मला म्हणाले, 'जाऊ दे रे. फार विचार केल्याने शीण होतो? आपण मित्र आहोतच..'

विचार करता करता सहज एक शालेय जीवनातला प्रसंग आठवला. आमच्या शाळेत दर शनिवारी स्पर्धा असे. कधी वक्तृत्व, कधी चित्रकला, कधी हस्ताक्षर, कधी पाठांतर, कधी शुद्धलेखन, कधी काही तर कधी काही. अशीच एकदा वक्तृत्व स्पर्धा होती. आम्ही आठवीत होतो. सन १९६० मधली ही घटना. आमची वये तेव्हा साधारण तेरा वर्षांची. मुख्याध्यापक प्रात:स्मरणीय कै. काकासाहेब ल. ह. भाकरे यांनी शिपायाकरवी मला ऑफिसमध्ये बोलावून सांगितले, या शनिवारी वक्तृत्व स्पर्धा होईल. विषय 'स्वामी विवेकानंद' आहे. तुझं नाव मी घेतलं आहे. आता काय बोलणार? अर्जुनासारखी माझी अवस्था झाली. 'सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।' वर्गात जाऊन बसलो. वर्गावर्गावर नोटीस फिरली. ती मला आधीच ठाऊक होती. स्वामीजींचा व माझा एकच वर्गात असल्याने परिचय नुकताच झाला होता. त्या स्पर्धेत स्वामीजींनीही भाग घेतला. शाळा सुटली. घरी आलो. वडिलांना सांगितले. त्यांनी विवेकानंद जीवनी एका पानात बसवली. जीवाच्या आकांताने पाठ केली. इतकी पाठ केली की विसरणेच शक्य नाही. शनिवार उजाडला. प्रार्थना झाली. सगळी शाळा शाळेच्या ग्राऊंडवर जमली. शिक्षक स्थानापन्न झाले. मुख्याध्यापक आले. प्रास्ताविक होऊन वक्तृत्व स्पर्धा सुरू झाली. आधी दोघे तिघे बोलले. मग माझा नंबर लागला. उभा राहिलो. धैर्य गोळा केले. कोरड्या पडलेल्या तोंडामधून जीभ फिरवली. मोठ्या कष्टाने 'अध्यक्ष महाशय' म्हणालो आणि एवढं पाठ केलेलं सर्वच भाषण विसरलो. सर्व मुलं हसू लागली. लाजलो. खाली मान घालून जागेवर येऊन बसलो. मग सरांनी पुढचं नाव पुकारलं –– मनोहर चुनिलाल खैरनार ....

मी पहात होतो. स्वामीजी उठले. धीटपणाने टेबलाजवळ गेले. सर्व सभेवरून एक कटाक्ष आत्मविश्वासपूर्वक टाकला. धीर गंभीरपणे बोलायला सुरवात केली. एक एक पैलू अलगद उकलत गेले. विवेकानंद लोकांच्या मनात आकाराला आले. असं एक वचन आहे की *'शिवोभुत्त्वा शिवं यजेत्।'* शंकराची पूजा करायची तर शंकरच व्हावे. स्वामीजी विवेकानंदच झाले होते. पण खाकी हाफपँट व इन केलेला पांढरा शर्ट

तेव्हाच्या त्या विवेकानंदांनी धारण केला होता. आठवीच्या त्या मुलाने शब्दसामर्थ्याचा प्रत्यय सर्वांना आणून दिला. स्थिरपणे उभी असलेली मूर्ती, स्वामीजी खाली बसले तेव्हा लोक भानावर आले आणि मग शिकागोची आठवण करून देणारा टाळ्यांच्या प्रचंड कडकडाट झाला. मी सुखावलो. मला आलं नाही, याला आलं. तर आता कोणत्याही गोष्टीतलं गमक जाणून घ्यायचं असेल तर याला जवळ केलं पाहिजे. याच्याशी मैत्री केली पाहिजे.

रात्री मुख्याध्यापकांनी घरी बोलावलं. म्हणालो, 'तुला आलं नाही तर आता पुन्हा भाग घेणं नको असं वाटलं का नाही?' मी लगेच उत्तरलो 'हो काका!' अरे, हो काका काय! बघ जेवढे नावाजलेले वक्ते आहेत त्या प्रत्येकाचं पहिलं भाषण पडलेलं आहे जसं तुझं पडलं. मग त्या आठवीच्या मुलाला आचार्य अत्रेंपासून गॅरीबॉल्डीपर्यंत सर्वांची उदाहरणं देऊन झाली. मग पुन्हा तोच विषय पुढील शनिवारी तीच स्पर्धा होऊन पहिला क्रमांक मनोहर, दुसरा क्रमांक जयवंत हिराचंद खैरनार व तिसरा क्रमांक माझा काढला! 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' ही म्हण खरी असल्याचा प्रत्यय तेव्हाच्या मनोहरकडे पाहून आज येतो. तोच आत्मविश्वास, बोलण्यांची धाटणी, निश्चल उभे राहणे, आवाज थोडा बारीक, किनरा पण त्या बालवक्त्याला पाहून कुणालाही विवेकानंदच आठवावेत. या प्रसंगातून उमगलं ते एवढंच पाठ करून, कुणाचा पाठिंबा घेऊन, उसन अवसान आणून यश मिळत नाही. तिथे ओरिजिनॅलिटीच लागते! असा प्रत्यय आणून मला धीट बनवणारा माझा बालमित्र मला भेटला.

स्वामीजींचं वाचन अगदी तेव्हापासून ८ वी, ९ वी पासूनच अफाट होतं. मोठमोठाली जाड पुस्तकं त्यांनी सहज लीलया वाचावीत. मला वाटायचं स्वामीजी काय खरच वाचत असतील! चाळत असतील! म्हणून एकदा लोकमान्य टिळकांचं पुस्तक सरांनी त्यांना दिलं. मी आपला लांबच उभा राहिलो. शनिवारची दुपार स्वामीजींनी दुकान सांभाळत पुस्तक वाचून काढलं. तेव्हा स्वामीजींचे वडील कै. चुनिलाल काका कापड दुकान चालवित. दुकानात स्वच्छता कमालीची असे. एक स्लेटपाटी व पेन्सिल लाकडी पेटीवर असे. ती पेटी पैशांची पेटी असे. सतरंजीचा कोपराही दुमडलेला वडीलांना चालत नसे इतकी स्वच्छता दुकानात असे. तीच स्वच्छता वागण्यात, विचारात, बोलण्यात आलेली. कोणताही फाफट पसारा नसे. बोलण्यात अतिशयोक्ती, न्यूनता हे दोष नसत. वेळ निष्काळजीपणे कधीच घालविला जात नसे. म्हणून तेव्हा सुध्दा स्वामीजींची भीती वाटे. तेव्हा सुध्दा म्हणजे आजही. खोटेपणा कधीच खपला नाही. फावल्या वेळेचा उपयोग सहसा वाचनाकडेच केला जाई. सायंकाळी फिरायला जाणे (वारूड रस्ता, साधारण दोन किलोमीटर) व गप्पा मारणे असे. गप्पात ललित वाङ्मय, आज काय वाचले ते कसे वाटले? असे मर्मग्राही विश्लेषण असे. परिणाम हाच झाला की आमची मतं तयार झाली. श्रवणातून तत्परता प्राप्त झाली.

आम्हाला स्वामीजींच्या एवढाली पुस्तकं वाचण्याचं रहस्य कळेना. एकदा लोकमान्यांचं पुस्तक त्यांनी वाचून संपवलं आणि पुस्तकाचा ताबा घेत मी विचारलं, 'या पानावर काय कथाभाग आहे?' 'या प्रसंगातून टिळक काय म्हणाले, इथे लिहिले आहे?' तर आमची शंका दूर झाली. बोधीसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मरणशक्ती अशीच अफाट होती. पुस्तकांचा मोठा संग्रह त्यांचा होता. एका चाहत्यास हीच शंका आली. त्याने विचारले, 'बाबासाहेब ही पुस्तकं तुम्ही खरेच वाचली आहेत?' बाबासाहेब म्हणाले, 'एका कपाटाजवळ

जा. उघडं. काढ एक पुस्तक उघड. बघ पुस्तकाचं नाव हे आहे. तू उघडलेल्या पानावर हा मजकूर आहे.' चाहत्यास अतिशय आश्चर्य वाटले.

आमचे अनुभव विश्व अगदी छोटे. आमची शक्ती थोडी. आम्हाला आश्चर्य वाटणं सहाजिकच. पण स्वामीजींचा आवाका मोठा.. ईश्वर अशी माणसे हेतूत: जन्माला घालतो. त्याला सृष्टीचा पसारा चालवायला समर्थ माणसं हवी असतात. तो ती जन्माला घालतो. त्यांची जीवने अलौकिक असतात. सामान्य माणसांच्या विचारांची, अनुभवांची झेप तिथपर्यंत जाऊ शकत नाही. त्यांना ते अशक्य वाटते. अद्‌भूत वाटते. ज्याच्या त्याच्या ताकदीचा हा विषय आहे. स्वामीजी आम्हाला बालपणापासूनच अनाकलनीय होते. आमच्यासाठी ते अशक्य वाटणारे असेच होते.

स्वामीजींची विचार करण्याची पध्दत, समजावून सांगण्याची पध्दत अगदी लहानपणापासून अद्‌भूत, मोठ्यांना वयस्करांना लाजवणारी अशीच होती. एक प्रसंग आठवतो. आम्ही नववीत होतो. सगळीच मुले साधारणपणे एकाच वयाची. कोणाच्या डोक्यातून कल्पना निघाली, 'चला आपण कोजागिरी साजरी करायला शेतात जाऊ'. झालं. आम्ही १२/१३ मुले तयार झालो. सगळं सामान घेतलं. सर्वांनी ते उचललं. शेतात पोहोचवलं. खिचडीचा व कढीचा बेत ठरला. आमच्यातले जाणकार पुढे सरसावले. खिचडी शिजू लागली. कढी तयार झाली. दूध उकळले. रात्रीचे ११ वाजले. वातावरणात गारवा आला. टिपूर चांदणे सर्वत्र पसरले. गप्पांना ऊत आला. सगळेच मनसोक्त रमले. कुणी गाणी म्हंटली, कुणी विनोद सांगितले. मुलं थोडी थकली भुकेली झाली. 'चला गड्यानो! जेऊया' असा विचार पुढे आला. आजूबाजूच्या शेतात ज्वारीची ताटं उभी होती. सगळेच आनंदाच्या शिखरावर होते आणि एकदम मातीची ढेकळं अंगावर पडू लागले. सगळेच घाबरले. पळून पळून पळणार कुठे? पोटात भुकेचा खड्डा पडलेला. आता काय करावं? जो तो जीव लपवू लागला. आपल्याला लागू नये. डोकं वाचवू लागला. पण ढेकाळांचा मारा कमी होईना. कुणाचेच डोके चालेना. मनोहर म्हणजे आजचे आपले आदरणीय स्वामीजी बरोबर होते. म्हणाले, ''कोण मारतंय? पुढे या. काय पाहिजे सांगा. आम्ही काय बिघडवलेलं आहे? हा मारा थांबवा. पुढे या.'' ढेकळे येण्याचं थांबलं. '' अरे या ना! कोण आहे?'' आणि आमच्याच वर्गातली मुलं ज्यांना आम्ही सहलीला बरोबर घेतलं नव्हतं. ती रागावलेली. या कृतीतून त्यांचा राग बाहेर पडलेला. शेवटी ती पुढे आली. 'अरे, आम्हीच आहोत. तुम्ही आम्हाला का नाही बरोबर घेतलं? आम्ही रागावलो आहोत.' त्यांना बोलावलं. मनोहरने समजूत घातली. जेवण तयार होतं ते सर्व मिळून फस्त केलं. अशी साजरी झाली कोजागिरी!

सगळे घाबरलेले असतांना स्वामीजीच तेवढे निर्भय होते. त्यांनी आवाहन केलं, बोलणी केली. त्यांना समजावलं व जेऊ घालून त्यांच्यासह कोजागिरी साजरी केली. हे वागणं मोठ्या माणसांनाही न जमणारं नाही का? निर्भय राहणं, संकटप्रसंगी निर्भय रहाणं हा तर विशेष गुण होय. वडीलधाऱ्या माणसांनाही एवढा पोच रहात नाही. तो बालवयात स्वामीजींमध्ये होता त्याचीच ही कथा.

आम्ही सगळेजण दहावीत असताना एका नवीन मुलाने आमच्या शाळेत आमच्या वर्गात प्रवेश घेतला. त्याचे नाव अरविंद वाडीले. त्याचे वडील पोलीस खात्यात हवालदार होते. त्या काळात महाराष्ट्रात दारूबंदी असूनही ते स्वत:च पट्टीचे पिणारे. म्हणून या नवीन मुलाशी कोणी मैत्री करण्याचे धारिष्ट्य करीत नसे. त्यावेळी

त्या गांगरलेल्या, गोंधळलेल्या मुलाला मनोहरने जवळ केले. त्याच्याशी मित्रता केली. आपुलकीने सर्व तऱ्हेने धीर दिला. आम्ही अकरावीला (त्याकाळी अकरावीला मॅट्रीकची परीक्षा असे) आल्यावर त्याच्या घरचे एकंदरीत वातावरण अभ्यासाला अनुकूल नसल्याने तो अतिशय उदास राहू लागला. हे मनोहरच्या लक्षात येताच त्याने मित्रत्वाच्या नात्याने आपुलकीने विचारपूस करून जाणून घेतले. त्यावेळी आमचा एक मित्र डी. एस. बाविस्कर याचे दुसरे स्वतंत्र घर होते. तेथे रात्री अभ्यासाला एकत्रित येत असत. त्या डी. एस. ला स्वामीजींनी समजून सांगून या अरविंद वाडीलेला अभ्यास व झोपायची सोय करून दिली. मी स्वत:, अरविंद वाडीले आणि डी. एस. बाविस्कर आम्ही गणितात कच्चे. त्यावेळी स्वामीजी आम्हास गणित शिकवायचे. तसेच इतर विषयातील न समजलेले भाग (विशेषत: सामान्य विज्ञान) आम्हाला शिकवायचे. त्यामुळे आम्ही तिघ चांगल्या मार्कानी मॅट्रीक (एस.एस.सी.) पास झालो. आमच्या काळात मॅट्रीकनंतर सहजगत्या नोकरी मिळत असे. हा आमचा मित्र अरविंद वाडीले नासिक येथे मिग फॅक्टरीत नोकरीस लागला. त्याचे बरोबर आमच्या बेटावदचे इतर २/३ जण सुद्धा नोकरीला लागले. नंतरच्या काळात अरविंद वाडीले व स्वामीजींची कधी भेट झाली नाही. पण अरविंद वाडीले इतर मित्रांना व बेटावदचे जे कोणी भेटतील त्यांना आवर्जुन सांगायचा की, मी जो काही आहे तो मनोहरमुळे, अन्यथा माझ्या आयुष्यास वेगळे वळण लागून भरकटलो असतो.

आम्ही एस.एस.सी. (मॅट्रीक) ला असतानाचीच एक विचित्र घटना घडली. त्यावेळी आमच्या वर्गात ३/४ मुली होत्या. एके दिवशी शाळा सुरू होताच एका मुलीने तिच्या बेंचवर स्टुल उलटे करून ठेवलेले पाहून कुणीतरी मुलाने मुद्दामच आपल्याला चिडविण्यासाठी हे कृत्य केले असावे असा गैरसमज करून, त्या मुलीने आपल्या जातीस्वभाव दोषाने मुलही देणार नाहीत अशी अश्लील शिवी उच्चारली. त्या नंतर वर्ग सुरू होताच आमचा एक वर्ग मित्र श्रीराम ठाकूर उभा राहिला आणि सरांना म्हणाला की, 'सर, एखाद्या मुलाने वर्गात मुलींसमोर अशी शिवी उच्चारली असती तर त्याला शिक्षा झाली असती, पण जर मुलीने घाणेरडी शिवी दिली असेल तर तुम्ही तिला काय शिक्षा देणार?' सर क्षणभर गोंधळले आणि विचारले, 'काय झाले?' त्यावेळी श्रीराम ठाकूर खाली बसला. त्यावेळी कधी न बोलणारा आमचा मित्र डी. एस्. बाविस्कर तावातावाने उभा राहून सर्व बोलला. त्याला वर्गातील इतर मुलांनी साथ दिली. वर्गातले तप्त वातावरण बघून आमच्या शिक्षक वर्गातून बाहेर पडून सरळ मुख्याध्यापकांना भेटले आणि पुढील पाच मिनिटात मुख्याध्यापक स्वत: वर्गात आले. ते स्वभावाने आणि शिस्तीने अतिशय कडक आणि विशेष म्हणजे ते L.L.B. झालेले होते. त्यांनी वर्गात पाऊल ठेवताच टाचणी पडेल अशी शांतता पसरली. आता कोणच काही बोलेना. ज्यांनी तक्रार केली ते आमचे दोन्ही वर्ग मित्र तेही गप्प. त्यामुळे मुलांनीच काही चूक केली असे समजून मुख्याध्यापकांनी आमच्या सगळ्या वर्गाची कान उघाडणी सुरू केली. हा अन्याय सहन न होऊन मनोहर ताडकन उभा राहिला आणि म्हणाला, 'सर तुम्ही वस्तुस्थिती समजून न घेता आम्हा मुलांना रागवत आहात. चूक मुलीने करावी आणि बोलणी आम्ही खावी हा कुठला न्याय?' त्यानंतर जवळजवळ सुमारे २०/२५ मिनिटे आमचा व मुख्याध्यापकांचा वाद सुरू झाला. मुख्याध्यापकांनी विचारले, 'आज वर्गात सर्वात आधी कोण आले होते'. मनोहर म्हणाला, 'मी आलो होतो.' काल संध्याकाळी वर्गातून शेवटी कोण गेलं? मनोहरच. त्यावेळी मनोहरचे नाव, त्याचा स्वभाव, चारित्र्य यामूळे त्याच्याकडे कोणी बोट दाखवेल अशी स्थिती नव्हती. मुख्याध्यापकांना मनोहरचे नांव, स्वभाव, वागणे काय

आहे हे माहित होते. मग मुख्याध्यापकांनी रागा रागाने विचारले, मग स्टुल तेथे आपोआप जाऊन पडला कां? त्यावर मनोहर शांतपणे म्हणाला की, एक शक्यता आहे सर. का तर काल सायंकाळी किंवा आज सकाळी वर्ग भरण्याअगोदर चपराशाने वर्गात झाडू मारताना त्याने ते उचलून ठेवले असेल. त्याचा हा तर्क ऐकून मुख्याध्यापक शांत झाले. मग त्या मुलीला दोन शब्द सांगून निघून गेले.

त्यानंतरची गंमत अशी, त्यावेळी सकाळी शाळेच्या मुख्य फलकावर सुविचार लिहिण्याचे काम मनोहरच करायचा. दुसऱ्या दिवसापासून मनोहरने असे सुविचार लिहायला सुरूवात केली की म्हणायला सुविचार पण त्या मुलीला लक्षात येईल असे खोचक किंवा सरांनाही आपण अपराध केला असे लक्षात येईल. जसे नेहरूंच्या एका वाक्यात म्हटले आहे, 'आपल्या बोलण्यातून आणि शब्दातून त्या व्यक्तिचे चारित्र्य झळकते'. अशा आशयाचे वेगवेगळे सुविचार कोठून कोठून शोधून आणून सतत सात दिवस लिहीत राहीला. शेवटी त्या मुलीने भर वर्गात उभे राहून, हात जोडून सर्वांची माफी मागितली. आमच्या वर्ग शिक्षकांनी ही मनोहरचे नाव प्रेमाने घेऊन म्हणाले, 'तू लिहीत असलेल्या सुविचारामुळे तुला कुणीही बोलू शकत नाही.'

आणखी एक घटना सांगतो, आमच्या शाळेचे बांधकाम सुरू असतांना काही खोल्याचे छत झाले नव्हते. तेव्हा ११ वी च्या वर्गातील आमचे मित्र ज्याच्या विषयाचा तास नसेल तेव्हा तेथे जाऊन अभ्यास करायचे. आमचा मित्र डी. एस्. बाविस्कर त्या उघड्या वर्गात जाऊन भिंतीशी बसून अभ्यास करीत असे. त्यावेळी भिंतीच्या पलिकडून दुसऱ्या खोलीतून त्याला त्रास देण्यासाठी वात्रट मुलाने त्याच्यावर खडे फेकायला सुरूवात केली. डी. एस्. ने त्याला २/३ वेळा समजावून सांगून मना केली पण तो त्याचा वात्रटपणा बंद करीना. म्हणून डी. एस्. ने रागारागाने एक खडा त्याच्या दिशेने भिरकावला आणि त्याचे दुर्दैव असे की तो नेमका भिंतीच्या पलीकडे बसलेल्या एका मुलीला लागला. ती लागलीच रागारागाने उठली आणि पाय आपटत मुख्याध्यापकांकडे तक्रार करायला गेली. हे लक्षात येताच डी. एस्. खूप घाबरला. आता आपली चांगलीच बेतेल व आपली नाचक्की होईल म्हणून धावत मनोहरकडे गेला. त्याने त्याला शांत करत सांगितले, एक कागद घे आणि आम्ही सांगतो तसे स्वत:च्या अक्षरात लिहून मुख्याध्यापकांना देऊन ये आणि त्याने तसेच केले. मनोहरने एकेक शब्द, एकेक वाक्य असे काळजीपूर्वक लिहीले की कागद वाचताना मुख्याध्यापक डी. एस्. ला म्हणाले, अरे तू एखाद्या वकीलाकडून लिहून आणले काय? हे वाचून मुख्याध्यापकांनी डी. एस्. ला काही न बोलता त्या मुलीला समजावून सांगितले आणि त्या वात्रट मुलाला बोलावून शिक्षा केली. मुद्देसुद व तर्कशुद्ध बोलणे हा त्याचा सहज स्वभाव होता. ते स्वामीजी झाल्यावर आम्हाला भेटायचे त्यावेळी आश्रमाचा काही विषय निघाला की सांगायचे, त्याचे गुरूमहाराज (प.पू. शक्तिबालक) म्हणायचे, 'अरे सविता, तू कॉलेजमध्ये प्रोफेसर ऐवजी वकिल झाला असता तर किती बरे झाले असते!' त्यांच्या या स्वभावाचा त्यांनी करून घेतलेला उपयोग म्हणजे ज्यावेळी अलिकडची तरूण पिढी विज्ञानाच्या आणि आधुनिकतेच्या नावाखाली ज्यावेळी स्वामीजींसमोर तर्क उभे करतात त्यावेळी स्वामीजी त्यांना तितक्याच तर्कपूर्ण तरी भक्कम विचाराच्या आधारावर उत्तर देत त्यांच्या शंकाचे समाधान करतात, मुद्यांचे खंडण करतात. ते पहाणे, ऐकणे म्हणजे मनोरंजन बरोबर मनोअंजन सुध्दा होतेच होते.

म्हणून म्हणतो स्वामीजींनी जे शिकवलं हेतूत: जे शिकवलं, ते तर आम्ही शिकलोच पण जे शिकवलं

नाही, ते त्यांच्या चरित्र, चारित्र्य, विचार इ. तून यथामती शिकलो. आता देवाने स्मरणशक्तीच्या ऐवजी आम्हाला अभिषेक पात्रे दिली म्हणून किती शिल्लक आणि किती गळाले हा संशोधनाचा विषय आहे.

स्वामीजींनी महाविद्यालयीन शिक्षण स्वत:च्या पायावर घेतलेले वर्षाला दोन पायजमे. सोबतीला अपार कष्ट! अभ्याशी करायला वेळ आणि अर्थसहाय्य होतंच कुणाजवळ! स्वामीजी एस.एस.सी. ची परीक्षा अतिशय उज्ज्वल गुण मिळवून उत्तीर्ण झाले. पुढील शिक्षणासाठी पुण्याला गेले. स्वत: कष्ट केले, शिक्षण पूर्ण केलं..

मी त्यांच्या बालपणीचा मित्र. माझ्यावर अतिशय लोभ. माझी आई अचानकपणे वारली. तेव्हा कळवायला पत्राशिवाय कोणतेच साधन नव्हते. पत्र पोचायला किमान आठ दिवस! पण कसा कुणास ठाऊक तिसऱ्या दिवशी मनोहर हजर झाला. घरात मी मोठा. मला रडायला संधीच नव्हती. लहान भावंडे मला सांभाळायची होती. पण मनोहरने पाठीवर हात ठेवला अन् बांध फुटला. मनसोक्त रडून घेतल अन् सावरलो. दु:खात तसाच सुखात तो प्रत्येक वेळी धावून आला. माझ्या लग्नात, बहिणीच्या लग्नात तो होताच. पत्रिकेची वाट न पाहता हजर होता. हे सगळं आठवलं म्हणजे वाटतं **हे तो स्वर्गीचे देणे** भाग्याने लाभले. जीवनाला धन्य केले. परमेश्वराचे किती आभार मानू? जन्मोजन्मी असाच मित्र देऊन उपकृत कर रे बाबा!

स्वामीजींच्या बालपणीच्या अनेक आठवणी आदरणीय भाऊ पाठक (श्री. भालचंद्र पाठक) यांनी छान सांगितल्या. त्या प्रत्येक प्रसंगात स्वामीजींच्या स्वभावाचे एकेक वेगळे पैलू आपणासमोर आलेतच. उदा. अडचणीत आलेल्या व्यक्तीस निस्वार्थ भावाने मदतीस धावून जाणे. (बुडती हे जन देखवेना..) तर्कबुद्धीने आलेल्या कठीण व गुंतागुंतीच्या प्रसंगात विषयाला कलाटणी देऊन न्याय्य बाजू समजावून देणे. इत्यादी गुणांवर प्रकाशझोत टाकला.त्यात अजून काही ठळकपणे नमूद कराव्याशा वाटणाऱ्या गोष्टी

१) आमच्या बेटावद गावातून व्हर्नाक्युलर फायनल (इ. ७ वी बोर्ड परीक्षा) जी परीक्षा पास झाल्यावर प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळत होती) परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविणारे **– स्वामीजी**

२) S.S.C. बोर्ड परिक्षेत दोन जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आमच्या गावचे पहिलेच विद्यार्थी **– स्वामीजी.**

३) M.Sc. पदवीपर्यंत उच्च शिक्षण घेवून त्यातही प्राविण्य मिळविणारे गावचे पहिलेच विद्यार्थी **– स्वामीजी.**

४) लेखक म्हणून नावारूपाला आलेले आमच्या गावातील पहिले सुपुत्र म्हणजे **– स्वामीजी.**

५) कुळ गोत्र ग्राम नगर निगम ज्ञानपद ज्यांच्या किर्तीमुळे ज्ञात व स्मरणात राहतील असे आमच्या गावचे सुपुत्र म्हणजे **– स्वामीजी.**

६) इतकेच काय तर 'संन्यास' घेणारे देखिल गावातील पहिलेच सुपुत्र म्हणजे **– स्वामीजी.**

आमच्या गावाचा नावलौकीक भारतात नव्हे तर अखिल विश्वात पोहचवणारे परम वंदनीय **स्वामीजीच**.

त्यांच्या चरणी पुन्हा पुन्हा कोटी कोटी दंडवत प्रणिपात.

– सद्गुरूचरणरज नंदकिशोर बाविस्कर.

२. आत्मनिवेदन

– श्रीमती परिमल भारतीय, पुणे

''नमस्कार सरूताई. तू लिहीलेले लेख वाचून डोक सुन्न झालं. काय प्रतिक्रिया द्यावी हे समजत नव्हते. मी फक्त एवढच म्हणेन स्मरणिका आणि दुर्गा सप्तशतीच्या तीनही ग्रंथांच वाचन सर्वांना सक्तीचं करावं; म्हणजे स्वामीजींच थोरपण थोडफार तरी लोकांच्या लक्षात येईल आणि बाहेर धावणं थांबून स्वामीजींवर पूर्ण श्रध्दा ठेवून लोक आपली साधना सुरू करतील. (जसं माझ्या बाबतीत झालयं)''

सरूताईने गुरू शरणम् ग्रुपवर दोन लेख लिहीले होते. त्यामध्ये कोणा एका साधकाच्या वर्तनातून कळत नकळतपणे स्वामीजींचा कसा अनादर झाला हे अत्यंत विषण्ण मनाने तिने सांगितले होते. त्या साधकाने त्याच्या ओळखीच्या एका योगाचार्यांना आणि स्वामीजींना एकाच वेळी आपल्या घरी बोलवले आणि कदाचित त्या योगाचार्याबद्दल त्याच्या मनात अधिक आदर असेल, ते खूप मोठे आहेत असं त्याला वाटलं असेल म्हणून की काय त्याने त्यांचे आसन स्वामीजींपेक्षा उंच केले होते.

खरतर स्वामीजी त्यांच्या कठोर तपस्येने आणि बाबांच्या आशीर्वादाने 'माँ भगवतीच्या मांडीवर' म्हणजे परमोच्च आसनावर जाऊन बसलेले आहेत त्यामुळे लौकिकातल्या उच्च नीचतेची त्यांना थोडीही पर्वा नाही. त्यांना त्याचा काहीच फरक पडत नाही. ते भगवंतांनी वर्णन केलेले 'स्थितप्रज्ञ' आहेत. उच्च-नीच, मान-अपमान, लहान-मोठा या सर्वांच्या ते खूप खूप पलीकडे गेले आहेत, मग ही चर्चा कोणासाठी?

ही चर्चा आहे आपल्या सर्वांसाठी. फरक पडतो तो आपल्याला. कारण आपल्या हातून जाणूनबुजून किंवा अजाणतेपणी जरी असे वर्तन घडले तरी अप्रत्यक्षपणे आपल्या हातून विश्वात भरून राहिलेल्या त्या गुरूतत्वाचा अपमान होतो. आपल्या सर्वांच्या लक्षात आलयं का? स्वामीजी मी नाही तर आम्ही म्हणतात, त्याचं काय कारण असेल? ते त्यातून आपल्याला सुचवतात मी एकटा नाही तर विश्वातला सर्व गुरूतत्त्व ह्या देहाच्या माध्यमातून काम करतयं. आपल्या सर्वांची नव्हे या विश्वाचीच गुरू ती माँ भगवती आहे. जीवावरच्या करूणेपोटी ती विविध नावारूपाने आपल्या आयुष्यात येते; आपल्यावर कृपा करण्यासाठी आणि अशावेळी जर आपल्या हातून असा काही प्रमाद घडला तर देह धारण केलेले आपले गुरू आपल्याला क्षमा करतात पण ती प्रकृती मात्र क्षमा करत नाही ती त्याचा दंड देते असं म्हणतात. परमेश्वराच्या काठीचा आवाज येत नाही; पण तडाखा मात्र बसतो. कारण सृष्टीचा नियमच आहे विस्तवावर पाय पडला तर तो भाजणारच. अग्नी हे बघत नाही पाय चुकून पडला का मुद्दाम. पाय देणारा लहान बालक आहे का मोठा माणूस. तो स्त्री आहे का पुरूष, तो गरीब आहे का श्रीमंत, अग्नीचा धर्म आहे भाजणं तो फक्त आपला धर्म पाळतो.

प्रकृती जेव्हा दंड देते तेव्हा आपलं किती नुकसान झालं हे त्यावेळी आपल्या लक्षात येत नाही. त्या दंडाची शिक्षा म्हणून आपल्या आयुष्यातला किती काळ वाया गेला? कधी कधी तो दोन पाच वर्ष असेल तर

कधी हजारो जन्मही असेल. आपल्या क्रियेवर प्रतिक्रिया अवलंबून राहील त्यातून ठरेल आपण किती दूर फेकले गेलो!

क्षमा करा. आपल्याला काही शिकवायचे म्हणून मी हे लिहीत नाही तर स्वामीजींच्या बाबतीतला प्रकृतीचा तडाखा मी खाल्लेला आहे आणि माझ्या आयुष्यातली पाच सहा वर्ष मी वाया घालवली आहेत. परमेश्वराची आणि गुरूमाऊलींची कृपा म्हणून पाच सहा वर्षावर भागलं नाहीतर आयुष्याची सायंकाळ झालेली मनात आहे? पुन्हा किती जन्मानंतर फिरून भेट झाली असती? हा विचार जरी मनात आला तरी अंगावर काटा येतो. असो –

सरूताईच्या पोस्टला प्रतिक्रिया लिहीताना शेवटी मी 'जसं माझ्या बाबतीत झालयं' असं लिहीलय तर आता मी तुम्हाला माझ्या बाबतीत काय घडलं हे थोडक्यात सांगणार आहे.

आमच्या ऑफिसमध्ये पानसे नावाची एक टायपिस्ट होती. तिचा नवरा प्रसाद प्रकाशनच्या ऑफिसमध्ये काम करत होता. ती माझी चांगली मैत्रिण होती. मला आध्यात्माची आवड आहे हे माहित असल्यामुळे तिने मला एक दिवस स्वामीजींचा 'गुरूर्ब्रह्मा' ग्रंथ वाचायला दिला. मी तो एक-दोन दिवसात वाचून संपवला आणि खूप भारावून गेले. विशेषत: गुरू-ब्रह्मा, विष्णू आणि महेश या भूमिका शिष्याच्या आयुष्यात केव्हा आणि कशा पार पाडतात आणि ते साक्षात् परब्रह्म कसे असतात हे वाचून मला काही सुचेना. लहानपणापासून म्हणत असलेल्या या श्लोकाचा एवढा गहन अर्थ सांगणारे नक्कीच खूप महान असले पाहिजेत हे जाणवलं. बरं त्यांच्या लेखनातून हे जाणवत होतं की ही पोपटपंची नाही तर स्वानुभव आहे **'आधी केले मग सांगितले'** याची प्रचिती त्यात होती.

मी अगदी लहानपणापासून देवाच्या शोधात फिरत होते. त्यामुळे साधू, संन्यासी, महाराज, प्रवचनकार, किर्तनकार या सर्वांबद्दल माझ्या मनात नेहमीच आदर होता. आयुष्यात मी अनेकांना भेटले, त्यांच्या सहवासात राहिले, त्यांची किर्तनं, प्रवचनं ऐकली. विवेकानंदांचे जवळ जवळ सर्व साहित्य तसेच आध्यात्मातली बरीच ग्रंथ संपदा चाळली होती. ज्या अनेक लोकांना भेटले त्यांच्या भेटीतून काही दिवसांनतर माझ्या लक्षात यायचं मला जे हवं आहे ते इथं नाही. माझ्या 'मी कोण?' प्रश्नाचं उत्तर इथे मला मिळणार नाही म्हणून मी पुढे जायची त्या प्रवासात उपासनी बाबांसारखे काही संत भेटले. ह्या सर्वांनी माझ्यावर खूप प्रेम केलं. काहींनी फुकट कष्ट करून घेतले. जगात सर्व प्रकारची माणसं आहेत. आपले ऋणानुबंध आपण फेडले जे घडलं ते 'ईश्वरकरणी कल्याणकारिणी' म्हणून स्वीकारलं आणि पुढे चालत राहिले पण माझा प्रवास संपत नव्हता.

मात्र गुरूर्ब्रह्मा वाचल्यानंतर मला वाटलं मला जे हवं आहे ते देणारे उपासनी बाबांनी सांगितलेले हेच माझे सद्‌गुरू आहेत. त्यामुळे मला चैन पडेना. मी प्रसाद प्रकाशनमधून त्यांचे इतर ग्रंथ आणि आश्रमाचा फोन नंबर आणला तेव्हा आश्रमावर लँडलाईन नंबर होता. मला लवकरात लवकर त्यांना भेटायचे होते. त्यापूर्वी मी डॉ. काळेंकडे जात होते तिथे माझी अर्जुन बरोबर ओळख झाली होती. त्याच्याकडे गाडी होती आणि तो ही

आश्रमावर यायला तयार झाला.

मी आश्रमावर फोन केला. माझी अपेक्षा कोणीतरी सेवेकरी फोन उचलतील आणि भेटीची काही वेळ देतील पण इथे तर फोन स्वामीजींनीच उचलला. मी म्हटलं मला स्वामी सवितानंदांशी बोलायचं आहे. समोरून उत्तर आलं हो आम्हीच बोलतोय बोला. क्षणभर काय बोलावं सुचेना मग पटकन मी नमस्कार नमस्कार म्हणून मला आपल्याला भेटायचयं तर मी आश्रमावर कधी येऊ शकते? असं विचारलं तर उत्तर आलं 'आमचा आश्रम म्हणजे दोन खोल्या आहेत इथे तुम्ही समजता तशी कोणतीही सोय होणार नाही. परंतु पुन्हा पुन्हा विनंती करून मी परवानगी काढली. आमच्या भेटीच्या तारखेपूर्वी ते मुलुंडला स्वातीताईंकडे येणार होते. मी अर्जुनजवळ माझे साधनेतले काही प्रश्न लिहून दिले. तो त्यांना भेटायला गेला तेव्हा त्याच्या हातातला तो कागद घेऊन त्यांनी ते प्रश्न वाचले आणि म्हणाले, 'आम्हाला या सर्व प्रश्नांची उत्तरे माहित आहेत पण आम्ही ती आत्ता सांगणार नाही'. आज दहा अकरा वर्षांनंतर दुर्गा सप्तशतीवरील तीन ग्रंथ वाचताना त्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरं मला मिळाली. म्हणून मी सरूताईला लिहीलं होतं ह्या तीन ग्रंथांचं वाचन दिक्षित साधकांनी सक्तीचं करावं अर्थात् हे मला वाटतं.

पुढे मी व अर्जुन आश्रमावर आलो, स्वामीजींची भेट झाली. नंतर मधून मधून आश्रमावर येणं सुरू झालं. मी नवरात्रात यायला लागले. नंतर ताई आजारी होत्या तेव्हा त्यांच्या सेवेला थोडे दिवस येऊन राहिले या काळात स्वामीजी पुण्यात आले की मधून मधून कधीतरी माझ्याही घरी यायचे. सकाळी उठून पाठ करायचे. माझं एक मजली घर होतं. मुलाने स्वत:ची कंपनी सुरू केली. त्याच्यासाठी वरचा आणखी एक मजला बांधायचं ठरलं. स्वामीजींना सांगितलं त्यांनी नको नको म्हणत असताना घरासाठी पैसे बँकेत जमा केले. भगवतीच्या त्या कृपेमुळे एकाच्या ऐवजी दोन मजले बांधून झाले, काम पूर्ण झालं तेव्हा माझ्या अंगावर फक्त पंधरा वीस हजारांचं कर्ज होतं तेही भावाकडून हात उसने घेतलेले.

एकदा मी अर्जुनला म्हटलं आपण स्वामीजींबरोबर तीर्थयात्रा करू या का? डिसेंबर महिन्यात त्याच्या ऑफिसचं काम कमी असायचं म्हणून डिसेंबरमध्ये २-३ दिवसाची अष्टविनायक यात्रा करायचे ठरले परंतु अर्जुनला अचानक कंपनीच्या कामासाठी परदेशात जावे लागले. स्वामीजींचे सगळे कार्यक्रम आधीच ठरलेले असतात ते अत्यंत वक्तशीर आहेत. अर्जुन म्हणाला तुम्ही जाऊन या. आमच्याच घरासमोर एक गाडीवाला रहात होता त्याची इनोव्हा गाडी ठरली. पण त्या दिवशी सकाळी त्याने तवेरा गाडी पाठवली. मोठी गाडी म्हणून आम्ही सात माणसं निघालो. त्याच्या गाडीला वर कॅरिअर पण नव्हते. त्या यात्रेत स्वामीजींना खूपच त्रास झाला आजही मनामध्ये ती दु:खदायक आठवण म्हणून राहिली आहे. याच यात्रेत स्वामीजींच्या कृपेने आम्ही मोठ्या अपघातातून वाचलो. पाच मिनिटे आधी स्वामीजींनी सरूताईला भवानी अष्टक म्हणायला सांगितले आणि ड्रायव्हरच्या कानात कोणीतरी आवाज देऊन त्याला त्या लेन मधून गाडी बाहेर काढायला सांगितली. स्तोत्रमंत्राचे विज्ञान व संतु निरामयाः नवीन आवृत्तीत माझा हा अनुभव मी सविस्तर सांगितला आहे.

अष्टविनायक यात्रेची सुरवात आम्ही मोरगावहून केली. या यात्रेतील एक महत्वाचा प्रसंग म्हणजे

मोरगावचे धारक गुरूजी मंदिराचे पुजारी आहेत. स्वामीजी आहेत म्हणून ते ही आमच्याबरोबर यात्रेला येणार होते. गुरूजींचे साधन चांगले आहे. मोरया त्यांच्याशी बोलतो. तो आठवडा त्यांचा पूजेचा नव्हता म्हणून त्यांनी बाहेरच आमचा सर्वांचा संकल्प सोडला आणि आम्ही सर्वांनी बाहेरूनच नमस्कार करून मागे फिरलो. गुरूजी आतमध्ये मोरयाच्या दर्शनाला गेले. तर मोरया त्यांना म्हणतो, ''अरे त्या सवितानंदांना माझ्या दारातून तू तसचं पाठवणार आहेस का? जा त्यांचा सत्कार कर. माझं वस्त्र त्यंच्या अंगावर घाल आणि हा माझा प्रसाद त्यांना दे'' ते ऐकून गुरूजी एकदम चपापले. त्यांनी धावतच येऊन स्वामीजींची क्षमा मागितली. मोरयाचा निरोप सांगितला. मोरयाचं वस्त्र आणि प्रसाद देऊन त्यांचा सत्कार करून साष्टांग नमस्कार केला.

दुसरा असाच प्रसंग म्हणजे लेण्याद्रीचा. ओझरला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही लेण्याद्री चढलो आणि तिथेही आम्हाला हाच अनुभव आला. बाप्पाला नमस्कार करून आम्ही परत फिरलो तर तिथलाही पुजारी गिरीजात्मकाचा निरोप घेऊन धावत आला. त्यानेही स्वामीजींना बाप्पाचे वस्त्र, हार, प्रसाद देऊन साष्टांग नमस्कार केला. शक्तीबालक स्वामी माँ गिरीजाचे 'दुलारे' आणि स्वामीजी शक्तीबालकांचे दुलारे त्यामुळे लेण्याद्रीच्या गिरीजात्मकाला आपल्या या लाडक्या बाळाचे कौतुक केल्याशिवाय कसे बरे रहावेल?

मी या दोन्ही प्रसंगांची प्रत्यक्षदर्शी असून देखील त्यावेळी चिक्षुर चामरांचा प्रभाव माझ्यावर असल्यामुळे माझ्या डोळ्यावर जणू त्या आवरणाची पट्टी बांधली होती. संपूर्ण शरणशगी नसल्यामुळे 'महामाया प्रभावेण' मला त्यावेळी स्वामीजींच मोठेपण अजिबात लक्षात आलं नाही. आता मात्र त्या सगळ्याचा खूप पश्चाताप होतो आहे. वारंवार श्री चरणांची क्षमा मागणं आणि पश्चातापाचे अश्रू ढाळणं एवढचं फक्त आता माझ्या हातात आहे.

स्वामीजींच्या महतीचे असे अनेक अनुभव येत होते त्यामुळे त्या काळात स्वामीजींबद्दल पूर्ण आदर होता तरीही संपूर्ण शरणागती मात्र येत नव्हती. उपासनीबाबांनी मला भागवतकथा सांगायची आज्ञा केल्यामुळे घरोघरी जाऊन मी भागवत कथा करत होते. कथा करताना काही अर्थ आतून कळत होते. आधीच्या वाचनामुळे कथा छान सांगितल्या जायच्या. त्यातून वित्तैषणा नसली तरी लोकैषणा वाढीस लागली होती. कुठेतरी आपण वेगळे आहोत ही भावना निर्माण झाली होती. डॉ. काळेंकडे लेखनाचे काम करत होते त्यातूनही अहंकार दुणावला होता. आश्रमावर येत होते, सेवा घडत होती परंतु संपूर्ण शरणागती होत नव्हती म्हणूनच की काय खरा प्रवासही सुरू होत नव्हता. स्वामीजी पहात होते त्यांना करूणा येत होती पण माझ्यातला महिषासुर पुन्हा पुन्हा आपले हात पाय पसरत होता.

२००६ साली उपासनी बाबांनी मला सांगितले होते मी तुझा सद्गुरू नाही तुझे सद्गुरू तुला याच जन्मात भेटतील. त्यांच्या भेटीसाठी आणि कृपाप्राप्तीसाठी दर चतुर्दशीला तू दुर्गासप्तशतीचा पाठ कर. मला त्यावेळी ग्रंथ वाचता येत नव्हता. पुढे संथा घेऊन २००७ पासून मी नियमित पाठाला सुरवात केली. त्याची फलश्रुती म्हणूनच की काय २०११ साली स्वामीजींची भेट झाली. मी त्यांना दीक्षेबद्दल विचारलं होतं परंतु

भगवतीची परवानगी मिळाली की देऊ असं त्यांनी सांगितलं. मी भगवतीच्या परवानगीची प्रतीक्षा करू लागले. तेव्हा विचार यायचा भगवती का बरं परवानगी देत नसेल? पण आता ह्या तिन्ही ग्रंथांच्या वाचनानंतर कळलं त्यावेळी माझ्या देहाची स्थिती दीक्षा होण्यास योग्य नव्हती. माझ्या देहात महिषासूर निवांतपणे पहुडला होता. संपूर्ण शरणागती होत नव्हती. चुकते कोठे? ग्रंथात स्वामीजींनी एक गोष्ट सांगितली आहे – चार मित्र किल्ल्यावर चढायला निघतात. त्यावेळी दोन मित्र आधी वर जातात, वर गेल्यावर त्यांच्या लक्षात येतं आपला कॅमेरा खालीच विसरला आहे. दुसरे दोघं अजून खालीच आहेत म्हणून त्यातला एकजण ओरडून त्यांना सांगतो. पण आवाज जात नाही. तर दुसरा त्याला म्हणतो काय बुद्धु आहेस रे तुझ्याकडे दुर्बिण आहे ती डोळ्याला लाव म्हणजे ते दोघं समोर दिसतील. मग ओरडून सांगायची गरज नाही असाच काहीसा भ्रम मला झाला होता म्हणा ना! मला अनेक साधू संत भेटले आहेत मी खूप वाचन पारायणं केली आहेत. मला माहिती आहे. हा भ्रम डोक्यात असल्यामुळे पाणी गढूळ झालं होतं ते निर्मळ झाल्याशिवाय शुद्ध चैतन्याचं प्रतिबिंब त्या चित्राच्या दर्पणात पडणार नव्हतं. ते पाणी निवळायला आठ–दहा वर्ष जावी लागली.

आपल्याला माहितच असेल स्वामीजींची दीक्षा म्हणजे इतर गुरूंसारखी फक्त नाम देणं आणि जप करायला सांगणं असं नाही. त्यांना फक्त त्यांचा शिष्य परिवार वाढवायचा नाही तर दीक्षा दिलेल्या प्रत्येक साधकाला मुक्त करायचं आहे. साधकाच्या देहातच शेवटचा राक्षस शुंभ म्हणजेच 'सूक्ष्म मी' स्वत:च्या वेगळ्या अस्तित्वाची धडपड त्याचाही वध करून साधकाला त्या परमचैतन्याशी एकरूप करून द्यायचं आहे. जेव्हा दीक्षा होते तेव्हा समर्थ सद्गुरूच्या अशा चिदानंद स्वरूपाच्या कारण देहाचा शिष्याच्या विज्ञानमय कोषात प्रवेश होतो. (संदर्भ : गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू ग्रंथ) कारण शिष्याच्या देहातल्या जन्मोजन्मीच्या ब्रह्म ग्रंथी, विष्णू ग्रंथी आणि रुद्र ग्रंथीचा भंग करून परब्रह्मापर्यंत जाण्याचा साधकाचा मार्ग मोकळा करावा लागतो. तेव्हाच जीवाची शिवाशी खऱ्या अर्थी भेट होते. त्यासाठी आपली गुरू माऊली आपणच जमवलेल्या राक्षसांबरोबर अहोरात्र युध्द करत असते. स्वामीजी आपल्यासाठी अखंड, अव्याहतपणे सूक्ष्म स्तरावर हे कष्ट घेत असतात. अशावेळी आपली जबाबदारी रहाते त्या माऊलीला मदत करता आली नाही तर कमीत कमी त्रास तरी न देण्याची. आपल्याला प्रश्न पडला असेल मदत काय करायची? तर कोणत्याही आईला काय आवडतं? आपली मूलं शिकून सवरून मोठी व्हावीत. इथे आपण काय करायचं? त्यांनी दिलेली साधना नेटाने करायची. त्यांनी खूप तपश्चर्या करून मिळवलेल आयतं ताट आपल्याला वाढलय. त्यांनी त्यांच्या गुरूंना जी संपूर्ण शरणागती दिली होती बस्स त्यांना तेच हवं आहे. बाकी आपल्या पैशा–अडक्याची त्यांना अपेक्षा नाही. ते निर्मोही निरपेक्ष आहेत. ते त्यांच्या आनंदात मस्त आहेत. ते जीवनमुक्त आहेत आणि सहजावस्थेत जगतात. आपला भ्रम होतो ते आपल्यासारखेच आहेत. प्रत्यक्षात तसं नाही, ते आपल्याला समजण्यासाठी ज्यामध्ये हे सर्व रहस्य त्यांनी उलगडलय विश्वाच्या सर्वोच्च खजिन्याची किल्ली असलेले ते तीन ग्रंथ आपण अभ्यासले पाहिजेत असो –

तर काय सांगत होते स्वामीजींच्या भेटीपासून दीक्षा व्हायला दहा–बारा वर्षांचा काळ गेला आणि त्यातही ताईंच्या (साध्वी दयामयी) निधनानंतर पाच सहा वर्ष तर भगवतीने मला आश्रमापासूनही दूर ठेवलं.

त्याकाळात माझ्या हातून कळत नकळत अनेक चुका घडल्या त्यातल्या या तीन घोडचूकाच म्हणा ना.

स्वामीजींनी मला त्यांच्या एका ग्रंथाचे प्रूफ रिडींग करायला दिले होते. खरे तर स्वामीजींचे लेखन हे माँ भगवतीकडून आलेले शब्द असतात. (अर्थात हे आता समजतयं) त्या लेखनात चैतन्य असतं परंतु त्यावेळी प्रुफ रिडींग करताना (जणू काही मला खूप कळतं असं समजून) मी त्यांची वाक्य रचनाच बदलली जाईल असे बदल करून दिले. अर्थातच स्वामीजींना माझे बदल मान्य झाले नाहीत. त्यांनी जसे भगवतीने सुचवले होते तसेच लिहायला सांगितले. एकदा सरु स्वामीजींच्या श्री गुरुलिलामृत पद्याचा हिंदी ओवीबद्ध अनुवाद करीत होती. त्यात मी अधिक्षेप करुन सूचना करीत होते. स्वामीजींना चातुर्मासात स्फुरलेली प्रासादिकवाणी श्री गुरुलीलामृताच्या मूळ पद्यावर ती भाष्य करते आहे हे कळण्या इतकी अक्कल नव्हती. तो मूर्खपणा आता कळतो.

आणखी एक मोठी चूक माझ्या हातून घडली होती. एकदा नवरात्रीत सरूला अडचण आली होती तेव्हा स्वामीजींनी मला आश्रमावर यायला सांगितले. त्यांचा फोन आला. त्या फोनमध्येच मी म्हटलं हो येते की. पण पुढचच वाक्य माझ्या तोंडून गेलं की, पण स्वामीजी या नवरात्रात मला दीक्षा देणार ना? म्हणजे इथे एकप्रकारे सौदेबाजी होते आहे हे माझ्या लक्षात सुध्दा आले नाही. तुम्ही मला दीक्षा देणार असाल तर मी सेवा देईन. हा व्यापार झाला, देवाण घेवाण झाली. कळत नकळत आपण अशा काही गोष्टी करतो की ओठापर्यंत गेलेला पेला पोटात जात नाही कारण त्या नवरात्रात स्वामीजी मला दीक्षा देणार होते पण माझ्या त्या वाक्याने त्यांचं मन दुखावलं गेलं आणि दीक्षा देण्याचा त्यांचा मानस बदलला.

एक मागून एक चुका घडतच होत्या. त्या माझ्या लक्षातही येत नव्हत्या. आता त्या सगळ्याचा खूप पश्चाताप होतो आहे. पण मध्यम चरित्रात स्वामीजींनी वर्णन केलेले हा कबंध राक्षस. ते साधनेत फार घातक नसतात पण विलंब करतात. परमेश्वराकडे जाण्यासाठीचा आपल्या आयुष्यातला बहुमूल्य वेळ ते खातात. त्यांनी माझ्या आयुष्यातली पाच सहा वर्ष खाल्ली असो.

आणखीही काही घटना घडल्या मी आज तुम्हाला मला आठवतयं ते सर्व काही सांगणार आहे. त्याचे दोन फायदे होतील भविष्यात आपल्या कोणाच्या हातून अशा काही चुका घडणार नाहीत तसेच स्वामीजींच्या बाबतीत आपण ज्या चुका करतो त्या फक्त चुका नसतात तर पाप असते असे मला वाटते, म्हणून हे लिहिले. यासंदर्भात आणखीन एक महत्वाची गोष्ट स्वामीजींनी लिहिलेल्या **रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग** यात पृष्ठ २६३ वर स्वामीजींनी महिषासुराने देवीचे वाहन सिंहावर आक्रमण केल्याने देवी क्रुध्द झाली यावर केलेले भाष्य प्रत्येक साधकाने पुन्हा पुन्हा वाचावे. आपले आध्यात्मिक नुकसान होऊ नये यासाठी स्वामीजी अनेकदा सांगतात व्यवहारात चुकांची माफी/क्षमा होऊ शकेल. आपल्या साधनेत माफी हा शब्दच नाही. दंड/सजा/परीणाम भोगणे एवढेच आहे आणि सगळ्यात मोठी सजा काय तर भगवतीच्या चरणी जाण्यास विलंब! गुरूचरित्रात सांगितल्याप्रमाणे आपले पाप सभास्थानी सांगावं म्हणजे त्यापासून लवकर मुक्ती मिळते. आता मला गुरू माँ नी दिलेले अमृत भरून घेण्यासाठी माझा घडा रिकामा करायचा आहे.

त्याचं असं झालं – २०१६ साली स्वामीजींच्या कृपेने मला ऑफिसचे कधीही न मिळणारे पैसे मिळाले तेव्हा एका साधकाच्या अडचणीला मदत करण्यासाठी स्वामीजींनी त्यातले काही पैसे मला मागितले. त्या पैशांची संपूर्ण जबाबदारी त्यांनी घेतली होती शिवाय बँकेच्या दराप्रमाणे व्याजही ते मला देणार होते, परंतु त्यावेळी घरात पैसे येण्याचं दुसरं काही साधन नाही आणि स्वामीजींकडून व्याज कसं घ्यावं ह्या द्विधा मनस्थितीत अडकल्यामुळे नव्हे सप्तशतीतला परिवारीत राक्षस इथे आडवा आल्यामुळे मी स्वामीजींना काहीच उत्तर दिले नाही. बरेच वेळा आपण स्पष्ट बोलत नाही त्यातून आपणच आपला दुरावा निर्माण करतो. स्वामीजींकडून व्याज न घेताही माझ्या परिवाराची काळजी स्वामीजी, माँ भगवती घेईल हा दृढ विश्वास नसल्यामुळे या आणि अशा अनेक चुका मी करत गेले. मधल्या काळात इकडे तिकडे भटकत होते. शांती नव्हती. आयुष्याची संध्याकाळ झाली होती, साठी उलटून गेली होती. आपल्याला जोवर आत्मानुभवाची प्राप्ती होत नाही तोवर कोरडं ब्रह्मज्ञान लोकांना सांगायचं नाही म्हणून मी भागवतकथा करणं, लेखन करणं सगळं सोडलं होतं. दर चतुर्दशीला पाठ करत होते. पाठाला बसण्यापूर्वी स्वामीजींना फोन करत होते पंधरा दिवसांनी एकदा. मनात अपराधाची भावना होती. स्वामीजी अत्यंत प्रेमाने शुभेच्छा आणि आशिर्वाद देत होते. अडसर माझ्याकडूनच होता. समोर तर अखंड वाहणारा शुद्ध निर्मळ प्रेमाचा झरा होता. स्वामीजींचा अमृत महोत्सव साजरा झाला. मला जाता आले नाही. जीवाची खूप घालमेल झाली. यु ट्युबवर घरात बसून सगळा कार्यक्रम पाहिला आणि एक दिवस उदयभाऊना फोन केला.

आजच्या माझ्या आनंदी दिवसांचे सर्व श्रेय उदयभाऊंनाच जातं. त्यांनी मला त्या दिवशी खूप छान मार्गदर्शन केलं. खरतर त्यांना फोन करायला मला खूपच उशीर झाला होता. स्वामीजींना फोन करण्याची हिम्मत होत नव्हती म्हणून उदयभाऊंना फोन केला. मी त्यांना जे जे सांगायला लागले तर ते म्हणत होते हो मला माहित आहे पुढे बोल. त्यांनी त्या फोनमध्ये मला माझ्या बऱ्याच चुका सांगितल्या मी विचारलं आता काय करू? ते म्हणाले काही नाही स्वामीजींना कबुली द्या. क्षमा मागा. पुन्हा चुका होणार नाहीत याची काळजी घ्या. संपूर्ण शरणागती स्वीकारा. गुरूपौर्णिमेला बहुतेक अर्जुन जातोय बघा त्याला विचारून जा त्यांच्याबरोबर, माझ्या या प्रवासात अर्जुनचाही खूप मोलाचा वाटा आहे. उदयभाऊंच्या सल्ल्याप्रमाणे २०२१ च्या गुरूपौर्णिमेला आश्रमावर गेले. आधी स्वामीजींची परवानगी घेतली. त्यांनी अत्यंत प्रेमाने ती दिली. आश्रमावर गेल्यावर अत्यंत प्रेमाने आणि श्रद्धेने स्वामीजींना एक पत्र लिहीले. पत्र लिहिताना मी अखंड रडत होते. त्या अश्रूंचा अभिषेक माँ च्या चरणी झाला. माझी सर्व पापे धुवून निघाली आणि स्वामीजींनी कृपा केली. चतुर्दशीच्या पाठाचं फलित म्हणून की काय अनंत चतुर्दशीलाच दीक्षा मिळाली. दीक्षा झाल्यापासून आजपर्यंत स्वामीजींच्या कृपेने अखंड अनुसंधान आहे. साधनेत प्रगती आहे. ते तीन ग्रंथही मी आत्ताच वाचले. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरं त्यात मिळाली. स्वामीजींच्या कृपेने साधनेत प्रगती होत आहे. स्वामीजी सतत माझ्याबरोबर आहेत आणि वेळोवेळी मार्गदर्शन करताहेत असं जाणवतं. त्यांच्या कृपेने आयुष्याचं सोनं झालं.

मला क्षमा करा आपल्याला वाटेल ही स्वत:चेच पुराण का सांगते आहे. अजून हिची पुराण सांगण्याची

सवय गेलेली दिसत नाही. तर तसं नाही – मी काय काय चुका केल्या त्यातून माझं कसं नुकसान झालं परमेश्वराच्या आणि गुरूमाऊलींच्या कृपेने याच जन्मात त्या चुकांचे प्रायश्चित मिळालं पण तसं मिळालं नसतं तर? *पुनरपि जननं। पुनरपि मरणं।।* आणि मध्ये किती मोठा काळ गेला असता माहित नाही. म्हणून मी आपल्या सर्वांना हात जोडून विनंती करते – आता सगळं बाजूला ठेवा. स्वामीजींसारखे साक्षात् परब्रह्म परमात्म स्वरूप समर्थ सद्‌गुरू आपल्याला लाभले आहेत त्यांना दूर करू नका. दुर्गा सप्तशतीचे तीनही ग्रंथ वाचले की समजतं आपले सद्‌गुरू काय काय आटापिटा करून आपली ह्या जन्म मरणाच्या चक्रातून सुटका करतात सगळं युध्द तेच करणार आहेत. आपण फक्त आईचा पदर सोडायचा नाही. एका ठिकाणी स्वामीजींनी एका लोभी माणसाचं उदाहरण दिलं आहे. त्याला बिन खर्चाची साधना हवी होती. त्या माणसाला स्वामीजींनी सांगितलं रोज जेवण करताना तोंडातला घास संपेपर्यंत ताटातून दुसरा घास हातात घ्यायचा नाही. बस एवढाच नियम कर. पुढे स्वामीजी लिहीतात आम्ही तसं करतो; कारण हातात घास घेऊन ठेवणं हाही एक सूक्ष्म लोभ आहे. एका घासाचा लोभ न धरणारे स्वामीजी त्यांना आपण काय देणार? ते घ्यायला नाही तर द्यायला बसले आहेत. माँ भगवतीच कार्य ते करताहेत. तिच्या वाट चुकलेल्या लेकरांना वाट दाखवण्याचं. गंगा वाहते आहे आपण आपला कटोरा गळका, तुटका, मोडका, फाटका नाही ना एवढच बघायचयं.

महिषासूराच्या कथेत उल्लेख येतो महिषासूर वारंवार रूपं बदलतो. तो जेव्हा सिंह होतो तेव्हा साधकाला वाटतं मी माँ चा सिंह झालो, पण तो भ्रम साधकाला पुन्हा खाली खेचतो. तसेच महिषासूर खूराने माती उकरतो म्हणजे आपल्या पूर्व संचितातली सुप्त बीजं उकरून काढतो असा एखादा पूर्व संचितातला संस्कार आपल्याला पतनाच्या दरीत दूरवर फेकून देऊ शकतो. त्यात स्वामीजींनी प्रत्यक्ष घडलेल्या सत्य घटना सांगितल्या आहेत. ते वाचून मी रात्रभर एक मिनिटही झोपू शकले नाही. किती आणि काय काय लिहू? ह्या सगळ्यापासून वाचण्यासाठी एकमेव मार्ग आहे. आपल्या भाग्याने आपल्याला लाभलेल्या गुरू माँ ना संपूर्ण शरण जाणं. आपण बाकी कांही करायचं नाही फक्त सतत जागता पहारा ठेवून मनाला भटकू द्यायच नाही, त्याचं बाहेर पळणं थांबवायचं. दुसरे कितीही मोठे असले तरी आपल्यासाठी आपल्या सद्‌गुरूंपेक्षा कोणी मोठं नाही. अगदी प्रत्यक्ष माँ समोर आली तरी 'गुरू गोविंद दोऊ खडे' या उक्तीनुसार ज्यांनी गोविंद मला दाखवला तो गुरू माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ. मी कुठेतरी वाचलं होतं आपण आपल्या साधनेचा आपल्या मंत्राचा किती ध्यास घ्यायचा तर एखादी पतिव्रता स्त्री जशी ध्यानी मनी स्वप्नी आपल्या पतीचेच स्मरण करते किंवा एखादा अत्यंत लोभी माणूस जसा अहोरात्र धनाचं स्मरण करतो तसं आपलं नाम आपण स्मरावं.

आज होळी पौर्णिमा आहे. आजच्या ह्या मंगल दिनी आपण सर्वांनी आपल्या गुरू माँ च्या चरणी एवढीच प्रार्थना करू या –

''हे माँ आमच्याबरोबर जन्मोजन्मी राहणाऱ्या ह्या सर्व राक्षसांची होळी पेटवं आणि तुझ्या श्रीरंगात आम्हाला भिजवून टाक. तुझ्या प्रेमाची अखंड प्राप्ती आम्हाला व्हावी. तुझ्या या जीवाशिवाच्या खेळाचे, निखळ नि:स्वार्थी आनंदाचे आम्ही सर्वजण वाटेकरी होवोत. त्यासाठी लागणारी पात्रता आणि सद्‌बुद्धी आम्हाला दे. माँ

तूच हे सर्व सांभाळते आहेस याची आम्हाला सदैव जाणीव राहू दे. यापुढे हा देह सुटेपर्यंत आमच्या हातून कोणताही प्रमाद न घडो. हा प्रवास, प्रवासाची वाट आणि गंतव्य स्थान याबद्दल आम्हाला काहीच माहित नाही परंतु त्या प्रवासातली तुझी साथ जी अत्यंत महत्वाची आहे ती अखंड राहू दे. ह्या प्रवासात 'तू' आमचा हात धर म्हणजे तो सुटणार नाही. पायाच्या नखापासून डोक्याच्या केसांपर्यंत अखंड शरणागती आमच्या रोमारोमात भिनू दे. साधना न करण्यासाठी आमच्याकडे हजार कारणं आहेत ती सर्व दूर करून तुझ्यावरची दृढ श्रध्दा अढळ राहू दे.''

'हे माँ तू आमचं सर्वस्व आहेस तुला आमचे कोटी कोटी प्रणाम'

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

हरी:ओम.....! नर्मदे हर....! स्वामीजी सादर चरण स्पर्श....! सविता अर्घ्य ही आपले अमृतमयी व आत्मतृप्त जीवन दर्शन घडविणारी अतिशय सुंदर स्मरणिका आज दुपारी प्राप्त झाली. तिचे दृश्य स्वरूप बघितल्यानंतर अंतरंग बघण्यापासून स्वतःला थांबवू शकलो नाही. अतिशय नीटनेटकी, सुंदर मुद्रण, अप्रतिम आरेखन, उत्तम बांधणी, सहज व सोज्वळ रंग संगती हे सारे सहजच ध्यानी आले. सर्व प्रथम आपला व परमपूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या व्याख्यानाधारित दोन्ही लेख वाचले. केवळ अप्रतिम.....! चंदनाचे हात पायहि चंदन। परिसा नाही हीन कोणी अंग ।। या तुकारामोक्ती चा आशय उलगडला. अधिक काय वर्णन करावे...? अंतरंग वाचल्यानंतर पुन्हा आपल्या चरणी भाव प्रकट करीनच....तुर्तास या अमृत वर्षावास कारणीभूत व सहाय्यभूत झालेल्या सर्वांचे, त्यांनी गुरुसेवा व्रतांतर्गत केलेल्या समर्पणास्तव अभिनंदन व विनम्र अभिवादन......! पुनश्च एकदा आपल्या श्री. चरणी श्रद्धानत दंडवत प्रणाम....! अशीच कृपा दृष्टी कायम असावी हे विज्ञापना...... कृपा प्रार्थी,

– राष्ट्रीय कीर्तनकार, भागवताचार्य, ह.भ.प. योगेश्वर उपासनी महाराज, अंमळनेर

प. पूज्य. स्वामीजींच्या चरणी प्रणाम, काल स्मरणिका तसेच धून (मशीन) मिळाले. अजून लावली नाही. आज लावते. आधी स्मरणिका हातात घेतल्यावर सोडवत नव्हती. खूपच सुंदर झाली आहे खूप खूप कृतज्ञता. स्वामीजी, ही स्मरणिका म्हणजे अनमोल असा ठेवा आहे. पुन्हा एकदा साष्टांग नमस्कार आणि कृतज्ञता

– जया भिडे, पुणे

३. अपरिचित स्वामीजी

– डॉ. कपिल दिलीप चांद्रायण, नागपूर

शीर्षक वाचून आपल्याला प्रश्न पडेल की हे काय? स्वामीजी तर आम्हाला परिचित किंबहुना सूपरिचित आहेत, तर मग हे शीर्षक का? याचे उत्तर जाणण्याकरिता आपल्याला स्वतःला एक प्रश्न विचारावा लागेल, तो प्रश्न म्हणजे, आपण खरंच स्वामीजींना ओळखतो का? वर वर विचार केला तर या प्रश्नाचे उत्तर साधे सरळ होय असे आहे. परंतु आपण जर अंतर्मुख होऊन विचार केला तर या दिशेने आपण अधिक गहन चिंतन करण्यास भाग पडतो. या प्रश्नावर चिंतन करीत असताना मनात आलेले काही विचार व आठवणीतले काही प्रसंग आपणा सर्वांसमोर ठेवीत आहे. कदाचित आपल्याही चिंतनात त्याने मदत होईल म्हणून हा लेखन प्रपंच!

स्वामीजींना आपण खरंच ओळखतो का? या प्रश्नावर चिंतन करत असताना प्रथम आठवतो तो रामचरितमानस मधील अरण्य कांडातील सुतीक्ष्ण मुनी आणि श्रीरामाचा संवाद. सुतीक्ष्ण मुनी अत्यंत व्याकुळतेने श्रीरामाची वाट बघत असतात आणि जेव्हा श्रीरामाचे प्रत्यक्ष दर्शन होतात तेव्हा मुनी म्हणतात:

कह मुनी प्रभू सुनु बिनती मोरी। अस्तुती करौ कवन बिधि तोरी।।
महिमा अमित मोरी मती थोरि। रबि सन्मुख खद्योत ज्योतअंजोरी।।

हे प्रभू, माझी विनवणी ऐका. मी आपली स्तुती कशा प्रकारे करू? आपला महिमा अपरंपार आहे आणि माझी बुद्धी अल्प आहे. ज्याप्रमाणे सुर्यापुढे काजव्याचा प्रकाश नगण्य आहे, त्याच प्रकारे माझी बुद्धी आपल्या महिम्या पुढे नगण्य आहे. स्वामीजींच्या बाबतीत लिहितांना माझी पण हीच स्थिती होते आहे, तरीदेखील हा अल्पसा प्रयत्न.

स्वामीजींना आपण बहुतेक वेळा एक संत, एक तपस्वी या अंगाने पाहतो. अनेकांचे ते गुरु आहेत. गुरुपदावर आरूढ असून देखील त्यांचा बालसुलभ स्वभाव कायम आहे, त्यांची मातृवत्सलता सतत पाझरत आहे आणि कदाचित म्हणूनच प्रमादवश किंवा प्रेमवश कधी कधी आपली स्थिती कुरुक्षेत्रावरील अर्जुना सारखी होते. श्रीमद् भगवद गीतेत अर्जुन ११ व्या अध्यायातील ४१व्या श्लोकात श्रीकृष्णाला म्हणतो:

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति।
अजानता महिमन तदेव मया प्रमादात् प्रणयेन वापी।।

हे भगवन, मी आपल्याला सखा समजून आपली महिमा न जाणता, प्रमादवश अथवा प्रेमवश आपल्याला, हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या याप्रकारे जे बोलून गेलो त्याबद्दल मला क्षमा करा. आपल्या हातून देखील असे प्रमादवश-प्रेमवश वागणे बोलणे होतच असते. कधी कधी तर स्वामीजींची एखादी गोष्ट आपल्याला बोचते त्यावेळी आपण स्वामीजींचे खरे स्वरूप विसरलेले असतो. त्यावेळी आपला अहंकार जागृत झालेला असतो. आपला इगो (ego) दुखावलेला असतो. अशा प्रसंगी आपण हे देखील विसरतो की अशा

वागण्याने स्वामीजींचे नव्हे तर आपलेच अहित होणार आहे. स्वतः स्वामीजी तर स्वस्थचित्त असतात.

अशाच एका प्रसंगाची आठवण होते. एकादशीचा दिवस होता! श्री रामकृष्ण आश्रमात त्यादिवशी अतिशय सुश्राव्य श्री रामनाम संकीर्तन होत असते. स्वामीजींच्या वेळापत्रकात थोडा वेळ असल्याने आम्ही त्यांना आश्रमात चलण्याचा आग्रह केला. त्यांनी तो मान्यही केला. आम्ही सर्वजण आश्रमात-ठाकुरांच्या मंदिरात पोहोचलो. आश्रमात बसायची एक विशिष्ट रचना आहे. सर्व संन्यासी व ब्रह्मचारी पुढे बसतात व इतर भक्त मागे. दोघांच्या मध्ये छोटे लाकडी कठडे आहेत. आम्ही आत गेल्यावर स्वामीजींना पुढे बसावयास नेले व आम्ही मागे येऊन थांबलो. स्वामीजी बसले व संकीर्तन सुरू झाले. थोड्या वेळाने आश्रमातील एका संन्याशाने स्वामीजींना न ओळखल्यामुळे मागे जाऊन बसायला सांगितले. स्वामीजी काहीही आढेवेढे न घेता मागे जाऊन बसले. संकीर्तनानंतर आश्रमातल्या संन्याशाला स्वामीजींचा परिचय करून दिला व ते खजील झाले. संन्यासी खजिल झाले कारण त्यांनी स्वामीजींची सर्व पुस्तके वाचली होती त्याने ते खूप प्रभावित पण होते प्रत्यक्षात भेट व्हावी अशी मनोमन इच्छा पण होती मात्र प्रत्यक्षात प्रथम भेट झाली ती अशी! त्यानंतर आदराने स्वामीजींना नागपूर आश्रमाच्या अध्यक्षांकडे नेण्यात आले. आश्रमाचे अध्यक्ष स्वामी ब्रह्मस्थानंद जेष्ठ व विद्वान संन्यासी आहेत. वयोमानामुळे आरामखुर्चीवर बसुनच बोलतात, सहसा उठत नाहीत. परंतु स्वामीजी येताच ते उठून उभे राहिले स्वामीजींचे हात धरून स्वागत केले व सन्मानपूर्वक बसायचा आग्रह केला. आम्ही सर्वजण लोक हे बघत होतो, विशेषतः स्वामीजींच्या प्रतिक्रिया. आणि काय आश्चर्य.... दोन्ही घटनात स्वामीजींची प्रतिक्रिया सारखीच.... निर्विकार! त्याप्रसंगी स्थितप्रज्ञता म्हणजे काय याचा प्रत्यक्ष अनुभव आला. अपमानाचे दुःख नाही, त्रागा नाही की सत्काराचा आनंद नाही!

असाच दुसरा एक प्रसंग नागपुरातील स्वामीजींच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी श्री. पंकज खानापूरकर यांच्या घरी घडला. नागपुरातील ज्येष्ठ सूत्रसंचालक, साहित्यक्षेत्रातील मान्यवर श्री. प्रकाश एदलाबादकर हे कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आले होते. बोलता-बोलता त्यांनी स्वामीजींना त्यांचा औपचारिक परिचय काय करून द्यायचा असे विचारले. सामान्यतः अशा प्रसंगी लोक आपला लांबलचक, छापील परिचय पुढे करतात. परंतु स्वामीजी म्हणाले, आम्ही संन्यासी! आमचा कसला आला परिचय! ज्या नावाची डिग्री आहे ते आम्ही नाही आणि आमच्या नावाची कुठलीही डिग्री नाही. संन्यासाला भूतकाळ नाही का भविष्यकाळही नाही! हे उत्तर ऐकून श्री. प्रकाश एदलाबादकर यांच्यासह सर्व उपस्थित स्तब्ध झाले.

परम पूजनीय श्री गोळवलकर गुरुजींच्या नावावर सुरू असलेल्या माधव नेत्रालयाचा अनुभव तर विलक्षण आहे. नेत्रालयाला अनेक वर्षांपूर्वी एक जागा मिळाली. त्या जागेवर नेत्रालय (eye hospital) व अनुसंधान केंद्र (research centre) सुरू करायचा मानस होता. परंतु अनेक वर्षांपासून त्या जमिनीवर काहीच काम होत नव्हते. बऱ्याच कोर्ट केसेस होत होत्या. पडिक जमीन असल्यामुळे अनेक अवैध कामे होत होती. सर्व प्रकारचे प्रयत्न करून देखील काहीच बदल होत नव्हता. शेवटी विश्वस्त मंडळातील डॉक्टर अविनाश चंद्र अग्निहोत्री यांनी काही दैवी उपाय करावा म्हणून मुंबई येथील श्री. वाजपे यांच्याशी संपर्क केला. कुठलाही

पूर्वपरिचय किंवा माहिती नसताना श्री. वाजपे यांनी सांगितले की या समस्येचे समाधान केवळ स्वामी श्री सवितानंद नावाचे यतीच करू शकतील. हे ऐकून अग्निहोत्री यांनी स्वामीजींचा शोध सुरू केला. स्वामीजींशी फोनवर संपर्क झाल्यावर माहिती घेण्यापूर्वीच स्वामीजींनी भूमी दोष असल्याचे सांगितले, यथावकाश स्वतः स्वामीजींनी नागपूरला येऊन जागा बघितली व भूमी दोष असल्याची पुष्टी केली. जमिन बघायला जाताना जागे जवळ जाताच स्वामीजींच्या पायात भयंकर वेदना सुरु झाल्या. पाय काष्ठासारखे कडक झालेले मी स्वतः माझ्या हातांनी अनुभवले. जमिनीत किती अशुद्धता होती याचेच जणू हे प्रमाण होते. त्या जमिनीवर गवत उगवलेले असून देखील कुठलेही प्राणी चरायला जात नसत. केवळ सामाजिक कार्य म्हणून स्वामीजी त्या जमिनीवर गेले. परत आल्यावर स्वामीजी बराच वेळ स्तब्ध बसून करुणात्रिपदी ऐकत होते. हळूहळू पायाचा त्रास कमी झाला. तोच तिकडे जमिनीवर गाईंनी चरायला सुरुवात केली. भूमी शुद्धीकरणाकरिता उपाय म्हणून स्वामीजींनी त्या स्थानी एक महारुद्र स्वाहाकार करावा असे सुचविले. स्वामीजींच्या सूचनेवरून विश्वस्त मंडळाने महारुद्र स्वाहाकाराचे उत्तम आयोजन केले. प्रत्यक्ष स्वामीजींच्या उपस्थितीत स्वाहाकार पार पडला व काहीच दिवसात जागेच्या समस्या सुटायला लागल्या. एवढेच काय तर सर्व प्रशासकीय अडचणी दूर झाल्या व एक मोठे आर्थिक दान या प्रकल्पाला मिळाले. हे सर्व ज्यांच्या मार्गदर्शनामुळे झाले ते स्वामीजी मात्र सर्व प्रकारच्या प्रसिद्धी व लोकेषणेपासून विमुक्त होते, आहेत व राहतील.

एकदा स्वामीजी अकोल्यातील गौशाळेत गोपाष्टमीला प्रवचनाला गेले होते. दुसऱ्या दिवशी अकोल्याचे रा. स्व. संघाचे कार्यकर्ते आणि पुस्तक विक्रेते श्री. भूषण बापट व से.नि.प्राचार्या स्नेहा महाजनी बरोबर स्वामी नृसिंह सरस्वती यांच्या जन्मस्थानी लाड-कारंजा येथे दर्शनाला गेले. दत्तावतारी या विभूतीच्या मूर्तिविग्रहाचे दर्शन करून स्वामीजी प्रसन्न मनाने मंदिर परिसरात बाहेर ओट्यावर बसले तेवढ्यात संस्थेचे विश्वस्तासह भूषण बापट तेथे आले सर्वांनी स्वामीजींना विनंती केली की ऑफीसात बसू या. त्यांच्या आग्रहाने स्वामीजी तेथे जाऊन बसले. थोड्याच वेळात संस्थेचे अध्यक्ष दोन-तीन पुजाऱ्यासह तेथे आले आणि विनंती केली की मंदिरात चला स्वामीजीं म्हणाले, ''आम्ही आताच शांतपणे छान दर्शन केले. आता जातांना पुन्हा दर्शन करू.'' त्यावर ते सर्वजण म्हणाले, ''आताच आमच्या बरोबर चला महाराजांचा तसा आदेश आहे.'' स्वामीजी त्यांच्या बरोबर मंदिरात गेले तेथे पाहिले की पाट मांडून ठेवले होते. पूजेच्या पूर्ण तयारी सह ब्रह्मवृंद वाट पाहात होते. त्यांनी स्वामीजींना पाटावर बसायची विनंती केली स्वामीजी नम्रतेने संकोचाने म्हणाले,'' महाराजांसमोर पाटावर कसे बसू?'' त्यावर ते म्हणाले **महाराजांचाच आदेश आहे की त्यांच्या समोरच तुम्हाला बसवून वैदिक मंत्रांनी तुमची पाद्यपूजा करावी.** स्वामीजी साश्रुपूर्ण नयनांनी स्तब्ध होऊन महाराजांकडे पहात म्हणाले **मज पामरा हे काय थोरपण** आणि हा प्रसंग लाड कारंजा मंदिरात दोनदा घडला आहे. दुसऱ्या प्रसंगात उदयभाऊ, सौ. संगीताताई व मी स्वतःपण उपस्थित होतो.

असेच एकदा स्वामीजींना नागपूरच्या पूनापूर येथील प्राचीन भवानीमाता मंदिर येथे जाण्याचा योग आला. तिथेच देवीच्या तांदुळावरचे शेंदुराचे थर गळून पडले व प्राचीन मूर्ती समोर आली. पुजाऱ्याने दुपारची

आरती केली व नंतर स्वामीजींना गाभाऱ्यात बोलावून माँ च्या अंगावरील चुनरी स्वामीजींना ओढवली. असाच प्रसंग अमरावतीच्या एकविरा माता मंदिरात घडला. पुजाऱ्याने स्वामीजींना गाभाऱ्यात बोलाविले, पाटावर बसविले व चक्क स्वामीजींची ओटी भरली.

असे स्वामीजींबरोबरच का घडते? स्वामीजींच्या स्वरूपाचा शोध घेण्याच्या आपल्या प्रयत्नात हा प्रश्न नक्की आपल्याला मदत करेल. स्वामीजी स्वतः नेहमी म्हणतात, **प्रवचन हे प्रभावित करण्यासाठी नसून प्रकाशित करण्यासाठी असते.** याचा अनुभव मी स्वतः २०१२ साली घेतला. त्यावेळी मी नोकरी करत होतो व माझे वरीष्ठ अधिकारी फारसे धार्मिक नव्हते. स्वामीजी नागपुरात आल्यावर मी सुट्टी घेऊन पूर्ण वेळ त्यांच्यासोबत राहता यावे यासाठी प्रयत्नशील असे. सुट्टीचा अर्ज घेऊन मी अधिकाऱ्यांकडे गेलो. प्रथम त्यांनी नाना प्रश्न विचारून माझी कुचेष्टा करण्याचा प्रयत्न केला. कोण स्वामी? काय करतात ते? तू का आपला वेळ घालवतो आहेस? असे एक ना अनेक प्रश्न! शेवटी मी त्यांना म्हणालो किमान एक दिवस आपण प्रवचनाला या, आपल्याला नाही पटले तर मी सुट्टीचा आग्रह करणार नाही. आश्चर्य म्हणजे ते प्रवचनाच्या पहिल्या दिवशी आले. प्रवचनानंतर आवर्जून मला भेटले व म्हणाले, स्वामीजींची सर्व पुस्तके मला आणून दे एवढेच नाही तर ते संपूर्ण तीन दिवसांच्या प्रवचनमालेला उपस्थित होते व पुढे स्वामीजी नागपूरला आल्यावर मला कधीही सुट्टीची अडचण केली नाही. अनेक प्रवचनांच्या शेवटी असा अनुभव येतो की लोक उठून जायला तयार असत नाहीत. सूत्रसंचालकाला कार्यक्रम समाप्तीची घोषणा पुन्हा पुन्हा करावी लागते. विशेषतः शेवटच्या दिवशी परत जाताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू असतात. हे अस का होत असावं? का एका अनोळखी संन्याशाच्या प्रवचनाने लोक इतके भारावून जातात? याचे उत्तर स्वामीजीच्या शब्दात ते म्हणतात, **'आम्ही कधी प्रवचनाची तयारी केली नाही की कधी पुस्तके वाचली नाहीत. आम्ही म्हणजे केवळ रेडिओचा संच, स्टेशनचे संचालन करणारी माँ भगवती!'**

अशा या स्थितप्रज्ञ, समस्थितीत स्थिर झालेल्या, भगवती कृपाप्राप्त विभूतींच्याविषयी आपण काय लिहिणार व किती लिहिणार? चार आंधळे जेव्हा हत्ती 'पहायला' जातात तेव्हा त्यांची जशी स्थिती होते तशी आपली स्थिती आहे. हीच भावना आशुतोष भगवान शंकराबद्दल पुष्पदंत गंधर्वांनी शिवमहिम्नस्तोत्रात व्यक्त केली आहे.

तव तत्त्वम न जानामि किदृशोऽसि महेश्वर।
या दृशोऽसि महादेव तादृशाय नमो नमः।।

हे महादेवा, आपल्या तत्वाला (खऱ्या स्वरूपाला) मी ओळखत नाही, म्हणून आपण जसे आहात, ज्या स्वरूपात आहात त्या स्वरूपाला माझा नमस्कार! हे आपले परमभाग्य आहे की परमपूज्य स्वामीजींचे सानिध्य आपल्याला प्राप्त होते आहे. त्यांचे स्वरूप ओळखणे, त्यांनी मार्गदर्शन केलेल्या मार्गावर निशंकपणे चालणे यातूनच आपल्या सर्वांचे कल्याण साधले जाणार आहे म्हणून मानवी अवगुण दूर सारून आपण काया-वाचा-मनसा त्यांच्या व पर्यायाने माँ भगवतीच्या सेवेस पात्र होण्याचा प्रयत्न करणे हीच आपली खरी साधना.